# अर्थसंवाद

जुलै-सप्टेंबर 1988, खं.12, अंक 2

* एस. एन. डी. टी. विद्यापीठ मराठी अर्थशास्त्र परिषद
  डॉ. स. भा. साखळकर

* भारताच्या प्रत्यक्ष करांचे पुरोगामित्व
  डॉ. जे. एफ. पाटील, कोल्हापूर

* राष्ट्रीय उत्पन्न संकल्पना आणि मापन
  प्रदीप आपटे

* अर्थशास्त्र परिभाषा कोश
  ग्रंथ परिक्षण

* मार्क्स यांचे अर्थशास्त्र वैज्ञानिक शास्त्र आहे का?
  नी. वि. सोवनी

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तित।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

जुलै-सप्टेंबर 1988
खंड 12 अंक 2

**प्रमुख संपादक** : भ. ग. बापट
**सहाय्यक संपादक** : प्रदीप आपटे

**सल्लागार मंडळ:**
आनंद नाडकर्णी, श्री. वि. खांदेवाले,
गि. सो. कल्याणकर, ज. फा.पाटील

**संपादकीय पत्रव्यवहार**
भ. ग. बापट
गोखले अर्थशास्त्र संस्था
पुणे- 411 004

**व्यवस्थापकीय पत्रव्यवहार:**
(वर्गणी पाठवणे, अंक न मिळणे
याबाबत चौकशी इ. साठी)
व्यं. सु. पाटणकर
कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषद,
'संपदा',
प्राध्यापक वसाहत,
देवपूर, धुळे – 424 002

**वर्गणीचे दर :**
**अ) परिषदेचे सभासद:**
आजीव : रु. 400 (एक रक्कमी)
साधारण : रु. 60 (वार्षिक)
संस्था सभासद :
शैक्षणिक : रु. 60 (वार्षिक)
व्यावसायिक : रु. 150 (वार्षिक)
(परिषदेच्या सभासदांना अर्थसंवाद
त्यांच्या वर्गणीतच दिले जाते.)
**ब) अर्थसंवाद वर्गणीदार :**
ग्रंथालये : रु. 60 (वार्षिक)
वर्षगणना 1 एप्रिल ते 31 मार्च

**आभार :**
म. राज्य, साहित्य संस्कृती मंडळ व
भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान
परिषद, प. विभागीय केंद्र, यांनी
अर्थसंवादसाठी दिलेल्या अनुदानाबाबत

# अनुक्रमणिका

खंड 12, अंक 2

*** मार्क्स यांचे अर्थशास्त्र वैज्ञानिक शास्त्र आहे का?**
नी. वि. सोवनी
पृष्ठ -- 1

*** एस. एन. डी. टी. विद्यापीठ मराठी अर्थशास्त्र परिषद**
डॉ. स. भा. साखळकर
पृ. 25

*** भारताच्या प्रत्यक्ष करांचे पुरोगामित्व**
डॉ. जे. एफ. पाटील, कोल्हापूर
पृ. 31

*** राष्ट्रीय उत्पन्न**
**संकल्पना आणि मापन**
प्रदीप आपटे
पृ. 37

*** अर्थशास्त्र परिभाषा कोश**
ग्रंथ परिक्षण
पृ.44

*** मुखपृष्ठ व मांडणी**
अनिल अवचट

## संपादकीय

'अर्थसंवाद'ची उपयुक्तता वाढविण्याचा आमचा सतत प्रयत्न असतो. त्या दृष्टीने थोडेफार यश मिळाले आहे असे म्हणता येते. 'अर्थसंवाद'मध्ये येणाऱ्या विषयांची नुसती विविधता पाहिली तरी गेल्या काही वर्षात त्यात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसते.

एखाद्या विषयावरील विशदीकरणात्मक लेख लेख मालेच्या स्वरूपात-यावे आणि त्यात त्या विषयाची सांगोपांग मांडणी असावी म्हणजे अभ्यासकांना त्यांचा चांगला उपयोग होतो असा अनुभव आहे. 'आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र', 'राष्ट्रीय उत्पन्न' यासारख्या विषयांवर आम्ही अशी लेखमाला सुरू केलेली आहे. आणि त्यास वाचकांकडून,उत्तम प्रतिसाद मिळत आहे. 'मूल्यसिध्दांत', 'पैसाविषयक अर्थशास्त्र' 'इत्यादींवर अनुभवी' अभ्यासकांनी लेख लिहावे म्हणून आमचे प्रयत्न सुरू आहेत पण त्यास अजुनही अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही.

या अंकापासून आम्ही एक नवीन उपक्रम सुरू करीत आहोत. कल्पना अशी आहे की, भारतीय अर्थव्यवस्थेच्या निरनिराळ्या अंगासंबंधी अधीकृत सांख्यिकीय माहिती देणारी एक 8 ते 10 पानांची पुस्तिकारुपांतील पुरवणी द्यावी. ती पुस्तिका मूळ अंकापासून अलग करून सहजतेने फाईलमध्ये ठेवता यावी. या अंकात परराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांच्या ताळेबंदाची 1951 म्हणजे पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या वर्षापासून आकडेवारी देण्यात आली आहे. पुढील अंकापासून क्रमशः कृषी, उद्योग, लोकसंख्या, पैसा इत्यादी संबंधी माहिती देण्यात येईल. वाचकांना, विशेषतः प्राध्यापकांना त्याचा उपयोग खचितच होईल असे वाटते. या विभागाची उपयुक्तता वाढावी या दृष्टीने वाचकांनी आपल्या सूचना पाठविल्यास त्या आम्हाला निश्चितच मार्गदर्शक ठरतील.

आणखी एक गोष्ट म्हणजे या अंकापासून 'अर्थसंवाद'ची छपाई नवीन मुद्रण पध्दतीने होत आहे. महाराष्ट्र सहकारी मुद्रणालयाने 'अर्थसंवाद'साठी ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे. वाचकांना 'अर्थसंवाद'चे नवीन रूप आवडेल अशी आशा आहे.

**संपादक**

# मार्क्स यांचे अर्थशास्त्र वैज्ञानिक शास्त्र आहे का ?

नी. वि. सोवनी

सनातन व नवसनातन अर्थशास्त्रांची वैज्ञानिक परीक्षा[1] केल्यावर मार्क्स यांच्याही अर्थशास्त्राची तशीच परीक्षा करणे ओघानेच येते. ही परीक्षा स्वतंत्रपणे केली पाहिजे याची सूचना वरील परीक्षेच्या लेखातचे* दिलेली आहे. आपले सिध्दान्तन वा सिध्दान्त हे वैज्ञानिक आहेत व इतरांचे अवैज्ञानिक आहेत असा दावा मार्क्स यांनीच केलेला आहे. आपल्या व्यतिरिक्तच्या सर्व अर्थशास्त्रास व अर्थशास्त्रीय संकल्पना, सिध्दान्त, वगैरेंना 'ग्राम्य, क्षुद्र' (**vulger**) हे विशेषण त्यांनी लावले आहे. तेव्हा त्यांच्या अर्थशास्त्राचीही वैज्ञानिक परीक्षा करण्यास प्रत्यवाय असू नये. अशी परीक्षा करण्यात काही अडचणी आहेत. त्यांचा प्रथमच उल्लेख केलेला बरा.

मार्क्स यांच्या कोणत्याही विशिष्ट अगर सर्वसाधारण विचाराविषयी लिहावयाचे म्हणजे नेहमीच पडणारा प्रश्न असा की मार्क्स यांचे विशिष्ट विषयासंबंधीचे नक्की विचार कोणते व ते आपल्याला समजले आहेत की नाहीत? मार्क्स यांचे प्रसिध्द व अप्रसिध्द लिखाण विपुल आहे. बौध्दिक विवेचनाच्या दृष्टीने ते निरनिराळ्या पातळींवरचे आहे. काही राजकीय आहे, काही वर्तमानपत्री थाटाचे आहे,काही द्रष्ट्याच्या पातळीवरचे आहे, काही अभ्यासाच्या टिपणवजा व स्वतःच्या विचारांच्या स्वच्छतेसाठी केलेले आहे, काही अगदी उच्च बुध्दिनिष्ठ पातळीवरचे आहे, काही पत्ररूपाने आहे, आणि काही अद्यापही अप्रसिध्द आहे. त्यातही पुन्हा मूळचे जर्मन भाषेतील लिखाण व त्याचे इंग्रजी भाषांतर यामुळे काही लक्षणीय अर्थभेद होण्याचा संभव नाकारता येत नाही. हे सर्व वाङ्मय नीट वाचून व पचवून मार्क्स यांच्या विचाराबद्दल लिहावयास हवे. मार्क्स यांच्या निष्ठावंत अनुयायपैकीही फारच थोडे अभ्यासक या तयारीचे आढळतात. बहुसंख्य त्या पातळीच्या आसपाससुध्दा नसतात हे सर्वत्रास माहीत आहे. ही निष्ठावंतांची अवस्था तर जे तसे नाहीत त्यांच्याबद्दल काय म्हणणार? त्यांच्यातही

अशा पातळीवर पोचलेले अभ्यासक दुर्मिळच आहेत. मी निष्ठावान नाही व या विषयावर लिहिण्याचा माझा वकूब अगदी मर्यादित आहे. मी मार्क्स यांचे प्रसिध्द झालेले सर्व लिखाण वाचलेले नाही. काही वाचले आहे व अभ्यासिले आहे.ज्या अनेक निष्ठावंत व इतर अभ्यासकांनी आपल्याकडून पराकाष्टा अभ्यास करून मार्क्स यांच्या विचारावर विवेचन, टीका व टिपणी या केलेल्या आहेत व त्या इंग्रजीत प्रसिध्द केल्या आहेत त्यांच्या लिखाणावर माझी सर्व मदार आहे हे सरुवातीसच स्पष्ट करतो. या माझ्या मर्यादा लक्षात ठेवूनच विनम्र वृत्तीने मी या परीक्षणास उद्युक्त झालो आहे.मार्क्सवादी अभ्यासकांचा मला मूर्ख व अज्ञानी म्हणण्याचा हक्क मी त्यामुळे येथेच मान्य करीत आहे.

दुसरी अडचण मार्क्स यांच्या लेखनाच्या वैपुल्यातून उत्पन्न होणारी आहे. चाळीस वर्षाहून अधिक वर्षे मार्क्स लिहीत होते. त्या लिखाणाचे विविध प्रकार वर नमूद केलेले आहेत. या सर्व लिखाणाबद्दल साकल्याने लिहिणे अशक्य आहे. कारण त्यात मार्क्स यांच्या विचारओघात वेळोवेळी स्फुरलेले विचार ग्रथित झालेले आहेत. त्यांच्या विचारांची सतत उत्क्रांती होत असल्यामुळे व त्यांची प्रतिभा नवनवोन्मेषशालिनी असल्यामुळे एकाच विषयावर त्यांच्या विचाराची अनेक स्थित्यंतरे झालेली आढळतात. त्यामुळे त्यांचे कोणते विशिष्ट लिखाण मनात धरून वा त्याला अनुलक्षून आपण परीक्षा करीत आहोत हे स्पष्ट केले नाही तर आपण जे मार्क्स यांचे विचार समजतो त्याच्या विरोधी असे मार्क्स यांचे पूर्वीच्या अगर नंतरच्या काळातले उद्‌गार सहज शोधता येतात व उद्‌धृत करता येतात. त्यामुळे वैचारिक गोंधळ माजण्यास मदत होते. यातून वाट काढावयाची तर दोन गोष्टी पक्केपणी प्रथम सांगितल्या पाहिजेत. एक, मार्क्स यांची निरनिराळ्या विषयावरची अंतिम व परिणत मते ही विचारांच्या उत्क्रांतीतून सिध्द झालेली आहेत. त्यांच्या लिखाणांचा बारकाईने अभ्यास करणारांनी ही विचारांची उत्क्रांती तपशीलवार विशद करून मांडली आहे. त्या अनुसार मार्क्स यांची परिणत मते व सिध्दान्त कोणते हे ठरवून त्यांची परीक्षा केली पाहिजे. दुसरे, जे लिखाण या निकषाप्रमाणे अनुलक्षित असेल त्याची वाद वा अन्वेषणा पातळी ही ही स्पष्ट केली पाहिजे. येथे मार्क्स यांचे अर्थशास्त्रीय सिध्दान्त तपासावयाचे आहेत. त्या विचारांचे परिणत स्वरूप मार्क्स यांच्या 'भांडवल' या ग्रंथाच्या तीन (काहींच्या मते चार) खंडात व्यक्त झालेले आहेत. त्यांचे येथे विद्यानिष्ठ परीक्षण करावयाचे आहे.

यासंबंधी अधिक खुलासा केला पाहिजे कारण भांडवल ग्रंथातील विचार परिणततेच्या कोणत्या अवस्थेत आहेत हे सांगितले पाहिजे. गेल्या 25-30 वर्षात मार्क्स यांचे बरेच अप्रसिध्द लिखाण प्रसिध्द झाले आहे. त्यावर अनेक पंडितांनी अगदी शब्दाशब्दांचा कीस काढून मार्क्स यांची विचारधारा कोणत्या मार्गाने वाहिली, पुष्ट झाली, वळली, मागे फिरली, यासंबंधी सूक्ष्म चिकित्सा केली आहे. तिच्या अनुषंगाने त्या थोर विचारवंताच्या विचारव्यापाराचे विवेचक चित्र आपल्याला मिळते. या सर्व लिखाणातून सुस्पष्ट होणारी गोष्ट म्हणजे मार्क्स हे क्रियावान पंडित होते. अभ्यास हे साधन व त्यातून दिग्दर्शित होणाऱ्या क्रिया हे साध्य याबद्दल त्यांच्या मनात संदेह नव्हता. येथील चर्चा त्यांच्या अभ्यासाविषयीच फक्त आहे. समाजाचे पुढचे साध्य काय असावे यासंबंधीच्या त्यांच्या कल्पना त्यांच्या अगदी तरुण वयातच पक्क्या झाल्या होत्या. भांडवलशाही समाजव्यवस्था नाहीशी केली पाहीजे, ती अन्याय व कालपक्व झालेली आहे. खासगी मालमत्ता नसलेल्या समाजवादी व्यवस्थेची स्थापना क्रांती करून केली पाहिजे, ही ध्येये त्यांनी तरुण वयातच अंगीकारली होती. ही ध्येये व त्यांच्याकडे जाण्याची प्रक्रिया ही बुध्दिनिष्ठ अन्वेषणाने सिध्द करता येतील अशी त्यांची खात्री होती. ती तशी मांडली म्हणजे कामगारवर्गाला ती पटेल व भांडवलशाही विरूध्द क्रांती करण्यास ते उद्युक्त होतील आणि मार्क्स यांना अभिप्रेत असलेली त्यांची ऐतिहासिक भूमिका ते पार पाडतील असा त्यांचा विश्वास होता. त्यांचा अभ्यास जरी या भूमिकेवरून झाला तरी त्यांनी पांडित्याची कास सोडली नाही. बुध्दिनिष्ठ अशा अभ्यासानेच परिस्थितीचे विश्लेषण केले पाहिजे व त्या संबंधीचे सिध्दांत मांडले पाहिजेत असे त्यांचे ठाम मत होते. त्यांच्या प्रचंड अभ्यासातून सिध्द झालेले विचार कसे मांडावे याबद्दल ते नेहमी विवंचना करीत. भांडवलाचा पहिला खंड प्रसिध्द झाल्यावर कामगारवर्गात व सर्वसाधारणपणे जर्मनीत त्याचे फारसे स्वागत झाले नाही व हवा तसा त्याला प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे ते मनात फार खट्टू झाले असे त्यानी स्वतःच नमूद केले आहे.[3] शिवाय भांडवल ग्रंथाचे इतर खंड मार्क्स यांच्या मृत्यूनंतर प्रसिध्द झाले. ते त्यांनी प्रकाशनासाठी स्वत: कधीच तयार केले नव्हते. भांडवल या ग्रंथाचा आराखडा मार्क्स यांनी अनेक वेळा केला व हे अनेक आराखडे उपलब्ध झालेले आहेत. पहिला खंड प्रसिध्द झाल्यावर त्याच्या फ्रेंच आवृत्तीत मार्क्स यांनी अनेक सुधारणा केल्या, मांडणी बदलली. तसेच रशियन आवृत्तीच्या बाबतीतही केले. भांडवल या संपूर्ण ग्रंथाची व्याप्ती व त्याचा पक्का आराखडा मार्क्स यांनी केलेला आढळत नाही. पहिल्या खंडानंतरचे खंड एन्गेल्स यांनी संपादित करून छापले. त्यात मार्क्स यांच्या मनात असलेले त्या ग्रंथाचे अंतिम स्वरूप कितपत साकार झाले आणि एन्गेल्स यांची

मांडणी व टीका टिपणी मार्क्स यांना मान्य झाली असती की नाही हे सांगणे कठीण आहे. त्यामुळे हा ग्रंथ अपुरा आहे हे लक्षात घेतले पाहिजे. मार्क्स यांचे बहुसंख्य अनुयायी हे लक्षात घेत नाहीत व त्या ग्रंथातील सर्व विचार, सिध्दान्त, विवेचन ही त्रिकालाबाधित वेदवाक्ये आहेत असे समजून त्यांचे समर्थन करतात. मार्क्स यांनासुध्दा हे अन्यायकारक आहे. भांडवल ग्रंथातील विचार हे मार्क्स यांच्या विचारपथावरील त्यावेळच्या थांब्यासारखे आहेत. त्यानंतरही ते पुढे जातच राहिले व त्यांचे विचार बदलत गेले हे कागदोपत्रीच सिध्द आहे. उदाहरणार्थ, रशियातील ग्रामीण भागातील 'मीर' ही व्यवस्था व एकूण शेतीची परिस्थिती याचा त्यांनी अभ्यास केल्यावर शेतकीत होणाऱ्या स्थित्यंतरासंबंधीची त्यांची आधीची मते पुष्कळच पालटली. त्याचप्रमाणे समाजवादी समाजरचनेच्या मार्गावर भांडवलशाहीचा थांबा आवश्यक आहेच असे नाही असेही त्यांचे मत झाल्याचे नमूद आहे.[4] या सर्वांचा विचार करता ऑक्ले यांनी 'भांडवल' या ग्रंथाबद्दल काढलेला पुढील निष्कर्ष बरोबर वाटतो. ''भांडवल या एकूण ग्रंथातील अन्वेषणाचा व आशयाचा दर्जा संदिग्ध आहे. एका महत्त्वाकांक्षी पण अनिश्चित परिमाणाच्या अन्वेषण-सैध्दान्तिक प्रकल्पाचा तो अपूर्ण कळसच आहे असे दिसते.''[5] तथापि मार्क्स यांच्या अर्थशास्त्रीय विचारांचा तो अधिकृत ठेवा आहे. त्यास अनुलक्षूनच येथील परीक्षण केले आहे व ते करताना त्या ग्रंथाच्या वरील प्रकारच्या अपूर्णत्वाची सतत जाणीव राखलेली आहे.

मार्क्स यांच्या सिध्दांताची वैज्ञानिक परीक्षा करण्याच्या मार्गातली तिसरी अडचण विज्ञानाची संकल्पना व वैज्ञानिक अन्वेषणाची रीती याबद्दलची आहे व प्रस्तुत चर्चेच्या दृष्टीने ती अत्यंत महत्त्वाची आहे. विज्ञान म्हणजे काय व वैज्ञानिक अन्वेषणाची रीती कोणती यासंबंधी मार्क्स यांची प्रचलितांपेक्षा निराळी व स्वतंत्र मते आहेत असा दावा अनेक मार्क्सवाद्यांनी केलेला आहे. त्या मतांची चिकित्सा करून त्यासंबंधी प्रस्तुत परीक्षणात कोणती भूमिका घेतलेली आहे याचा खुलासा केल्याशिवाय प्रस्तुत चर्चेस हातच घालता येणार नाही हे उघड आहे. म्हणून त्यासंबंधी थोडी विस्तृत चर्चा येथे प्रथम करणे आवश्यक आहे.

मार्क्स यांची अन्वेषणाची रिती व्दंव्दात्मक स्वयंगती अथवा विरोध विकास वाद (**dialectics**) या नावाने ओळखली जाते. या रितीची मार्क्स यांनी स्वत: केलेली चर्चा फारशी विस्तृत अगर एका ठिकाणी सलग आढळत नाही. पण त्यांच्या विचारमंथनास त्या वादाचे पार्श्वसंगीत आहे हे निश्चित. त्याला त्यांनी अनेक वेळा साद घातलेली आहे. एन्गेल्स व लेनिन यांनी या वादासंबंधी टोकाची भूमिका घेऊन विवेचन केलेले आहे. परंतु ते सर्व मार्क्स यांना मान्य झाले असते की नाही याबद्दल मार्क्सवाद्यातच मतभेद आहेत.

डायलेटिक्स् या मूळ संज्ञेचा अर्थ चर्चा करण्याची रिती वा तर्कवादाची पध्दती येवढाच आहे. पण कालौघात त्यास वेगळ्यावेगळ्या अर्थच्छटा प्राप्त झाल्या आहेत. प्लेटो यांचा अर्थ निराळा, कांट यांचा निराळा, आपल्याकडच्या बौध्द तत्त्वज्ञानातला निराळा, हेगेल यांचा निराळा असा हा मामला आहे. मार्क्स यांच्या मताच्या संदर्भात हेगेल यांचा अर्थ व विवेचन महत्त्वाचे. कारण हेगेल हे मार्क्स यांचे स्फूर्तिस्थान आहे. हेगेल हे आधुनिक विरोध विकासवादाचे जनक मानले जातात. मार्क्स यांनी हेगेल दर्शनात बरेच महत्त्वाचे फरक करून मग ते स्वीकारले. त्यांनी याप्रमाणे सुधारून निर्माण केलेल्या या वादाचे स्वरूप विरोधविकासी जडवाद अथवा भौतिकवाद (**dialectical materialism**) या नावाने ओळखले जाते.

अविरत बदलणाऱ्या विश्वाला त्याच्या[6] बाहेरून प्राप्त होणाऱ्या चोदनाची जरुरी नाही अशी हेगल दर्शनातील मुख्य कल्पना आहे. भावरूप विश्वतत्त्वात स्वयंगती आहे. एक शुध्द कल्पना अपरिहार्यपणे दुसऱ्या विरोधी कल्पनेला प्रसवते. विरोधी कल्पनांचा अभेद्य आणि अपरिहार्य संबंध आहे. या विरोधातून विकास होतो. हेगेल यांचा हा सिध्दान्त त्या वेळच्या व आजच्या प्रचलित तर्कशात्राच्या साहाय्यानेच मांडला गेला आहे. न्यूटन दर्शनाने नाविन्याचा उलगडा होत नाही कारण त्याची भूमिका यांत्रिक (**mechanical**) आहे. त्या भूमिकेतून पुढे होणारे सर्व काही हे त्यावेळी अस्तित्वात असलेल्या गोष्टीच्यामुळे यांत्रिकरित्या ठरते. त्यामुळे विश्वात नाविन्य कसे उद्भवते याचा उलगडा होत नाही. त्याचे उत्तर देण्यासाठी हेगेल दर्शनाने तर्कशास्त्राच्या आधारे व्दंव्दात्मक स्वयंगती वा विरोधविकासवाद हे परतात्त्विक वा आध्यात्मिक (**meta-phical** )तत्त्व उद्घोषिले आहे.

मार्क्स यांनी हेगेल दर्शनास एक वेगळे वळण दिले. भावरूप विश्वातली हेगेल यांनी सांगितलेली स्वयंगतीची कल्पना मार्क्स यांनी जडद्रव्याला वा भूतवस्तूला ( **matter**) लागू केली. हेगेल यांचे भावरूप स्वयंपूर्ण सत्य (**idea of all reality**) सोडून मार्क्स यांनी भूतवस्तुरूप स्वयंपूर्ण सत्य आहे असे मानले. परंतु तसे करणे का समर्थनीय आहे व शास्त्रोक्तरित्या ते कसे सिध्द होते हे कोठेही दाखविले नाही. फक्त हेगेल पध्दती डोक्यावर उभी होती ती सुलटी करून पायावर उभी व चालती केली असे त्यांनी स्वत:च सांगितले आहे. पुढे हे समर्थन एन्गेल्स व लेनिन यांनी केले.[7] पण ते टोकाचे, उथळ व काही ठिकाणी हास्यास्पद आहे.

मार्क्सवादी व साम्यवादी विरोधविकास पध्दतीस तर्कशास्त्राचा आधार समजतात. लेनिन यांच्या मते तीच खरी ज्ञानमीमांसा (**epistemology**) आहे. परंपरागत तर्कशास्त्र

हे स्थिर परिस्थिती, स्थिर संकल्पना वगैरेंसाठी ठीक आहे. परंतु सर्व विश्व व त्यातील सर्व भूतवस्तू अखंडपणे गतिमान असल्यामुळे त्यातील प्रक्रियांचे आकलन व उलगडा करण्यासाठी या स्थितिकप्रकृतीच्या परंपरागत तर्कशास्त्राचा काही उपयोग नाही. त्यासाठी विरोध विकासी गतिमान तर्कशास्त्रच पाहिजे असा मार्क्सवाद्यांचा आग्रह आहे.

निश्चित विचारावरून दुसरा निश्चित विचार काढण्याचे नियम म्हणजे परंपरागत तर्कशास्त्र. या तर्कशास्त्रात अविरोधाचा नियम पायाभूत आहे. त्या तर्कशास्त्राप्रमाणे **A** ही मूळवस्तू. तिच्या विरोधी **not-A.** ही **A** असू शकत नाही. पण हेगेल व मार्क्सवादी यालाच आक्षेप घेतात. **A = not - A** हेही बरोबर आहे असे त्यांचे म्हणणे. विरोध आणि विरोधपरिहार यांचा क्रम म्हणजे गती. गतिमान वस्तू एकाच क्षणी दोन स्थळी असते. म्हणून या गतिमान अवस्थेचे तर्कशास्त्र जुन्या तर्कशास्त्राहून निराळे तर आहेच पण त्याला बाद ठरविणारे आहे. विरोधविकासी तर्कशास्त्र हेच खरे तर्कशास्त्र होय.

विरोध विकास पध्दतीने नाविन्य कसे उद्‌भवते यावर प्रकाश पडतो. व्दंव्दात एकमेकांची वृध्दी व एकमेकांचा ऱ्हास करण्याचा स्वभावधर्म आहे. हे महत्त्वाचे तत्त्व विरोध विकास पध्दतीने निदर्शनास आणले. हे तिचे श्रेय कोणीच नाकारीत नाही. परंतु ती एकाच वेळी ज्ञानोत्पत्ती, ज्ञानमीमांसा, आणि तर्कशास्त्र आहे हा एन्गेल्स व लेनिन यांचा दावा चुकीचा आहे. तत्त्वे, कल्पना व वस्तुस्वभाव यातील विरोधपूर्ण विकास दर्शित करणाऱ्या विचारपध्दतीस तर्कशास्त्र म्हणणे म्हणजे तर्कशास्त्राच्या मुख्य कार्याकडेच दुर्लक्ष करणे आहे. विरोधविकास वाद हा वस्तुतत्वदर्शनाचा (**ontology**)भाग आहे. विश्व असे आहे, ते स्थिर की परिवर्तनशील आहे, इत्यादी वस्तुविषयक निर्णयावर तर्कशास्त्र अवलंबून नसते. निष्कर्ष काढण्याची योग्य रिती सांगणे हे तर्कशास्त्राचे काम आहे. विरोध विकास पध्दती बरोबर आहे किंवा नाही हे तर्कशास्त्राच्या आधारेच तपासावे लागते. ज्या विरोधविकासी तर्कशास्त्राचे नाव मार्क्सवादी व साम्यवादी सतत घेतात त्याचे स्वरूप, त्यातील नियम, संकल्पना, वगैरे अनाक्षेपार्हपणे आतापर्यंत कोणीही मांडल्याचे आढळत नाही. विद्यांच्या उपासनेचे साधन म्हणून विद्यमान तर्कशास्त्रच अद्यापही प्रचलित आहे. विरोध विकास पध्दती विज्ञान सहाय्यक कशी बनते हे अद्याप कोणास सिध्द करता आलेले नाही. विज्ञान संशोधन पध्दतीत तिने अणुमात्रही भर घातलली नाही.[8]

विरोध विकास पध्दतीचे तीन नियम एन्गेल्स यांनी सांगितले. (1) वस्तुतील विरुध्द व्दंव्दामध्ये एकता व झगडा चालवणारा विरोध असतो. विरोध परमावधीस गेल्यावर वस्तूंचे पूर्ण रूपांतर होते. (2) राश्यात्मक (परिमाणात्मक) बदलातून गुणात्मक बदल परिणत होतो. (3) प्रथम स्थितीचा नाश म्हणजेच नंतर प्राप्त होणारी उच्च स्थिती. यालाच नकाराचा नकार असे नाव आहे. पहिला नियम विकासाचा उगम व त्याच्या स्वभावाबद्दल आहे. दुसरा नियम विकासाच्या स्वरूपासंबंधी आहे तर तिसरा त्या विकासाची प्रवृत्ती व दिशा यासंबंधी आहे. विकास का होतो हे पहिला नियम सांगतो. तो कसा होतो हे दुसरा नियम सांगतो. विकासाची दिशा कोणती हे तिसरा नियम सांगतो. हे तीन नियम, त्यांचा अर्थ व त्यात सांगितलेल्या प्रक्रिया यासंबंधी अनेक अडचणी व घोटाळे प्रत्ययास आलेले आहेत. त्यापैकी काही थोडक्यात असे:

(1) या नियमातील' विरोध ' आणि/ वा ' नकार ' या संज्ञांचे भिन्न भिन्न अर्थ मार्क्सवाद्यांनी केलेले आहेत. त्यातून अनेक घोटाळे निर्माण झाले आहेत. आणि तसे होण्याचे कारणही उघड आहे. ते म्हणजे विरोध व नकार हा कोणत्या वस्तुनिष्ठ निकषाने ठरवावयाचा? याबद्दल विरोध विकासवाद काहीच सांगत नाही. त्यामुळे एकाच गोष्टीचे अनेक विरोध वा नकार निरनिराळ्या निकषांप्रमाणे ठरू शकतात. त्यात एन्गेल्स यांनी पुढील विधान करून या गोंधळात भरच टाकली आहे. '' कोणत्याही गोष्टीचा नकार कोणता एवढेच मला दाखवून भागत नाही. मला तसे करण्यात असा विचार केला पाहिजे (किंवा त्याचे भान राखिले पाहिजे) की ज्यामुळे पहिला नकार असा साधला जाईल की त्याचाही नकार अस्तित्वात असेल किंवा शक्य होईल.''[9] नकाराचा नकार हा वरच्या दर्जाचा निवडण्यासाठी पहिला नकार निवडण्याचे स्वातंत्र्य एन्गेल्स यांच्याप्रमाणे इतर सर्व विचारवंतांना असेल तर त्यात वास्तव असा नकाराचा कोणताच निकष न राहता तो केवळ व्यक्तिनिष्ठच राहील. मग कोणत्याही प्रक्रियेत विरोधविकासी प्रक्रियाच आहे असे वितंडवादाने मांडता येईल. यासंबंधातच एन्गेल्स यांनी गणितातले एक उदाहरण आपल्या समर्थनार्थ देऊन आपले हसे करून घेतले आहे.[10]

(2) हा नियम काही प्रक्रियात आढळत असला तरी सर्व प्रक्रियात आढळत नाही. नवीन गुण उद्‌भवला म्हणजे राशी ( परिमाण ) बदलतेच असे नाही. काही द्रव्यात नुसत्या दुसऱ्या द्रव्याच्या संसर्गानेच गुण निर्माण होतो. राशी त्यात महत्त्वाची नसते. शिवाय परिमाण ( राशी ) किती बदलले म्हणजे नवीन गुण निर्माण होतो यालाही काही सर्वसामान्य इयत्ता सांगता येत नाही.

(3) या नियमातले समीकरण सिध्द करता येत नाही. नकाराचा नकार याचे अनेक अर्थ मार्क्सवादी व साम्यवादी लेखकांनी केलेले आहेत. प्रगतीच्या गतीचा मार्ग मळसूत्री किंवा सर्पिल (**spiral**) असतो. त्यामुळे नकाराच्या नकारातून निर्माण

होणारी गोष्ट मूळ गोष्टीच्या वरच्या स्तरावर असते. मग तीच पुन्हा मूळ वस्तू ठरून पुन्हा तिचा नकार व त्या नकाराचा नकार अशी प्रगतीची क्रिया अखंड चालू असते. नकाराचा नकार ही प्रगतावस्था पूर्वावस्थेपेक्षा गुणाने निराळी असते व नकाराचा नकार म्हणजे दुसऱ्या नियमातला गुणात्मक बदल असाही अर्थ काही मार्क्सवाद्यांनी लावला आहे. असे बरेच अर्थ असल्यामुळे या नियमाचा नक्की अर्थ काय याबद्दल बराच गोंधळ आहे. उत्क्रांतीच्या काही ( सर्व नव्हे ) प्रक्रियांचे यात वर्णन आहे असे म्हणता येईल. परंतु त्या संपूर्ण प्रक्रियेचा उलगडा त्यात आहे असे म्हणता येणार नाही. तसेच उत्क्रांतीची दिशा त्या नियमाने दाखविली जाते हे म्हणणेही वास्तवाच्या निकषावर टिकणारे नाही. आणखी एक अडचण अशी की भांडवलशाहीचा नकार साम्यवादी समाजरचना तर त्या नकाराचा नकार कोणता? असा प्रश्नच उद्भवू नये म्हणून स्टॅलीन यांच्या कारकीर्दीत हा नियम रद्दबातल समजावा असा आदेश काढण्यात आला होता. स्टॅलिन यांच्यानंतर त्या नियमाचे पुनरुज्जीवन करण्यात आले.[11]

विरोध विकास वादाची थोडी विस्तृत चर्चा येथे केली याचे कारण त्यासंबंधी मार्क्स यांनी फार थोडे लिहिले असले तरी त्या वादाची बैठक त्यांच्या विवेचनास सर्वत्र आहे. पण त्यांच्या विवेचनातील त्याचे नक्की स्वरूप व महत्त्व ठरविणे अवघड आहे. त्या वादावरील बहुतांश लिखाण मार्क्स यांच्या अनुयायांचेच आहे. त्यांच्यात खूप मतभेद आहेत व त्या मतां-पैकी कोणती व किती प्रमाणात मार्क्स यांना स्वतःला मान्य झाली असती हे सांगता येत नाही. प्रस्तुत चर्चेच्या संदर्भात या वादाविषयींच्या दोन परस्परविरोधी मतांचा उल्लेख करता येईल. विरोध विकासवाद म्हणजे काहीएक नवीनच अन्वेषण पध्दती नसून प्रचलित वैज्ञानिक अन्वेषण पध्दतीपेक्षा निराळे त्यात काही नाही. नैसर्गिक शास्त्रांना लावण्यात येणारी अन्वेषणारीतीच सामाजिकशास्त्रांना लावणे ही या वादाव्दारे मार्क्स यांनी घडवून आणलेली क्रान्ती होय. विरोध विकासवाद म्हणजे वैज्ञानिक अन्वेषणारीती असे लेनिन यांनीही म्हटले आहे. हे मत कॉर्नफोर्थ यांनी आग्रहाने मांडलेले आहे.[12] याउलट विरोध विकास वादाचे संपूर्ण स्वरूप सांगावयाचे तर ज्यात पुढील विश्वदर्शन अध्याहृत आहे अशी ती अन्वेषणा रीती आहे. विश्व ही एक प्रक्रिया आहे, वर्गयुध्द सामाजिक घडामोडींवर सत्ता चालविते, सामाजिक (आर्थिक) घटना या समग्रपणे विचारात घेतल्या पाहिजेत आणि या तत्त्वांतून निर्माण होणाऱ्या भावी समाजाची प्रतिमा ज्यात अध्याहृत आहे त्याच्या उदयासाठी कराव्या लागणाऱ्या लढ्याबाहेर अगर त्याहून स्वतंत्र अशी विरोध विकास वादाची रीती नाही, असे कोलाकौस्की यांनी म्हटले आहे.[13] ही मते परस्परविरोधी आहेत हे थोडक्यात दाखविता येईल. कोणतीही वैज्ञानिक (शास्त्रीय) अन्वेषणारीती ही स्वतंत्र नियमांची संहती असते. ती विषयाप्रमाणे बदलणारी वा विशिष्ट निष्कर्षांना अनुकूल वा प्रतिकूल अशी असणे शक्य नाही. विरोध विकासवाद ही नुसती अन्वेषण पध्दती असती तर " माझा विरोध विकास वाद हेगेल यांच्या विरोध विकास वादाहून नुसता वेगळा नसून त्याच्या अगदी उलट आहे आहे" ( पदटीप 7 ) असे मार्क्स यांना आवर्जून म्हणण्याचे कारण पडले नसते. तेच अन्वेषणाचे नियम हेगेल यांच्या आदर्शवादी दृष्टिकोनातून व मार्क्स यांच्या जडवादी दृष्टिकोनातून सामाजिक व ऐतिहासिक घडामोडींना लावता आले असते. तसे नसल्यामुळे मार्क्स यांना असे उद्गार काढावे लागले. या उलट विशिष्ट विश्वदर्शन अध्याहृत असलेला व वर्गीय लढ्यातच आकारित होणारा हा वाद असेल तर ती स्वतंत्र वैज्ञानिक अन्वेषणारीती आहे असे म्हणणे फोल आहे. वर्गकलहातून उद्भवणाऱ्या वा घडवून आणावयाच्या क्रान्तीचे ते निदेश पुस्तक असे म्हणता येईल.

पण या मतमतांतरांच्या जंजाळात न शिरता स्वतः मार्क्स यांनी अवलंबिलेल्या व आचरणात आणलेल्या अन्वेषणाच्या पध्दतीकडे आकारिकदृष्ट्या पाहिल्यास ती जुन्या तर्कशास्त्राप्रमाणेच आहे असे दिसते. मार्क्स भाबडे विगमन नाकारतात ( हे पुढे अधिक विशद केले आहे ) आणि सिध्दान्त कल्पना (**hypothesis** )- अनुमान ( **inference**) अशीच अन्वेषणाची रीती अनुसरतात. आपल्या आर्थिक विवेचनात भांडवलशाहीच्या गतीचे सिध्दान्त त्यांनी विस्तृतपणे व तपशीलवार मांडले. त्यासाठी विगमनी आधार म्हणून विस्तृत संशोधन करून जमवलेली माहिती सादर केली. त्यांनी आपले सिध्दान्त अमूर्तांच्या निरनिराळ्या पातळ्यांवर मांडले व प्रत्यक्ष माहिती आणि घटना यातूनच ते दिसून यावेत असा त्यांचा त्यामागचा हेतू होता. आपल्या सिध्दान्तकल्पना या अनुभवपूर्व ( **a priori** ) सिध्दच आहेत असे त्यांनी कधीच म्हटले नाही.

यासंबंधात मार्क्स यांनी आर्थिक प्रश्नांच्या अन्वेषणासाठी काही खास अन्वेषणारीती सांगितली आहे व तीच त्यांनी वापरली आहे असा यासंबंधी असलेला समज तपासला पाहिजे. ही रीत मार्क्स यांनी **1857** मध्ये प्रथम लिहून **1859** मध्ये प्रसिध्द केलेल्या **A Critique of Political Economy** या आपल्या पुस्तकाच्या प्रास्ताविकात घातलेली आहे. अनेक अभ्यासकांच्या मते मार्क्स पुष्कळवेळा आपले विचार स्वच्छ करण्यासाठी जे टिपणवजा लेखन पुष्कळवेळा करीत त्यापैकी हे एक टिपण आहे. त्याला विचारमंथनाचे स्वरूप आहे; परिणित निष्कर्षांचे नाही. त्यानंतरच्या काळात त्यांचे विचार पुढे गेले, पालटले असे दिसते. पण त्याचा एकत्र विचार त्यांनी वरील प्रास्ताविकातल्याप्रमाणे कोठेही नंतर केलेला आढळत नाही. या टिपणाचे पुनर्मुद्रण करण्याची मार्क्स यांनी टाळाटाळ केली. ती

कागदोपत्री नमूद आहे.[14]

उपरोक्त टिपणात मार्क्स यांनी जी अर्थशास्त्राची अन्वेषणारीती म्हणून सांगितली आहे तिचा परामर्ष थोड्या विस्तृत स्वरूपात येथे घेणे आवश्यक आहे कारण त्यासंबंधी बरेच गैरसमज प्रचलित आहेत. निदान मार्क्स यांनी यासंबंधी काय म्हटले आहे ते तरी नीट मांडणे जरुरीचे आहे. या अन्वेषणारीतीचे सूत्रमय वर्णन करताना अनेकांनी म्हटले आहे की मार्क्स यांच्या मते वैज्ञानिक ( शास्त्रीय ) अन्वेषणा म्हणजे अमूर्तातून मूर्तावर करावयाचे आरोहण होय. अमूर्त संकल्पनापासून सुरुवात करून त्यांच्या साहयाने मूर्त वास्तवाचे विश्लेषण करणे ही मार्क्स यांची अन्वेषणारीती आहे असा याचा अर्थ होतो. ही थोडीफार सारवादी ( essentialist ) भूमिका आहे व मार्क्स यांच्या तात्त्विक विचारांचा साकल्याने विचार करता त्यांच्याशी मुळीच जुळणारी नाही. किंब्हुना त्याला विरोधी आहे. याचे कारण ती मार्क्स यांची संपूर्ण भूमिका विशद करणारी नाही. त्यांच्या अन्वेषणारीतीचा तो एक भाग आहे. पण तिचा दुसरा भागही तितकाच महत्त्वाचा आहे. या दुसऱ्या भागाकडे दुर्लक्ष झाल्याने पहिल्या भागात हेगल दर्शनाचे प्रतिबिंब पडलेले आहे असे म्हटले जाते, ते खरे आहे. हे दोन्ही भाग यांची मिळून होणारी अन्वेषणारीती ही मार्क्स यांची संपूर्ण अन्वेषणारीती होय. ती आपण पुढे विस्तृतपणे चर्चिणारच आहोत. पण त्यापूर्वी पहिल्या भागातील विचारांची ओळख करून घेऊया.

मार्क्स म्हणतात की अमूर्ताकडून मूर्ताकडे जाणे ही एकच रीत मूर्ताचे विनियोजन ( appropriating) करून त्याचे विचाररूप मूर्तात रूपांतर करण्याची वैज्ञानिक (शास्त्रीय) अन्वेषणारीती आहे. मूर्त हे अनेक निर्धारणांचे ( determinations ) संश्लिष्ट स्वरूप असते. ( हेगेल यांच्या पुढील विधानाचा हा प्रतिध्वनी आहे. ' संकल्पना हेच मूर्त आणि खरोखरी कोणतेही विशिष्ट हे नानाविध निर्धारणांचे एकविध स्वरूप असते ' ). म्हणूनच विचार म्हणजे संश्लेषण प्रक्रिया असे मानूनच मूर्त सत्य हे समजू शकते. म्हणजेच मूर्ताच्या अत्यन्त सोप्या व अमूर्त व्याख्या करून त्यांच्या साहाय्याने मूर्ताची पुनर्रचना करण्यानेच हे साधता येते. या उलट जर (शास्त्रीय) वैज्ञानिक अन्वेषणा हे सत्य आणि मूर्त वास्तवापासून - पूर्वानुबंधापासूनच म्हणजे लोकसंख्या किंवा जागतिक बाजारपेठ - सुरुवात करील तर ते धूसर व पूर्णपणे अव्याख्यित अशा वास्तवाचे चित्र उभे करील. ज्या वर्गांची मिळून लोकसंख्या बनते ते वर्ग लक्षात न घेता जर नुसती लोकसंख्या विचारात घेतली तर लोकसंख्या ही एक अमूर्त संकल्पना ठरेल. जर समाजातील वर्ग हे ज्या मूलकांवर आधारलेले असतात - वेतनी कामगार, भांडवल, वगैरे - ते माहीत नसतील तर ' वर्ग ' ही आशयहीन संकल्पना ठरेल. आणि भांडवल, वेतनी कामगार वगैरे विनिमय, श्रमविभाग, किंमती, वगैरे गोष्टींवर अवलंबून असतात. म्हणून जर लोकसंख्येपासून सुरुवात केली तर ती या सर्वांची मिळून बनलेली एक गोंधळाची संकल्पना ठरेल. (म्हणून) मग आणखी निर्धारकांच्या आधारे अन्वेषणाच्या मार्गाने अधिकाधिक साध्या संकल्पनांकडे जावे लागेल; कल्पिलेल्या मूर्तापासून अधिकाधिक अमूर्त संकल्पना करीत अगदी साधी संकल्पना मिळेपर्यंत जाता येईल. मग हा प्रवास पुन्हा उलट मार्गाने लोकसंख्येपर्यंत परत येईपर्यंत करावा लागेल. पण त्यावेळी वास्तवाची एक गोंधळाची संकल्पना आपल्याजवळ नसेल. तर अनेक व्याख्यांनी व सहसंबंधांनी संपन्न अशी वास्तवतेची संकल्पना आपल्याला मिळालेली असेल.'[15]

सतराव्या शतकातील अर्थशास्त्र विचारात हीच पद्धती दिसून येते असे मार्क्स म्हणतात. लोकसंख्या, राष्ट्र, राज्य, अनेक राज्ये येथूनच ते अर्थशास्त्रज्ञ सुरुवात करतात व शेवटी श्रमविभाग, पैसा, मूल्य, वगैरे साध्या अमूर्त निर्णायकांपर्यंत पोचतात. या संकल्पना तयार झाल्या की मग त्यापासून आरोहण करून राज्य, राज्याराज्यातील विनिमय, जागतिक बाजारपेठ या अर्थव्यवस्थांच्या पातळीवर पोचतात. अमूर्ताकडून मूर्ताकडे जाण्याची ही दुसरी पध्दतीच वैज्ञानिक (शास्त्रीय) अन्वेषणा पध्दती होय.

मार्क्स येथे एक स्पष्ट इशारा देतात व वरील विधानांचा सहजी भावणारा हेगेलीय अर्थ बरोबर नाही असे स्पष्ट सुचवितात. वर वर्णन केलेल्या मूर्त वास्तवाचे जे विचारात विनियोजन केले जाते ती प्रक्रिया म्हणजे ज्या प्रक्रियेने वास्तव अस्तित्वात येते ती नव्हे. विचारप्रक्रियेची सुरुवात मूर्त वास्तवातून होत नाही. मूर्तवास्तव हे त्या प्रक्रियेच्या शेवटी येते. अर्थात प्रत्यक्ष विश्व हे स्वत:च स्वत:चा आविष्कार करणाऱ्या विचाराचे फळ नसते. किंवा संकल्पना व निरीक्षण याहून निराळे असे संकल्पना चित्र नसते. संकल्पन आणि निरीक्षण हे मूर्तापाशीच सुरू होते. त्यातून परिणत होते ती संकल्पना; म्हणजे वैचारिक मूर्त. साध्या व सरळ अमूर्त संकल्पनांपासून जटिल मूर्ताकडे आरोहण आणि प्रत्यक्षातील त्यांच्या परिणतीचा क्रम हे सारखे नसतात. फक्त काही बाबतीतच तसे असण्याची शक्यता असते.

मार्क्स यांच्या अन्वेषणारीतीसंबंधीचे गैरसमज टाळण्यास वरील विवेचन नीट ध्यानात घेतले पाहिजे. नुसत्या अनुभवपूर्व ( a priori ) अमूर्त संकल्पनांपासून निगमनाने सिध्दान्त उभारावयाची मार्क्स यांची अन्वेषणारीती आहे हे पूर्णपणे चुकीचे आहे. मार्क्स निगमनाइतकेच विगमनालाही महत्त्व देणारे होते. ते निव्वळ अनुभववादी ( empiricist ) नव्हते पण विगमनवादी ( empirical ) होते. त्यांच्या अन्वेषणारीतीत

विश्लेषण आणि संश्लेषण हे दोन्ही होते म्हणून त्यांचे परस्पर संबंध कसे होते याची चर्चा आवश्यक आहे. त्यांच्या लिखाणाचा कालक्रमाने व बारकाईने अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांचे असे मत झाले आहे की वरील टिपणात मार्क्स आपले विचार वाचकांपुढे कसे मांडावे याची रीती सांगत होते. ती रीती संश्लेषणाची होती. त्या संश्लेषणामागचे विश्लेषण कसे असावे यासंबंधी तेथे चर्चा केलेली नाही. ती त्यांनी पुढच्या काळात निरनिराळ्या वेळी तुटक स्वरूपात केली आहे. या त्यांच्या चर्चेचे परिणत स्वरूप भांडवल ग्रंथाच्या पहिल्या ( जर्मन ) खंडाच्या दुसऱ्या आवृत्तीस जोडलेल्या ताज्या कलमात मार्क्स यांनी मांडले आहे. तेथे ते लिहितात: '' विश्लेषणाची पध्दती व तिचे निष्कर्ष वाचकांपुढे सादर करण्याची पध्दती या वेगळ्या असल्याच पाहिजेत. उपलब्ध तपशीलवार माहितीचे पूर्ण विनियोजन करणे, तिच्या विकासातील तिची निरनिराळी स्वरूपे विवेचणे आणि त्यांचे आंतरिक संबंध शोधणे हे सर्व विश्लेषणात करावे लागते. ते सर्व काम झाल्यावर त्याची प्रत्यक्षातील गती यथार्थपणे वर्णिता येते. हे जर यशस्वीरीतीने करता आले, जर विषयद्रव्याचे जीवन हे आदर्शपणे आरशातल्या प्रतिबिंबासारखे दाखविता आले, तर मग त्या सर्वांची (वाचकासाठी) करावयाची मांडणी ही जणुकाही अनुभवपूर्व संकल्पनांची रचनाच आहे असे वाटेल ( अशी करता[18] येईल).''

सेयर्स यांनी मार्क्स यांच्या अन्वेषण पध्दतीचा सूक्ष्म अभ्यास करून हाच निष्कर्ष काढला आहे. त्यांचा मुख्य मुद्दा असा की 1857 च्या या टिपणात मार्क्स आपली विवेचन मांडणीची पध्दत सांगत आहेत. त्या विवेचनामागील अन्वेषणाची वा विश्लेषणाची पध्दती सांगत नाहीत. या दोन अगदी भिन्न गोष्टी आहेत. सभोवतालच्या वास्तवाची त्यांच्या इतिहासाच्या अभ्यासाने अन्वेषणा करून काही संकल्पना उभारणे व त्यावर आधारलेल्या सिध्दान्तकल्पना ( **hypothesis** ) उभारणे यालाही अन्वेषणा लागते. सिध्दान्तकल्पना या आकाशातून येत नाहीत. किंवा केवळ अनुभवपूर्व ( **a priori** ) अशा असू शकत नाहीत. पूर्वीच्या अन्वेषणा पध्दतीत सिध्दान्तकल्पना मांडल्यावर तिची सिध्दी कशी करावी यावर सर्व भर असे. पण अलीकडच्या तत्वज्ञान्यांनी सिध्दान्तकल्पना उभारण्यासाठी होणारी प्रक्रियाही अन्वेषणात्मकच आहे व तीही तर्कशास्त्राचाच एक भाग आहे असे जोरदारपणे मांडून प्लेटो, स्पिनोझा, वगैरे तत्त्वज्ञानांच्या तत्त्वज्ञानामागील ही प्रक्रिया उलगडून दाखविलेली आहे. मार्क्स यांच्या अन्वेषणातही अशीच प्रक्रिया सापडते असे सेयर्स यांचे म्हणणे आहे. सिध्दान्तकल्पना व त्यांना जरूर असणाऱ्या संकल्पना या मार्क्स यांनी किती श्रमाने उभारल्या आहेत याचे तपशीलवार विवेचन सेयर्स यांनी केले आहे. यालाच आधुनिक तत्वचर्चेत पश्चनिगमन (**retroduction**) असे नाव आहे.

वास्तवाचे अन्वेषण करण्यासंबंधीची मार्क्स यांची भूमिका त्यांच्या अगदी पहिल्या लिखाणापासून स्पष्ट दिसते. वास्तवाचे दृष्य आकारिक रुप व त्यात ग्रथित झालेले सारभूत सामाजिक संबंध - हे वर्गीय असतात- यात मार्क्स फरक करतात. दृष्य आकारिक रुपे हे सारभूत संबंधाना झाकून टाकतात. त्यामुळे ते सहज दृष्टीस पडत नाहीत. जे रुप मानवांना दिसते ते त्यावेळच्या प्रस्थापित विचारसरणीने बाधित झालेले वा झाकलेले असते. त्या भोवतालचे हे पटल भेदून सारभूत संबंध शोधण्याची अन्वेषणारीती म्हणजेच वैज्ञानिक ( शास्त्रीय ) अन्वेषणारीती असे मार्क्स मानतात. या सारभूत संबंधांच्या शोधासाठी वास्तवाच्या दृष्यरूपांना तत्सम अशा तात्विक व अमूर्त संकल्पनांचे रुप द्यावे लागते.

मार्क्स यांची ही भूमिका लक्षात घेता ते वास्तवातील घटना, घटिते, वस्तू, वगैरेपासूनच अन्वेषणाला सरुवात करतात आणि सुरवातीसच असा इशारा देतात की सभोवताली आपल्याला जे दिसते, जाणवते, ते वास्तव घटितांचे वगैरे आकारित रूप. पण हे रूप भंगुर असते. त्याच्या मागे इतिहास असतो. इतिहासाचा परिपाक म्हणून ते सध्याचे रूप तयार झालेले असते. ते कायमचे नसते तर भविष्यात बदलणारेच असते. बदल ही वास्तवाची प्रकृती आहे. म्हणून या सतत बदलणाऱ्या वास्तवाच्या बाह्यरूपातून त्यातले सारभूत चिरंतन रूप काय ते शोधून काढणे आवश्यक असते. ते शोधावयाचे तर ऐतिहासिक कालौघात त्या सारभूत रूपावर जडलेले पापुद्रे वा पुटे काढून टाकली पाहिजेत. प्रत्येक कालखंडातील त्याचे दृष्यरूप ऐतिहासिक असते. परंतु त्याचे चिरंतन सारभूत रूप इतिहासातीत असते. म्हणून त्याला इतिहासाने बाधा येत नाही.

आणि मार्क्स लगेच स्पष्ट करतात की हे ' चिरंतन ' रूपसुध्दा ' सापेक्ष चिरंतन ' असते. ते इतिहासातीत असते याचा अर्थ त्या संदर्भात अनुलक्षिलेल्या इतिहासकाळाच्या मर्यादातीत असते. पण त्याहूनही विस्तृत व प्रदीर्घ अशा मानवी इतिहासाच्या काळपटावर ते चिरंतन नसते. ' इतिहासातीत ' या विशेषणाचा अर्थ असा सीमित आहे.

आपल्या अन्वेषणाच्या पहिल्या टप्प्यावर वास्तवाचे दृष्य आकार हे इतिहासातीत वा कायमचे नाहीत हे मार्क्स प्रथम दाखवतात. दुसऱ्या टप्प्यावर ते पश्चनिगमनाच्या रीतीने हेच विशिष्ट आकार का उत्पन्न अगर परिणत होतात याचा शोध करतात.**Wages, Labour and Capital** या 1847 मध्ये प्रसिध्द झालेल्या ग्रंथात मार्क्स यांनी लिहिले होते: '' निग्रो हा निग्रो असतो. काही विशिष्ट सामाजिक संदर्भाच्या परिस्थितीत तो गुलाम होतो. सूत कातणारी यांत्रिक चाती ( **jenny** ) हे कापसापासून सूत काढण्याचे यंत्र असते. काही

कापसापासून सूत काढण्याचे यंत्र असते. काही विशिष्ट सामाजिक संबंधांच्या परिस्थितीतच ते भांडवल होते. ज्याप्रमाणे नुसते सोने म्हणजे पैसा नसतो किंवा साखर म्हणजे साखरेची किंमत नसते त्याप्रमाणे यांत्रिक चाती ही नेहमीच भांडवल नसते. '' त्यानंतर वीस वर्षांनी ( 1867 ) कॅपिटल ग्रंथाच्या पहिल्या खंडात मार्क्स यांनी हा उतारा उद्धृत केला आहे व आपल्या अन्वेषणारीतीचे पुनरावेदन केले आहे.[17]

आणि अन्वेषणाची ही रीतच त्यांनी सर्वत्र पाळलेली आहे. नेहमीच्या प्रचलित विगमन पध्दतीसारखी मार्क्स यांची विगमनाची पध्दती नाही. ( ती अपूर्ण आहे हे पुढे विशद करावयाचेच आहे ) पण त्यांच्या विश्लेषणाचा पाया भक्कमपणे विगमनावर उभारलेला आहे. विगमन याचा नेहमीचा अर्थ वास्तवाच्या निरीक्षणाने त्यातील सर्वसामान्य सारखेपणा शोधून काढणे व तो मूर्त करणे. मार्क्स तसे करीत नाहीत. कारण त्यांच्यामते वास्तवाची दश्यरूपे ही स्थळकाळविशिष्ट असतात व फसवी असतात. म्हणून मार्क्स वास्तवातील घटितांपासून सुरवात करतात पण विगमन पध्दतीने ते त्यांच्या अन्तरंगाचा शोध घेतात व त्यांवर आपल्या सिध्दान्तकल्पना उभारतात. वास्तवापासून अन्वेषण करून सिध्दान्तकल्पना व सिध्दान्त अशीच त्यांच्या अन्वेषणाची दिशा आहे. त्याच्या उलट दिशेची नाही.

अर्थशास्त्रीय अन्वेषणासाठी लागणाऱ्या संकल्पना मार्क्स कोणत्या पध्दतीने व्युत्पादितात यांची येथवर चर्चा केली. आता अशाप्रकारे व्युत्पादिलेल्या संकल्पनांचे स्वरूप व त्यांच्या आधाराने करावयाच्या अन्वेषणावर त्याचे होणारे परिणाम यांचे विवेचन केले पाहिजे. ऐतिहासिक घडामोडींच्या ओघात निर्माण होणाऱ्या निरनिराळ्या समाज अवस्थात जे सामाजिक संबंध अनुस्यूत असतात त्यातूनच त्या अवस्थेला लागू पडणारे आर्थिक सिध्दान्त तयार होतात. म्हणून अर्थशास्त्र म्हणजे ऐतिहासिकदृष्ट्या विशिष्ट आर्थिक संबंधांनी शिल्पित अशा समाजपध्दती कशा निर्माण होतात, कशा वर्ततात, कशा बदलतात वगैरेंचा अभ्यास करणारे शास्त्र ( विज्ञान ) होय अशी मार्क्स यांची व्याख्या आहे. सामाजिक संबंधातील कार्यकारण मीमांसा हाच अर्थशास्त्राचा गाभा आहे.

असा अभ्यास फक्त गुणात्मक ( qualitative )रीतीने करून निरनिराळ्या प्रकारच्या उत्पादनात उपलब्ध साधनसंपत्तीची विल्हे, त्या उत्पादनाचे विभाजन व निरनिराळ्या प्रकारच्या आर्थिक अभिवृध्दी यांच्या आधारे निरनिराळ्या प्रकारचे आर्थिक संबंध कसे व कोणते असतात हे दाखविणे एवढेच अर्थशास्त्राचे काम आहे असे मार्क्स मानीत नाहीत. तर शक्य तेथे हे काम परिमाणात्मक (quantitative) किंवा राश्यात्मक रीतीनेही मांडण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. उदाहरणार्थ, भांडवलशाही अर्थव्यवस्थेत ऐतिहासिकदृष्ट्या विशिष्ट अशा भांडवलशाही आर्थिक संबंधातून विक्रेयवस्तूमधील विनिमयाची गुणोत्तरे (exchange ratios) राश्यात्मक रीतीने कशी ठरतात व एकूण उत्पादनाचे राश्यात्मक वाटे निरनिराळ्या वर्गांना कोणत्या राश्यात्मक प्रमाणात मिळतात याचेही विवेचन मार्क्स करतात.

अर्थशास्त्राच्या या व्याख्येतूनच त्यासाठी लागणाऱ्या संकल्पना कशा पाहिजेत हे सूचित होते. ऐतिहासिक दृष्ट्या विशिष्ट अशा सामाजिक संरचनातील सामाजिक संबंधातूनच आर्थिक सिध्दान्त व्युत्पादिणे मार्क्स यांच्या मते आवश्यक असल्यामुळे अशा सिदान्तांना लागणाऱ्या संकल्पना या सामाजिक संबंधांच्या एक संचाशी ( set ) संबध्द असणाऱ्याच असल्या पाहिजेत. विक्रेय वस्तू, मूल्य, भांडवल इत्यादी ( मार्क्स यांनी उभारलेल्या ) संकल्पना त्यात अनुस्यूत असलेल्या सामाजिक संबंधांचा आशय अंगीभूत झालेल्या आहेत.

विक्रेय वस्तू उत्पादन करणाऱ्या आर्थिक पध्दतीतील सामाजिक संबंध व त्यातील वस्तूवस्तूमधील संबंध हे एकमेकात अविभाज्यपणे गुंतलेले असतात. ते वस्तूंशी निगडित असतात व वस्तूंसारखेच दिसतात. पण सामाजिक संबंधांच्या बनलेल्या या संकल्पना वस्तूवस्तूतील संबंधही प्रतिबिंबित करतात असे मार्क्स मानतात असे दिसते. मूल्य म्हणजे माणसामाणसातील संबंध असतो. पण त्याचा आविष्कार वस्तूवस्तूमधील संबंध ( विनिमय ) हा असतो '' (Capital, I, p. 74)आपल्या अन्वेषणात मार्क्स यांनी हा संकेत सर्वत्र पाळला आहे व म्हणूनच वस्तूंचा उल्लेख ते नेहमी '' विशिष्ट ( निश्चित ) सामाजिक संबंध '' असा करतात.

मार्क्स यांच्या संकल्पनात्मक संरचनेत किंवा त्यांच्या प्रतिमानात सर्वत्र एकात्मक आन्तरसंबंध असतात. वास्तवाचा प्रत्येक भाग प्रतिबिंबित करणाऱ्या संकल्पनेची पूर्ण व्याख्या केली म्हणजे ती एका संपूर्ण समष्टीचा ( साकल्याची ) एक निराळा भाग ( व्यष्टी ) अशी मानावी लागते व तिच्यात त्या समष्टीचे सर्व भाग प्रतिबिंबित होतात किंवा अध्याहृत असतात. म्हणून अशी संकल्पना अनेक उपभागांची बनलेली असते व तिचा वापर आणि विचार अनेक दृष्टींनी करता येतो. वास्तव वा काल्पनिक ( संकल्पनात्मक )समष्टी ( साकल्य ) ही त्याच्या प्रत्येक भागात समाविष्ट झालेली असते. (Grundrisse p. 512-514) आपल्याकडच्या म्हणीप्रमाणे जे पिंडी ते ब्रह्मांडी व जे ब्रह्मांडी तेच पिंडी असते.

मार्क्स यांच्या या अर्थसंकल्पनांच्या विशिष्ट स्वरूपामुळे अन्वेषणाच्या दृष्टीने बरेच प्रश्न उद्भवतात. एक तर प्रत्येक संकल्पना ही सर्व समष्टीला प्रतिबिंबित करीत असल्याने त्या संकल्पनेची पूर्ण व्याख्या करण्यासाठी सर्व समष्टीची तपशीलवार

नोंदणी व वर्णन प्रथम करावे लागते. आणि समष्टी ही अविरत बदलत असल्यामुळे या संकल्पनाही सतत बदलणाऱ्याच असतात वा असल्या पाहिजेत हे मान्य करावेच लागते. अशा बदलत्या संकल्पना वापरून केलेली अन्वेषणा वा उभारलेले सिध्दान्त हे अस्पष्ट असणे स्वाभाविक असते. असा अस्पष्टपणा टाळावयाचा असेल तर कोणतीही संकल्पना वापरताना त्या वापरास योग्य अशी नवी व्याख्या केली पाहिजे. अशा संकल्पनांच्या साहाय्याने सारभूत अगर मूलभूत सिध्दान्तन करण्याचे व त्या सिध्दान्तनाचे विवेचन करण्याचे काम फार अवघड होऊन बसते. हा अनुभव मार्क्स यांना अनेक वेळा आल्याचे नमूद आहे.

दुसरे म्हणजे विश्व ही एक मूल द्रव्यांची झालेली सेंद्रिय एकता आहे असे मानून सुध्दा कार्यकारण मीमांसा पध्दतीने त्यासंबंधी विवेचन करता येते. परंतु मार्क्स यांची संकल्पना करण्याची विशिष्ट पध्दती स्वीकारली तर तसे करता येत नाही. मार्क्स यांच्या संकल्पना त्यातील सर्व जटिल सामाजिक आशयासह त्यासाठी वापरावयाच्या तर कार्य व कारण यासंबंधी अलग अलग बोलणे अवघडच नव्हे तर अशक्य होऊन बसते. कारण हया प्रत्येक संकल्पनेत त्या समष्टीतल्या बाकीच्या सर्व कल्पना समाविष्ट वा ध्वनित असतातच. त्यामुळे त्यातले कारण कोणते व कार्य कोणते याचा उलगडा होत नाही. असे असूनसुध्दा मार्क्स कार्यकारण मीमांसेच्या पध्दतीने व तिच्या भाषेतच विवेचन करतात. याचा अर्थ ते आपल्या संकल्पना त्यांच्या पूर्ण व्याख्यित स्वरूपात वापरीत नाहीत.त्यांच्या आंशिक वा अपूर्ण अर्थानेच वापरतात असा होतो.

तिसरे, मार्क्स यांच्या संकल्पनांचा आशय सामाजिक संबंध हा आहे. याचा अर्थ त्या गुणात्मकतेने (**qualitatively**) विशिष्ट आहेत. या गुणात्मकतेचे विलोपन परिमाणात्मक (राश्यात्मक) स्वरूपात होऊ शकत नाही. ते तशाप्रकारे होते असे मार्क्स यांना व्दंव्दात्मक विकास वादातील 'राश्यात्मक बदल हा गुणात्मक बदलात परिणत होतो' या नियमाच्या आधारे वाटले असेल! पण हा नियम विश्वातील काहीच प्रक्रियात आढळतो. सर्वत्र आढळत नाही हे आपण पूर्वीच नोंदले आहे. कारण काहीही असो पण मार्क्स त्यांच्या संकल्पनांच्या आधारे सिध्दान्तन करताना त्यांच्या परिमाणात्मक (राश्यात्मक ) स्वरूपातच त्यांचा वापर करतात. उदाहरणार्थ, मूल्य व भांडवल या संकल्पना मानवी श्रमांच्या एककात मोजता येणाऱ्या व संमेय असतात असे मार्क्स मानतात व त्यानुसार त्या संबंधीची अंकगणितात्मक कोष्टके व समीकरणे आपल्या विवेचनात वापरतात. त्यांच्याव्दारेच ते आपले सिध्दान्त उभारतात. मूल्य व भांडवल या संकल्पना विशिष्ट सामाजिक संबंध दर्शविणाऱ्या आहेत हा मार्क्स यांचा आग्रह लक्षात घेता त्या संकल्पनांचे हे अंकगणितात्मक परिमाणगण्य रूप त्यांचा सामाजिक आशय किती प्रमाणात प्रतिबिंबित करतात वा दर्शवितात हा प्रश्नच आहे. त्या प्रश्नाचे उत्तर मार्क्स यांना प्रतिकूल आहे.

कारण एखाद्या गोष्टीची गुणात्मकता व परिमाणात्मकता (राश्यात्मकता ) या एकमेकांशी अविभाज्यपणे संलग्न असतात असे सर्वसाधारणपणे आढळत नाही. गुणात्मकता ही परिमाणात्मक भाषेत संपूर्णपणे सांगता येत नाही, हे अनेक वेळा सिध्द झालेले आहे. वरील विषयाशी संबध्द नसलेल्या पण अगदी साध्या एका उदाहरणाने हा मुद्दा विशद करता येईल. कुटुंब ही एक सामाजिक आशयाची ( संबंधाची ) संकल्पना आहे. या तिच्या स्वरूपाचे गुणात्मक पैलू अनेक आहेत. कुटुंब संस्थेचा विचार कुटुंब संयुक्त की विभक्त, त्याचा आकार ( संख्या ), दोन की अधिक पिढयांचे, वारसा हक्कांची एक सामाजिक व्यवस्था म्हणून, एकत्र जेवणाऱ्या व अन्न शिजवणारांचा गट, घरकुल या प्रकारची व्यवस्था, वगैरे अनेक प्रकारांनी करता येतो. पण राश्यात्मक(परिमाणात्मक)रीतीने कुटुंबाचा विचार कुटुंबाच्या आकाराप्रमाणे, संयुक्त विभक्त याप्रमाणे वा पिढयांच्या संख्येप्रमाणे त्यांची वर्गवारी करून करता येतो. पण ही राश्यात्मक निर्देशके कुटुंबाच्या सामाजिक आशयाच्या प्रत्येकी एका पैलूचे कमिजास्त प्रतिबिंबन करतात. त्या सर्व पैलूंचे मिळून होणारे सामाजिक संपुट या परिमाणात्मक निर्देशकांच्या भारित अगर अभारित सरासरीने योग्य प्रकारे निर्देशिले जात नाही हे विश्रुत आहे. याकडे दुर्लक्ष करून त्या परिमाणात्मक निर्देशकांच्या साहाय्याने सिध्दान्त मांडल्यास ते त्यांच्या सामाजिक आशयासंबंधी असतील असे मानणे फारच दूरान्वयाने शक्य आहे. मार्क्स तसे करतात व त्यामुळे त्यांचे सिध्दान्त दोषपूर्ण असण्याचा धोका निर्माण होतो. पुढील चर्चेत याचा प्रत्यय येईलच.[17]

वर वर्णिलेल्या अन्वेषणारीतीप्रमाणे मार्क्स यांनी केलेल्या विश्लेषणाचा आढावा घेण्याआधी ही चर्चा सुरू करताना उपस्थित केलेल्या प्रश्नाचे प्रथम उत्तर दिले पाहिजे. मार्क्स यांची विज्ञानाची कल्पना काय होती व जेव्हा माझे अर्थशास्त्र वैज्ञानिक आहे व इतरांचे अवैज्ञानिक अथवा गावंढळ वा क्षुद्र ( **vulgar** ) आहे असे म्हणतात त्या वेळी ' वैज्ञानिक ' या संज्ञेचा कोणता नेमका अर्थ त्यांना अभिप्रेत आहे. त्यांच्या लिखाणात यासंबंधी फारशी चर्चा अगर स्पष्ट खुलासा आढळत नाही. मार्क्स यांच्या लिखाणातील असे सर्व संदर्भ तपासून लॉर यांनी असा निष्कर्ष काढला आहे की विज्ञान म्हणजे आदर्श ज्ञानाचा साठा नसून आदर्श ज्ञानासमीप जाण्याची एक प्रक्रिया आहे अशी मार्क्स यांची विज्ञानासंबंधीची एकूण कल्पना दिसते. विज्ञान म्हणजे वैज्ञानिक अन्वेषणा पध्दती हे मत मार्क्स यांच्या लिखाणात अनेक ठिकाणी सूचित झालेले दिसते. वर चर्चिल्याप्रमाणे मार्क्स यांच्या मते वास्तवाच्या दृष्य पण फसव्या

स्वरूपापासून अन्वेषणा सुरू केल्यास ती अवैज्ञानिक असते. वास्तवाच्या दृश्यरूपाने झाकलेले त्याचे आन्तरिक सत्यरूप जर सहजगम्य असेल तर विज्ञान म्हणून निराळे काही असण्याची गरजच राहणार नाही असे मार्क्स यांनी स्पष्टच म्हटले आहे. [19]

पण नुसती अन्वेषणारीती वैज्ञानिक असली तरी त्या अन्वेषणेतून उभारल्या जाणाऱ्या सिध्दान्त कल्पना या निगमनाने व विगमनाने सिध्द ठरल्याखेरीज त्यांना वैज्ञानिक सिध्दान्ताची पदवी लाभत नाही. विशिष्ट अन्वेषणा रीतीने जरी सिध्दान्त उभारले तरी तेवढयानेच ते वैज्ञानिक रूप पावतील असा भरवसा देता येत नाही. ते स्वतंत्रपणे सिध्द व्हावेच लागतात. यावरून पाहता मार्क्स यांची विज्ञानाची कल्पना अपूर्ण आहे. ती अन्वेषणारीती सिध्दान्तकल्पना उभारण्यापर्यंतच मर्यादित आहे. तेव्हा येथे प्रथम मार्क्स यांच्या अन्वेषणारीतीने त्यांनी उभारलेल्या सिध्दान्तांचे तपशीलवार वर्णन केले आहे व नंतर त्यांची निगमनाने व विगमनाने परीक्षा केली आहे. आणि मगच मार्क्स यांच्या अर्थशास्त्राच्या वैज्ञानिकतेबद्दल निष्कर्ष काढला आहे.

**मूल्य सिध्दान्त**

मार्क्स विक्रेयवस्तू ( **commodity** ) पासून सुरवात करतात. प्रथमत: वस्तू मानवाची गरज भागविते. या तिच्या लक्षणाला उपयोग मूल्य वा उपयोगिता म्हणतात. उपयोगिता वस्तूत अंगीभूत झालेली असते. तेच तिचे नैसर्गिक रूप ( **form** ) असते. दुसरे लक्षण, ही उपयोगिता निरनिराळ्या वस्तूत गुणात्मक रीतीने वेगवेगळी असल्याने ती संमेय(**commensurable** ) नसते. तिसरे, संपत्तीचे सामाजिक स्वरूप काहीही असले तरी तिचा गाभा उपयुक्तता हाच असतो. उपयोग मूल्य ही संकल्पना सर्व प्रकारच्या उत्पादन व्यवस्थात असते. त्यामुळे ती इतिहासातीत (विशिष्ट ऐतिहासिक परिस्थितीशी निगडित नसलेली) संकल्पना आहे.

पण नुसती उपयोगी वस्तू विक्रेयवस्तू होत नाही. विनिमयात तिला विनिमय मूल्य वा मूल्यरूप (**value form**) प्राप्त होते व मग ती विक्रेय वस्तू बनते. एका वस्तूचा दुसऱ्या वस्तूशी विनिमय करण्याची क्षमता व तो ज्या प्रमाणात होतो ते प्रमाण यांचे विनिमयमूल्य हे मूर्त रूप ( बहुधा पैशात ) असते. हे मूल्यरूप त्या वस्तूचे सामाजिक रूप ( **social form** ) होय. म्हणून विनिमयमूल्य ही ऐतिहासिक संकल्पना आहे. ती विशिष्ट ऐतिहासिक परिस्थितीशी - भांडवलशाहीशी- निगडित आहे.

वस्तूचे विनिमयमूल्य दुसऱ्या सर्व वस्तूंच्या राशीत सांगता येते. याचा अर्थ त्या सर्वात विनिमयमूल्य असते व त्याचे एकमेकांशी समीकरण करता येते. यातून दोन निष्कर्ष निघतात. एक, कोणत्याही वस्तूचे विनिमयमूल्य हे ( सर्वांना ) समान असे काही तरी व्यक्त करते. दोन, त्या वस्तूत अंगीभूत झालेल्या परंतु तिच्या विनिमयमूल्यापासून वेगळे असणाऱ्या काहीतरीचे ( द्रव्याचे ) ते व्यक्तरुप व दृश्यरूप असते. हे जे ' काही तरी समान ' म्हणून म्हटले त्यालाच मार्क्स ' मूल्य' हे नाव देतात. मूल्य आणि विनिमयमूल्य ही निरनिराळी असतात.

मग मूल्य म्हणजे काय? मूल्य म्हणजे उपयोगमूल्य नव्हे कारण ते संमेय नसते हे पूर्वीच नोंदले आहे. आणि मूल्य हे संमेय असते. एकदा वस्तूंच्या उपयोगमूल्यांना बाजूस ठेवले म्हणजे त्यांच्यात समान असणारा गुण म्हणजे त्या मानवी श्रमाचे फळ असतात येवढाच राहतो. म्हणजे वस्तूच्या उत्पादनासाठी लागलेले श्रम हेच ते मूल्य होय. अधिक बारकाव्याने विधान करावयाचे तर मूल्य म्हणजे ''वस्तूच्या उत्पादनासाठी सामाजिकदृष्टया आवश्यक लागणारे श्रम होत.''

आता या मूल्याने विनिमयमूल्याचे रूप का घ्यावे? आपण जेव्हा वस्तू म्हणजे श्रमाचे मूर्त स्वरूप असे म्हणतो त्या वेळी ते विधान पूर्णपणे काल्पनिक गोष्टीबद्दल असते. हे मूर्त रूप तिच्या सामाजिक अस्तित्वाचे एक स्वरूप असते. तिच्या दृश्यरूपाशी त्याचा काहीही संबंध नसतो. मूल्याचे अस्तित्व सामाजिक आहे; भौतिक नाही. पण हे तिचे सामाजिकत्व त्या वस्तूच्या दृश्यरूपावेगळेही असू शकत नाही. वस्तूचा रंग, आकार, वजन, वगैरेप्रमाणे मूल्य दृष्य नसते. पण असे म्हटल्यास त्या वस्तूच्या भौतिक आकाराशिवाय निराळा आकार वा अस्तित्व आपण तिच्या मूल्याला देतो आणि आपण आधीच म्हटले आहे की हा भौतिक आकार तिच्या उपयोगितेचाच मूर्त अवतार असतो आणि उपयोगमूल्य हे वस्तूला विशिष्ट असते. इतर वस्तूंच्यातली उपयोगमूल्ये व त्या वस्तूचे उपयोगमूल्य यात समान काहीच नसते. म्हणून उपयोगमूल्याहून निराळे व इतर वस्तूतही असणारे असे मूल्याचे दृश्यस्वरूप असणे आवश्यक आहे व ते तसे आहे हे दाखविता आले पाहिजे.

मार्क्स असे दाखवितात की विनिमयमूल्य हेच मूल्याचे दृश्यरूप व्यक्त करण्याचा मार्ग आहे. मूल्य वस्तूत आशय म्हणून असते. तथापि ते वस्तूपासून निराळे काढता येते हे दाखविण्यासाठी मार्क्स तिसरा विभेद मांडतात. तो 'अत्यन्त महत्त्वाचा असून अर्थशास्त्राची नीट समज येण्याच्या दृष्टीने मर्मस्थानी आहे ' असे बजावतात.

वस्तूचे उपयोग मूल्य व मूल्य यात जसा विभेद करता येतो तसाच तो त्या वस्तूच्या निर्मितीस लागणाऱ्या श्रमांच्या बाबतीतही करता येतो. वस्तू म्हणजे एक विशिष्ट उपयोगमूल्य असा विचार केल्यास ती वस्तू तशाच विशिष्ट प्रकारच्या श्रमांची निर्मिती असते. मार्क्स यांनी दिलेले उदाहरण द्यावयाचे तर लिनन हे विणकरी श्रमाने होते तर त्याचा कोट हा शिंपी-श्रमाने होतो. यावरून श्रम म्हणजे एका विशिष्ट उद्देशाने केलेली एक विशिष्ट उत्पादक क्रिया होय. याला मार्क्स मूर्त किंवा उपयोगी

श्रम असे नाव देतात. हे उपयोगी श्रम उपयोग मूल्याप्रमाणेच वस्तुविशिष्ट असे असतात. उपयोग मूल्याप्रमाणेच संमेय नसतात. उपयोग मूल्याप्रमाणेच उपयोगी श्रम ही मानवी इतिहासात नेहमीच आढळणारी बाब आहे व म्हणून ती इतिहासातीत आहे. ती विशिष्ट ऐतिहासिक युगाशी वा कालखंडाशी निगडित नाही.

हे उपयोगीश्रम संमेय नसल्यामुळे त्यांच्या आधाराने वस्तूवस्तूंतील विनिमयमूल्य ठरविणे शक्य नाही. म्हणून ते श्रम मूल्याचा गाभा असणे शक्य नाही. त्याचा उलगडा 'अमूर्तश्रम' या संकल्पनेने करता येईल. सर्व वस्तूत अंगीभूत होणाऱ्या विशिष्ट श्रमांचे सर्वसाधारण रूप म्हणजे 'अमूर्तश्रम' ( एकजिनसी श्रम ). सर्व विशिष्ट श्रमातील सर्वसाधारणत्व येथे अभिप्रेत आहे. या सर्वसाधारण श्रमातून 'मूल्य' निर्माण होते.

अमूर्त श्रमांची पहिली व्याख्या 'शारीरिकदृष्ट्या सारखे काम' अशी मार्क्स करतात असे वाटते. पण त्यातल्या अनंत अडचणींची त्यांना जाणीव असल्यामुळे ते त्या कल्पनेवर स्थिर न होता दुसऱ्या मार्गाने पुढे जातात. ज्याप्रमाणे विनिमयमूल्य हे एक विशिष्ट सामाजिक म्हणून अस्तित्वात येते त्याचप्रमाणे 'अमूर्त श्रम' हेही एक सामाजिक असते. आपण वस्तूंची देवाणघेवाण करतो त्यावेळी अभावितपणे त्या वस्तूंत अंगीभूत झालेल्या विशिष्ट श्रमांना सामाजिक श्रमांचे रूप देत असतो. त्याशिवाय विनिमय शक्यच होणार नाही. विनिमयामुळेच विशिष्ट श्रमांचे सर्वसाधारण अमूर्त श्रमात रूपांतर होते व त्या श्रमांच्या समान भागात विनिमय होतो असे भांडवल ग्रंथाच्या पहिल्या खंडाच्या फ्रेंच आवृत्तीच्या प्रस्तावनेत मार्क्स यांनी म्हटले आहे. म्हणून अमूर्तश्रम हे एक सामाजिक रूप आहे आणि इतिहासाच्या विशिष्ट कालखंडाशी निगडित आहे. ही संकल्पना इतिहासातीत नाही. निसर्गापासून या ना त्या स्वरूपात उपयोगी वस्तू तयार करण्याची मानवी क्रिया ही सर्व मानवी समाजांना समान आहे पण अमूर्त श्रमामुळे उत्पन्न होणारे आणि सर्व वस्तूंना व्यापून टाकणारे विनिमयमूल्य हे मानवीश्रमाचे विशिष्ट सामाजिक रूप आहे. म्हणूनच ते ऐतिहासिक आहे.[20]

या निष्कर्षाप्रत आल्यावर मार्क्स यांच्या वेळच्या अर्थशास्त्रीय चिकित्सेच्या शिरोभागी असणारी ' शुद्ध आणि साधे ' श्रम ही संकल्पना मार्क्स यांनी आपल्या विवेचनातून हद्दपार केलेली आढळते. मार्क्स श्रमांच्या अनेक निरनिराळ्या विशिष्ट रूपांबद्दलच बोलतात. भांडवल ग्रंथात सर्वत्र श्रम या संज्ञेला कोणते तरी विशेषण लावलेले आढळते. मार्क्स उपयोगी व अमूर्त श्रमाबद्दल बोलतात, वेतनी आणि गुलामी श्रमांबद्दल बोलतात, सामाजिक व खासगी श्रमाबद्दल बोलतात. पण 'शुद्ध व साधे' श्रम याबद्दल बोलत नाहीत. एवढेच नव्हे तर शुद्ध आणि साध्या श्रमाच्या भाषेत रिकार्डो बोलतात याबद्दल त्यांच्यावर कडक टिका करतात. ''तुलनात्मक मूल्ये ( किंवा विनिमय मूल्ये ) ही श्रमांच्या राशींनी कशी ठरतात येथपासून रिकार्डो सुरवात करतात. या श्रमांचा स्वभाव ते अधिक बारकाईने तपाशीत नाहीत. रिकार्डो त्या मूल्यांचे रूप तपाशीत नाहीत व ज्या त्यांच्या स्वभावगुणाने विनिमय मूल्य जन्मते किंवा ते विनिमयमूल्य म्हणून दृष्टिगोचर होते ( अवतीर्ण होते) त्याची ते परीक्षा करीत नाहीत. ''[21]

मार्क्स स्वत: या रुपांचा विचार करतात व त्या संदर्भातील श्रमांचे 'अमूर्त श्रम ' असे वर्णन करतात. अशा प्रकारे उपयोगी व अमूर्त श्रम यात फरक करणे यातच अर्थशास्त्राची खरी समज दडलेली आहे असा इशारा देतात.

अमूर्त श्रमांची संकल्पना मिळाली तरी तिचे अधिक विश्लेषण करणे आवश्यक ठरते. या श्रमाचे काही परिमाण( माप ) निदर्शिणे आवश्यक आहे. हे परिमाण श्रमकाळ या स्वरूपाचे असते असे मार्क्स सांगतात. सामाजिकदृष्ट्या आवश्यक असा जो श्रमकाळ वस्तूंत अन्तर्भूत होतो व तिच्या विनिमयमूल्यात अवतीर्ण होतो त्या श्रमकाळाची व्याख्या म्हणजे 'प्रसामान्य उत्पादन परिस्थितीत व त्या वेळी प्रचलित असलेल्या सरासरी कसबांच्या मात्रेचा व सघनतेचा श्रमकाळ' अशी व्याख्या मार्क्स भांडवल, खंड १ मध्ये [22] करतात.

श्रमकाळामुळे याप्रमाणे विनिमयमूल्य ठरले तर अतिरिक्त ( **surplus** ) मूल्याचा उलगडा कसा करावयाचा हा प्रश्न मार्क्स यांना अनेक वर्षे त्रास देत होता हे त्यांच्या लिखाणांचा कालक्रमाने अभ्यास केल्यास सहज दिसते. भांडवलशाहीचे व्यवच्छेदक लक्षण म्हणजे तिच्यात कामगारांचे श्रम ही एक विक्रेय वस्तू होते असे मार्क्स यांनी म्हटले होते. पण भांडवलदार कच्चा माल व श्रम विकत घेतो व आपले उत्पादन विकून पैसे मिळवितो. आणि हे सर्व जर मूल्यांच्या साहयाने होते ( किंवा त्यांच्या माध्यमातून होते) तर त्यात अतिरिक्त मूल्य कोठून निर्माण होते? बाजारात होणारा विनिमय समान मूल्यांचा होतो, तर कामगारांच्या श्रमाबद्दल त्यांना दिलेले वेतन हे त्यांनी केलेल्या श्रमांच्या मूल्याशी समान असणार. मग कामगारांची पिळवणूक होते असे कसे म्हणता येईल? मार्क्स या टप्प्यावर बराच काळ अडले पण शेवटी त्यांना सुचले की भांडवलदार कामगारांचे श्रम विकत घेत नाही तर त्यांची श्रमशक्ती दिवसाच्या काही ठराविक मुदतीसाठी वेतन देऊन विकत घेतो. आणि त्या कामगाराच्या किमान योगक्षेमाला लागणाऱ्या उत्पादनापेक्षा (वेतनापेक्षा) जास्त उत्पादन त्याच्याकडून करून घेतो. हे अतिरिक्त उत्पादन म्हणजेच अतिरिक्त मूल्य. ते कामगाराला मिळत नाही तर भांडवलदाराला मिळते किंवा तो

ते हडप करतो. हे कोडे उलगडल्याबरोबर मार्क्स यांच्या अन्वेषणाचा पुढचा मार्ग मोकळा झाला व मग त्यांनी तो भराभर आक्रमिला.

हे संशोधन झाल्यावर मग मार्क्स आपला मूल्य सिध्दान्त वाचकांच्यापुढे कसा मांडतात याबद्दल बऱ्याच चुकीच्या कल्पना प्रचलित आहेत. त्या बाजूस ठेऊन पोकोर्ने यांनी मार्क्स यांच्या पध्दतीने तो कसा मांडता येतो हे दाखविले आहे ते त्यांच्याच शब्दात येथे देतो.

1.0 '' जेव्हा मार्क्स अमूर्तांकडून मूर्तांकडे मी जातो असे म्हणतात तेव्हा त्याचा अर्थ असा असतो : एका विशिष्ट टप्प्यावरील घटितांचा जे उलगडा करू शकेल अशा एका साध्या मूलभूत सार्वत्रिक ( वैश्विक ) विधानापासून ते सुरुवात करतात. नंतर ते असे दाखवतात की ते विधान असा उलगडा करण्याच्या दृष्टीने फार अमूर्त किंवा आशयहीन आहे. म्हणून त्यात अधिक विशिष्ट ( निर्णायक )आशय घालणे आवश्यक आहे. याला आधीच्या विधानाचा नकार असेही म्हणता येईल.पण याचा अर्थ ते विधान खोटे होते असे नाही किंवा हे नवे विधान स्वयंपूर्णपणे खरे आहे असेही नव्हे. खरोखरी तो विशिष्ट आशय मूळ अमूर्त विधानात घातल्याने ते विधान संकल्पनेच्या दृष्टीने अधिक संपन्न होते आणि म्हणून त्या घटिताचा उलगडा करण्यास जास्त समर्थ होते. परंतु अशा प्रकारे तयार झालेले विधानही अमूर्तच आहे असे वाटेल. म्हणून मग पुन्हा वरच्यासारखीच प्रक्रिया पुन्हा करून ते अधिक संपन्न करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. ही प्रक्रिया त्या विधानातली सार्वत्रिकता व त्यातील अनुलक्षित विशिष्टता आकलणारी प्रमेयसंहिता मिळेपर्यंत चालू राहते.'' '

'' 2.2 आपण प्रथम एक प्रमेय मांडू या. 'प्रत्येक वस्तूच्या उत्पादनाला जी अमूर्त एकजिनसी श्रमशक्ती लागते त्यांच्या राशींच्या प्रमाणात त्या वस्तूंच्या तुलनात्मक किंमती असतात.' तिचा अर्थ नेहमीच्या व्यवहारातला म्हणजे या किंवा त्या उत्पादकाची श्रमशक्ती असा समजावयाचा. तसा समजल्यास त्याचा अर्थ त्या उत्पादकांचे वैयक्तिक श्रमच किंमती ठरवितात असे होईल. त्यामुळे प्रत्येक उत्पादक (उत्पादन संस्था) त्याच प्रकारच्या वस्तूला निरनिराळ्या किंमती लावील. पण स्पर्धायुक्त बाजारात हे चित्र वास्तव ठरणार नाही. म्हणून वैयक्तिक मूल्य व बाजारातील त्या प्रकारच्या वस्तूंच्या निर्मितीस लागणारे सरासरी श्रम यात फरक केला पाहिजे. म्हणजे सामान्य उत्पादन परिस्थितीत सामाजिकदृष्ट्या जरूर तेवढे एखाद्या वस्तूच्या उत्पादनासाठी लागणारे सरासरी कसबाचे व सरासरी घनत्वाचे मानवीश्रम आपण घ्यावयाचे व त्याला भौतिक उत्पादनाने भागल्यास आपणास हवे ते सरासरीश्रम मिळतात. ही सरासरी किंमत (मूल्य) बाजारातील स्पर्धेमुळे त्या प्रकारच्या वस्तूला लागू होऊन वैयक्तिक मूल्यांचा प्रभाव नाहीसा होईल. **(Capital, Vol I, pp 46-47 .Vol III p. 641)''**

'' 2.3 अशाप्रकारे अधिक सूक्ष्म फरक केल्यावर वर सांगितलेल्या (2.2) चे नवीन स्वरूप असे होईल: 'वस्तूंच्या तुलनात्मक किंमती या बाजारातील तुलनात्मक किंमतीच्या प्रमाणात असतात.' तरीही हे विधान अजून पाहिजे तेवढे भेदक नाही. कारण निरनिराळ्या उद्योगधंद्यात भांडवलांचे आंगिक प्रमाण निरनिराळे असल्यास व वाढाव्याचा (अतिरिक्त मूल्याचा) दर सर्वत्र सारखा असल्यास बाजारातील किमतींनी होणाऱ्या खरेदी विक्रीने प्रत्येक उद्योगधंद्यातील नफ्याचा दर हा निरनिराळा राहील. मग कमी नफ्याच्या धंद्यातून जास्त नफ्याच्या धंद्यात भांडवल मुक्तपणे वाहू दिल्यास वरील सुधारित प्रमेयात आणखी निर्धारक वैशिष्ट्ये समाविष्ट करणे आवश्यक ठरेल. सर्व अर्थव्यवस्थेत एकच नफ्याचा दर प्रचलित आहे ही अट पुरी करण्यास बाजार किंमतीचे रूपांतर उत्पादनाच्या किंमतीत करावे लागेल.''

''2.4 आता (2.2) आणि (2.3) ही प्रमेये एकत्र केल्यास पुढील प्रमेय मांडता येईल. 'प्रगत भांडवलशाही अर्थव्यवस्थेत तुलनात्मक किंमती या उत्पादन किंमतीच्या प्रमाणात असतात (किंवा जर किंमती स्थिरमूल्य पैशाच्या स्वरूपात मांडल्या तर - हे स्थिरमूल्य एकजिनसी मानवी श्रमाच्या एककाएवढे असेल त्या उत्पादन किंमतींच्या इतक्याच असतात)'. पण अजूनही हे प्रमेय ज्या वास्तवाचा उलगडा करावयाचा त्यापेक्षा फारच अमूर्त आहे. कारण त्याच्यात किंमती ठरविण्याच्या प्रक्रियेतील पुरवठा मागणी यांच्या आविन्यासाकडे लक्ष दिलेले नाही. म्हणून आणखी एक निर्धारण त्यात घातले पाहिजे. ते तसे घातले म्हणजे त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे होईल. 'अल्पकालखंडातील वा तात्कालिक मागणी पुरवठ्याच्या परिस्थितीने होणारी तुलनात्मक व उत्पादन किंमती यामधली विचलने ( **deviations**) अनुमत धरल्यास तुलनात्मक किंमती या उत्पादन किंमतीच्या प्रमाणात असतात (समानुपाती असतात)'

आणखी दोन मुद्दे स्पष्ट केले पाहिजेत.

'' 2.5 प्रत्येक उद्योगात निर्माण होणाऱ्या वस्तूची उत्पादन किंमत ही दीर्घकालीन किंमत असते व ती त्या उद्योगातील उत्पादन परिव्ययात (खर्चात) सर्वसाधारण नफ्याचा दर मिळवण्यापासून सिध्द होते. **(Capital, III , p. 159)**... उत्पादन किंमतीचा उद्देश नैसर्गिक किंमतीचे 'खरे' स्वरूप स्पष्ट करण्यासाठी असतो. 'खरे ' याचा अर्थ आता नफ्याचा दर हा उत्पादन परिव्ययाचा (खर्चाचा) भाग म्हणून मानला जात नाही. आणि मूल्यांची उत्पादन किंमतीतील सर्वोच्चता (**Primacy**) नि:संशयपणे आता प्रस्थापित झाली आहे. प्रत्येक उद्योगधंद्यातले वेगवेगळे नफ्याचे दर हे वस्तूंच्या मूल्यातून

व्युत्पादिले पाहिजेत. अशा व्युत्पादनाशिवाय नफ्याचा सर्वसाधारण दर (आणि म्हणून उत्पादन किंमती) या संकल्पना धूसर व अर्थहीन राहतील.'' (**Ibid., p. 157**)

2.6 तुलनात्मक किंमतींचे गठन आणि उलगडा करण्याची मार्क्स यांची विवेचनाची पुनरावृत्ती पध्दत (अल्गोरिथम) लक्षात घेता उत्पादन किंमतींचे स्वरूप व त्यांची भूमिका ही वर सांगितलेल्या अमूर्त (तात्कालिक आणि म्हणून भ्रामक) साकल्याकडून मूर्त (योग्य प्रकारे परिष्कृत केलेल्या) गोष्टींकडे जाणाऱ्या प्रक्रियेतील त्यांचे नक्की स्थान ठरविल्याखेरीज शास्त्रीय होणार नाही. वरील प्रक्रियेतील अनुक्रम हा ऐतिहासिक नव्हे... एखाद्या सिध्दान्ताची बिनचूक उभारणी व त्यातील संकल्पनांचा अनुक्रम हा प्रत्यक्ष जगातील उत्क्रान्तीच्या अनुक्रमापेक्षा वेगळा असतो.

२.७ या विवेचनातील परिकर्मी (**operational**) पायऱ्यांना आशय देताना परिणामापासून कारणे व्युत्पादावयाची तर्कदुष्टता टाळली पाहिजे. उदाहरणार्थ 2.2 या पायरीवर भांडवलाचे आंगिक प्रमाण हे सर्व उद्योगधंद्यात सारखे आहे व 2.3 मध्ये ते बदलणारे आहे असे म्हणणे बरोबर नाही. (उदाहरणार्थ, मोरीशिमा, कॅटेफोरस, 1975 पा. 327) कारण 2.2 मध्ये उद्योगधंद्यातील भांडवल हे नफ्याच्या दराशी अजून मुळीच संबध्द झालेले नाही आणि म्हणून त्या भांडवलांच्या आंगिक प्रमाणांच्या सारखेपणाचा प्रश्न तेथे उद्भवतच नाही; (खरोखरी 2.2 मध्ये नफ्याचा दरच नाही)आणि म्हणून नफाही नाही. दोन्ही 2.3 मध्येच उद्भवतात.

### अर्थशास्त्रातील त्रिदळ : खंड, व्याज (नफा), वेतन

प्रत्येक विक्रेय वस्तूचा उत्पादन परिव्यय म्हणजे त्यात वापरल्या जाणाऱ्या उत्पादन घटकांच्या - श्रम, भांडवल, जमीन - भागांच्या किंमतींची - वेतन, व्याज-नफा, खंड-बेरीज असते हा ॲडम स्मिथ यांचा सिध्दान्त व त्यात अध्याहृत असलेले उत्पादन घटक व त्यांचा मुशाहिरा किंवा उत्पन्ने यांचे सुप्रसिध्द त्रिदल - जमीन-खंड, भांडवल-व्याज (नफा), श्रम-वेतन-यावर मार्क्स हल्ला चढवितात व प्रचलित परिस्थितीतील या गोष्टींच्या दृष्य वास्तव स्वरूपापासून अन्वेषणास सुरवात केल्यामुळे सनातन अर्थशास्त्र कसे चुकीचे सिध्दान्त बांधते हे ते विशद करतात.

जमीन-खंड: खंड म्हणजे जमीन या घटकाचे उत्पादनाला झालेले योगदान असा चुकीचा समज सर्वत्र आहे. तो तसा होण्याची कारणे स्पष्ट आहेत. भेददर्शी खंड हा खंडाचा सर्वात महत्त्वाचा प्रकार आणि भेददर्शी खंड हा जमिनीच्या उत्पादकतेनुसार कमीजास्त असतो हे सर्वांनाच दिसत असते. त्यामुळे जमिनीचे योगदान असेच खंडाचे स्वरूप सर्वांना मान्य होते आणि खंड हा वाढाव्याच्या स्वरूपाचा असून तो जमिनीपेक्षा मानवीश्रमातून उत्पन्न होतो हे सत्य झाकले जाते. खंडाचा संबंध फक्त जमिनीशी,त्याचा मानवीश्रमांशी काही संबंध नाही अशी समजूत त्यातून सहजच होते. शिवाय जमीन हा उत्पादक घटक- म्हणजे अर्थात मूल्य निर्माण करणारा - म्हणून शेतीत दिसतो. त्या उपयोग मूल्याचा विनिमयमूल्याशी घोटाळा करून तेच जमिनीचे स्वयंनिर्मित मूल्य आहे असे सहजच [24] वाटते.

मार्क्स यांच्या अन्वेषणात खंड हा दोन प्रकारचा आहे. एक, भेददर्शी आणि दुसरा केवळ (**absolute**). जमिनी निरनिराळ्या कसाच्या असतात. त्यामुळे त्यांच्यावर घेतल्या जाणाऱ्या पिकांचे उत्पादन परिव्यय निरनिराळे असतात. एकूण मागणी भागविण्याइतके त्या पिकाचे उत्पादन होण्यासाठी त्या पिकाला येणारी किंमत सर्वात जास्त उत्पादन परिव्यय असणाऱ्या म्हणजे सर्वात कमी कसाच्या जमिनीवर येणाऱ्या उत्पादन परिव्ययाइतकी असते. त्याहून चांगल्या कसांच्या जमिनींवर उत्पादन परिव्यय कमी असतो. म्हणून त्या जमिनींच्या उत्पादनांना त्या त्या जमिनीच्या कसाच्या प्रमाणात नफा सुटतो. हा नफा म्हणजेच भेददर्शी खंड होय. तो जमीन मालक घेतो. या शिवाय जी लागवडीच्या सीमेवरील जमीन असते- अर्थात सर्वात कमी कसाची - त्यावरील उत्पादन परिव्यय हा बाजारातील किंमती इतकाच असल्याने त्यावर अशा प्रकारचा खंड मिळत नाही. पण खंड मिळण्याची शक्यता असल्याखेरीज जमीनमालक आपली जमीन लागवडीस आणणार नाही किंवा लागवडीस देणार नाही. जमिनीच्या उत्पादनातून निदान सरासरी दराने नफा (खंड) मिळाल्याखेरीज भांडवलदार (शेतकरी) लागवड करणार नाही.[25] त्यामुळे या सीमेवरील जमिनीवर मिळतो तो केवळ खंड म्हणता येईल. पण केवळ खंडापेक्षा भेददर्शी खंड खरा महत्त्वाचा.

भेददर्शी खंड हा सकृद्दर्शनी जमिनीच्या विविध कसांच्या प्रमाणात ठरतो व तो जमिनीच्या सुपीकपणामुळे उत्पन्न होतो असे वाटते. पण तो आभास आहे. ज्याप्रमाणे भांडवलाची वस्तू म्हणून असणारी किंमत म्हणजे व्याज नव्हे तसेच जमिनीचे आहे. कारण जमिनीची जरी खरेदीविक्री होते तरी जमीन ही मानवीश्रमाने निर्माण केलेली विक्रेय वस्तू नव्हे. तिच्या उत्पादनात मानवीश्रम लागत नसल्यामुळे तिला मूल्यच नसते. परंतु त्यामुळे जमिनीची किंमत यदृच्छ ठरते असे नाही ती किंमत म्हणजे त्या जमिनीवर सुटणाऱ्या वा मिळणाऱ्या खंडाचे भांडवलीकरण करून झालेली किंमत असते. भांडवलशाहीत अशा प्रकारचा हिशेब योग्यच ठरतो. थोडक्यात जमीन म्हणजे कर्जाऊ दिलेल्या भांडवलासारखी असते. त्यावरून मार्क्स दोन निष्कर्ष काढतात. एक, ज्याला जमिनीच्या उपयोगाची किंमत

म्हणून म्हणतात त्याला खंडच म्हणणे योग्य कारण भांडवलशाहीत जमिनीचे मूल्य म्हणजे उत्पादनातील वाढाव्यावर ज्याचा अंश-हक्क असतो तो खंडच जमिनीच्या किंमतीचा पाया असतो. दुसरे, ही किंमत वर वर्णिल्याप्रमाणे असेल तर खंड ठरण्यापूर्वी किंमत ठरणे शक्य नाही. म्हणजे किंमत ठरण्यापूर्वी खंड ठरावा लागतो.

हे लक्षात न घेतल्यास नुसत्या वास्तवाच्या निरीक्षणाने व अभ्यासाने अनेक भ्रम निर्माण होतात. एक तर जमिनींच्या कसांच्या (एका नैसर्गिक वस्तूच्या) प्रमाणात खंड ठरतो व तो मानवीश्रमाशी निगडित नसतो, अशी समजूत होते. दुसरे, जमिनीलाच तिची उत्पादकता असते व त्यामुळे उपयोगमूल्याच्या उत्पादनाला जमीन नुसती आवश्यक नसते तर तिच्या वेगवेगळ्या कसांमुळेच ते उपयोगमूल्य स्वतंत्रपणे निर्माण होते असेही वाटते. त्यामुळे उपयोगमूल्य व विनिमयमूल्य यांच्यात घोटाळा निर्माण होतो. तिसरे, खरोखर पाहता जमीनमालक हे बांडगुळाप्रमाणे असतात. परंतु जमिनीकडे व्याज देणारे भांडवल यादृष्टीने पाहिल्यास खंड हे त्यांचे न्याय्य उत्पन्न आहे असा गैरसमज निर्माण होतो.

भांडवल-व्याज-नफा: एकूण भांडवलावरील नफ्यातील व्याज हा एक भाग आहे. नेहमीच्या नफ्याच्या दरात एकूण वाढाव्याच्या निर्मितीसंबंधी गैरसमज होतात याला तीन कारणे आहेत. (1) नफा हा एकूण चल व अचल भांडवलावर आकारण्याची पद्धत आहे. खरोखरी चलभांडवलावरच तो आकारल्यास त्यातून वाढाव्याचे स्वरूप व त्याचा दर स्पष्टपणे प्रत्ययास येईल.(2) उत्पादनातून निर्माण होणाऱ्या वाढाव्यातून नफा निर्माण होत असला तरी उत्पादित वस्तू विकल्याशिवाय तो भांडवलदारास प्राप्त होत नाही. उत्पादन व त्याची विक्री ही भांडवलाच्या परिचालन वेगावर अवलंबून असते. तेवढेच भांडवल त्याच्या दुप्पट वेगाने परिचालित झाल्यास नफा (वाढावा) दुप्पट होईल. याचा अर्थ भांडवलाच्या परिचालनाचा वेग हा नफा ठरविण्यातील एक महत्त्वाचा घटक आहे. मार्क्स यांच्या मते हा निर्धारक नकारपक्षी आहे. तो अधिक दराने वाढावा निर्माण करीत नाही पण त्या वाढाव्याचे नफ्याच्या स्वरूपात रुपांतर (विक्रीमार्फत) होण्याच्या प्रक्रियेत एक अडथळा निर्माण करतो. पण त्याच्या दृश्यस्वरूपात परिचालनामुळेच वाढावा निर्माण होऊ शकतो असा गैरसमज सहजपणे होतो.[26] (3) अर्थव्यवस्थेतील सर्वसाधारण नफ्याचा दर हा प्रत्येक उद्योगातील नफ्याच्या दराइतका नसतो. कारण सर्व अर्थव्यवस्थेतील चल व अचल भांडवल आणि एकूण वाढावा यांची ती सरासरी असते. त्यामुळे ज्या उद्योगातील भांडवलाचे आंगिक प्रमाण तेवढे ( म्हणजे सरासरी आंगिक प्रमाणाइतके) असते त्याच उद्योगात फक्त त्यांचा नफ्याचा दर सर्वसाधारण नफ्याच्या दराइतका असतो. इतर उद्योगातून तो कमी जास्त असतो. त्यामुळे प्रत्येक उद्योगातील चल भांडवल व मिळणारा नफा यांच्यात दाट सहसंबंध सापडत नाही.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत विक्रेयवस्तू त्यांच्या मूल्याइतक्याच किंमतीस बाजारात विकत गेल्यास व पिळवणुकीचा दर सर्वत्र सारखा आहे असे मानल्यास प्रत्येक उद्योगातील नफ्याचा दर त्या उद्योगातील भांडवलाच्या आंगिक प्रमाणानुसार बदलत राहील. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात असे होत नाही. आर्थिक स्पर्धेमुळे नफ्याचा दर उत्पादनात सगळीकडे सारखा होण्याकडे कल असतो किंवा तो सर्वत्र सारखा होतो. त्यामुळे काही उत्पादन किंमती मूल्यापेक्षा कमी व काही जास्त असे चित्र दिसते.

याचा भावार्थ असा की प्रत्येक भांडवलाला मिळणारा नफा हा त्या भांडवलात अंगीभूत झालेल्या वाढाव्यापेक्षा निराळा असतो. यावरून नफा हा कोणत्याही उद्योगातील भांडवल गुंतवणुकीशीच केवळ संबद्ध नसतो तर त्याचा त्या उद्योगातील भांडवलाच्या आंगिक प्रमाणाशी घनिष्ठ संबंध असतो. सर्वसाधारण नफ्याच्या दरामार्फत नफ्याचा एकूण अर्थव्यवस्थेतील भांडवल गुंतवणुकीशी (तिच्या राशीशी) संबंध असतो. हे आन्तरिक संबंध नुसता नफ्याचा दर विचारात घेतल्यास नजरेस येत नाहीत. त्यामुळे फसगत होते.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत पैशाच्या राशीचा भांडवल गुंतवणुकीत कायापालट करता येतो. त्यामुळे तिला एक नवे उपयोगमूल्य प्राप्त होते. म्हणजेच पैशाची राशी ही अशा भांडवल गुंतवणुकीच्या रुपात विक्रेयवस्तू होते. त्या वस्तुचे मूल्य म्हणजे व्याज. अशा प्रकारे होणारी पैशाची 'विक्री' व त्याची ' किंमत' यांना काही वैशिष्ठ्ये प्राप्त होतात. एक तर पैशाची विक्री याचा अर्थ त्याच्या उपयोमूल्याची विक्री असा आहे. पैशाच्या विनिमयमूल्याची विक्री या शब्दसंहतीला काहीच अर्थ नाही. प्रत्यक्षात काही मुदतीसाठी पैसे उसने दिले जातात. त्याची सव्याज फेड मुदतीनंतर करावयाची असते. उसन्या दिलेल्या पैशाच्या विनिमयमूल्यावर व्याज नसते तर त्याच्या उपयोगमूल्यावर असते. याला दुसरा दाखला मार्क्स श्रमशक्तीच्या खरेदी-विक्रीचा देतात. गुलामगिरी असणाऱ्या समाजात गुलामांची - म्हणजे त्यांच्या श्रमशक्तीची - खरेदी विक्री होते. म्हणजे गुलामाचे शरीर हीच विक्रेयवस्तू होते. काटेकोरपणे बोलावयाचे तर भांडवलशाहीत कामगार आपली श्रमशक्ती तात्पुरती वा अल्पकाळापुरती वापरण्यासाठी भांडवलदाराला विकतात. दुसरे, पैशाची भांडवल म्हणून व्याजरुपाने होणारी किंमत ही 'खरी किंमत' नसते. 'खरी किंमत' म्हणजे मूल्याचे पैशातील स्वरूप अशी मार्क्स यांची

व्याख्या आहे. पण एकाच पैशाच्या राशीला पैशाची म्हणून एक व भांडवलाची म्हणून दुसरी अशा दोन किंमती असणे शक्य नाही. कारण पैसा हा एकदाच उत्पादिला जातो. पैशाची किंमत म्हणजे त्याची दर्शनी किंमत होय, त्यावर मिळणारी संवृध्दी (**increment**) किंवा वाढ नव्हे. म्हणून खरी किंमत जरी मूल्यसिध्दान्तानुसार ठरते तरी व्याज ठरत नाही. उलट, भांडवल गुंतवणुकीसाठी जो पैसा वापरावयाचा त्याच्या मागणी पुरवठ्यावरून व्याजाचा दर ठरतो.

व्याजाचा उगम एकच असू शकतो. भांडवलधार स्वत:चे भांडवल वापरू शकतो तसेच ते दुसऱ्याकडून कर्जाऊ घेऊनही वापरू शकतो. त्या कर्जाऊ भांडवलावर त्याला व्याज द्यावे लागते. आणि त्याच्या उत्पन्नाचा एकमेव उगम हा त्याला नफ्याच्या रूपाने मिळणारा वाढावा हाच असल्याने व्याज त्याच्या नफ्यातूनच येते. भांडवलदाराच्या उत्पन्नातून कर्जाऊ भांडवलावर द्यावे लागणारे व्याज वजा केल्यावर उरतो तो 'उत्पादन उपक्रमाचा नफा' (**pofits of enterprise**) असे मार्क्स म्हणतात.

श्रम-वेतन: यासंबंधी आधीच्या भागात चर्चा केलेली आहे म्हणून त्याची पुनरुक्ती येथे करीत नाही.

परीक्षण

मार्क्स यांच्या अन्वेषणरीतीची उकल करून प्रत्यक्ष लिखाणात ते ती कशी वापरतात हे येथवर सांगितले. आता त्याच्या व त्यातून त्यांनी व्युत्पादिलेल्या सिध्दान्तांच्या परीक्षणाकडे वळले पाहिजे. हे परीक्षण मार्क्स यांचे सिध्दान्त वैज्ञानिक कसोटीस उतरतात की नाही हे पाहण्यासाठी करावयाचे आहे. त्या संबंधीचे गैरसमज टाळण्यासाठी या परीक्षणाचे ध्येय व कक्षा रेखीव स्वरूपात सांगणे आवश्यक आहे. यापूर्वीच स्पष्ट केल्याप्रमाणे मार्क्स हे क्रियावान पंडित होते. अभ्यास हे साधन व त्यातून निघणाऱ्या क्रिया हे साध्य याबद्दल त्यांच्या मनात संदेह नव्हता. त्यांचे सर्व अन्वेषण, लिखाण, चळवळी, वगैरे भावी साम्यवादी क्रान्तीस पोषक व प्रेरक व्हावे असा त्यांचा हेतू होता. या त्यांच्या स्वत:च्या निकषाप्रमाणे त्यांच्या लिखाणाची परीक्षा केल्यास त्यांची मीमांसा कृतीच्या पातळीवर अत्यन्त यशस्वी झाली हे मान्य केलेच पाहिजे. त्यांचा ध्येयवाद, त्यातील मानवतेचे भव्य स्वरुप, अन्यायाबद्दलची चीड, मानवी जीवनाच्या मांगल्याचा हव्यास, वगैरे त्यांच्या लिखाणात सर्वत्र सापडणाऱ्या मूल्यांमुळे त्याचा भावनात्मक आघात फार जोरदार, विस्तृत व चिरकालीन झालेला आढळतो. त्यांच्या लिखाणातून स्फूर्ती घेऊन हजारो लोक उद्दीपित झाले. त्यापैकी काहींनी आपल्या प्राणांची बाजी लावून साम्यवादी क्रान्ती घडवून आणण्याचे प्रयत्न केले व आजही करीत आहेत याला इतिहास साक्ष आहे. त्यात मतभेदास मुळीच जागा नाही.

पण या निकषावर येथे परीक्षा करावयाची नाही. येथे चर्चा करावयाची आहे ती मार्क्स यांचे अर्थशास्त्रीय सिध्दान्त बुध्दिनिष्ठरीत्या वैज्ञानिक पातळीवर सिध्द होतात की नाहीत याची. ते तसे सिध्द झाले नाहीत तरी त्यांच्या प्रत्यक्षातील घटनांवर होणाऱ्या परिणामास काहीच बाधा येत नाही. इतिहासाची प्रेरणा व कारकशक्ती सर्वस्वी वैज्ञानिक असते वा असावयास पाहिजे असा दावा कोणीच केलेला नाही व प्रस्तुत लेखकासही करावयाचा नाही. बुध्दिनिष्ठ अन्वेषणाने आपले सिध्दान्त सिध्द करण्याची मार्क्स यांची ईर्षा होती याचा उल्लेख पूर्वीच केला आहे. त्याचप्रमाणे आपले अर्थशास्त्र वैज्ञानिक आहे व इतरांचे अवैज्ञानिक आहे असे मार्क्स यांनी अनेकदा म्हटलेले आहे. येथील परीक्षणाचा संदर्भ तोच आहे. मार्क्स यांची विचारसरणी प्रत्यक्षात यशस्वी झाली तेव्हा या इतर परीक्षा अर्थहीन आहेत असे ज्याना म्हणावयाचे असेल तसे त्यांनी खुशाल म्हणावे. आमचे तसे मत नाही.

ही परीक्षा दोन टप्प्यामध्ये करावी लागेल. वैज्ञानिक सिध्दान्त हे निगमन व विगमन या दोन्ही कसोट्यांना उतरावे लागतात हे सर्वमान्य तत्त्व ध्यानात घेतले तर या दोन्ही तर्कपध्दतीनुसार त्यांची दोन भागात परीक्षा करावी लागेल. पहिल्या भागात मार्क्स यांच्या सिध्दान्तांची निगमनाने परीक्षा करावयाची म्हणजे त्यांची तार्किक सुसंगती (गणिती सुसंगती हा याचाच एक भाग) तपासावयाची. दुसऱ्या भागात विगमनाने म्हणजे अनुभवानुसरणाने त्यांची परीक्षा करावयाची. या विगमनी परीक्षेत दोन पोटभाग पडतात. मार्क्स यांनी विगमनाच्या साहाय्याने जी मीमांसा केली ती किती बिनचूक व परिपूर्ण आहे याचे परीक्षण. त्यातही दोन उपपोटभाग पडतात. एक, जी उपलब्ध माहिती मार्क्स यांनी वापरली ती त्यांनी किती वस्तुनिष्ठपणे वापरली? दुसरे त्यांना उपलब्ध असलेल्या माहितीच्या काही मर्यादा होत्या का की ज्यामुळे त्यांचे विवेचन मर्यादित झाले? शिवाय त्यांना जी माहिती उपलब्ध होती त्याहून जास्त माहिती आता उपलब्ध झाली असल्यास तिच्यामुळे त्यानी केलेल्या अन्वेषणास बाद येतो का?

या नंतरचा परीक्षणाचा भाग सिध्दान्तांच्या अनुभवानुसरणाचा. विगमनाने सिध्दान्त सिध्द करावयाचा मार्ग एकच आता मान्य झालेला आहे. तो म्हणजे त्याच्या साहाय्याने पूर्वानुमान करता येते की नाही व ते इतिहासात व प्रत्यक्षात कितपत बरोबर आलेले आहे?

वर निर्देशिलेल्या टप्प्यांनी आता मार्क्स यांच्या सिध्दान्तांचे परीक्षण करू या. या परीक्षेसाठी मार्क्स यांचे काही निवडक व

महत्त्वाचे सिध्दान्तच विचारात घेता येतील. सर्व सिध्दान्तांची परीक्षा येथे शक्य नाही. येथे पुढील सिध्दान्त परीक्षेसाठी घेतले आहेत. (1) मार्क्स यांचा मूल्य सिध्दान्त (2) नफ्याच्या दराच्या घटत्या प्रवृत्तीचा सिध्दान्त (3) विस्तारित पुनरुत्पादनाचा सिध्दान्त.

मूल्य सिध्दान्त : पूर्वी वर्णन केल्याप्रमाणे प्रत्यक्षातील तुलनात्मक किंमती या विनिमय मूल्यांच्या प्रमाणात ठरतात व वस्तूंच्या उत्पादनात जे सरासरी कसबांचे व घनतेचे सामाजिकदृष्ट्या आवश्यक मानवीश्रम अंगीभूत होतात ते त्या वस्तूचे विनिमयमूल्य असते हा सिध्दान्त मार्क्स यांनी मांडला आहे. हे सिध्द करण्यासाठी मूल्यांचे किंमतीत रुपांतर कसे होते हे अंकगणिती उदाहरणांच्या साहय्याने मार्क्स यांनी भांडवल खंड 3, मध्ये विवेचिले आहे. हे विवेचन किती तर्कशुध्द वा गणितशुध्द आहे यावर प्रदीर्घ काळ, कसून व कडवट चर्चा झालेली आहे आणि तिचा निष्कर्ष मार्क्स यांना प्रतिकूल लागलेला आहे. मार्क्स यांच्या सिध्दीतील दोष दोन. (1) मूल्यांचे किंमतीत रुपांतर करताना जी अल्गोरिथम पध्दती मार्क्स वापरतात ती त्यांनी त्या प्रक्रियेची आवर्तने पूर्ण होईपर्यंत न वापरता अर्धवट वापरली आहे व या अर्धवट सोडवणुकीचे उत्तर आपल्याला अनुकूल असे काढले आहे. ते बरोबर नाही कारण ते अंतिम उत्तर नव्हे. त्या अल्गोरिथमची सर्व आवर्तने पुरी करावयाची तर मार्क्स यांच्या उदाहरणातील चल आणि अचल भांडवलांच्या मूल्यांचेही किंमतीत रुपांतरण केले पाहिजे. ते मार्क्स करीत नाहीत. तसे केल्यास येणारे उत्तर मार्क्स यांच्या सिध्दान्ताच्या सिध्दीस हवे तसे येत नाही. हे अनेकवार सिध्द झाले आहे.(2) मार्क्स यांनी या सिध्दीसाठी वापरलेले अर्थव्यवस्थेचे प्रतिमान कमालीचे अवास्तव आहे. त्यात जोड उत्पादन नाही व कोणतीही वस्तू एकापेक्षा जास्त उत्पादन तंत्रांनी निर्माण होत नाही . प्रत्यक्षातील भांडवलशाही अर्थव्यवस्थेपासून हे प्रतिमान इतके लांब आहे की ते संपूर्णपणे काल्पनिक आहे, वास्तव नाही, असेच मानणे भाग आहे.

मोरीशीमा व इतरांनी गणिताच्या साहय्याने वरील निष्कर्ष खात्रीपूर्वक काढला आहे. पण त्यानंतर पुन्हा एकदा मॉरीशीमा व कॅटेफोरस यांनी या प्रश्नाची निराळ्या प्रकारचे गणित वापरून परीक्षा केली व मार्क्स यांना अनुकूल असे उत्तर येते अशी ग्वाही दिली. त्यांचे म्हणणे असे की त्यापूर्वीची परीक्षा त्यांनी समीकरणांच्या पध्दतीने केली होती. पण समीकरण पध्दती गणितदृष्ट्या फार मर्यादित व्याप्तीची असते. त्याऐवजी विषमिका ( inequalities ) पध्दती वापरल्यास या मर्यादा दूर होतात. मग त्यासाठी अलगोरिथम पध्दती व मार्कोव्हशृंखलांचे गणितही वापरता येते. ही सर्व वापरून मूल्यांचे किंमतीत रुपांतर मार्क्स यांच्या श्रममूल्यसिध्दान्तास अनुरुप असे होऊ शकते व मार्क्स यांचा नफ्याच्या घटत्या दराच्या प्रवृत्तीचा सिध्दान्तही सिध्द होतो. पण हे सर्व होण्यास मूल्याचे माप श्रमकाल हे भांडवल ग्रंथात म्हटल्याप्रमाणे अर्थव्यवस्थेतील 'सरासरी' प्रमाणाचे न घेता त्याच्या पूर्वी मार्क्स यांनी म्हटल्याप्रमाणे कोणत्याही वस्तूच्या निर्मितीस लागणारा 'कमीतकमी' कालखंड असे घेतले पाहिजे. तसे घेतले नाही तर मात्र या गणितानेही मार्क्स यांचे प्रमेय सिध्द होत नाही. (पदटीप 22 पहा ).

या सोडवणुकीत बऱ्याच अडचणी आहेत. श्रमकाळाची वरील व्याख्या मान्य केली तरी या गणितातली एक गोम या सिध्दीला अर्थहीन ठरविते. ती म्हणजे या गणिताने ( विषमिका, वगैरे ) सिध्द होणारी मूल्ये अयोगशील ( **non-additive** ) म्हणजे बेरीज न करता येण्याजोगी असतात. हे मान्य केले तर मार्क्स यांचे बरेचसे इतर विवेचन रद्द समजावे लागेल. कारण मूल्ये ही योगशील आहेत हे मार्क्स यांनी गृहीतच धरले आहे. **e +v+s=p** व **M-C-C'-M'** ही अनुक्रमे मूल्यांची समीकरणे व भांडवल अभिसरणाची प्रक्रिया याबद्दल मार्क्स यांनी सर्वत्र वापरलेली समीकरणे चुकीची व गैरलागू ठरतील.[27]

मार्क्स यांनी भांडवल ग्रंथात दिलेली व्याख्या सोडून त्यांनी वीस वर्षांपूर्वी दिलेली दुसरी व्याख्याच जास्त ग्राह्य आहे असे म्हणणे ह्याचा अर्थ मार्क्स यांनी या विषयावर दरम्यानच्या वीस वर्षांत चुकीचा विचार केला असा होतो. आणि तसे समजावयास त्यांची वीस वर्षांनंतरची व्याख्या आमच्या नव्या गणितात बसत नाही एवढेच कारण दिसते. अर्थात ते ग्राह्य धरता येणार नाही.

यापेक्षाही अधिक बलवत्तर असा या युक्तिवादावरचा आक्षेप असा की कमीत कमी श्रमकाळ हा मूल्यांचा निर्णायक असेल तर मार्क्स यांचे जमिनीच्या खंडासंबंधीचे सर्व सिध्दान्त उध्वस्त होतात. कमीतकमी श्रमकाळाने ठरलेली किंमत (मूल्य) बाजारात प्रचलित होत असेल तर फक्त उत्तम कसाच्या जमिनींवरच पीक घेणे परवडेल. मग विभेदी खंड उद्‌भवणारच नाही. मार्क्स यांच्या सिध्दान्तनातच आन्तरविरोध निर्माण करणारी ही या सिध्दान्ताची सोडवणूक खरी कशी मानता येईल?

मार्क्स यांच्या श्रममूल्य सिध्दान्ताबद्दलच्या या टीकेचा प्रतिवाद मार्क्सवादी दोन प्रकारे करतात. एकतर मूल्यांचे किंमतीत रुपान्तरण ही प्रक्रिया मार्क्स यांच्या अर्थशास्त्रात अनुषंगिक अथवा दुय्यम महत्त्वाची आहे. तो सिध्दान्त गणिताने असिध्द ठरला तर त्यामुळे मार्क्स यांच्या इतर सिध्दान्ताना बाध येत नाही. बाजारातील किंमती कशा ठरतात हा क्षुद्र प्रश्न आहे. तो यशस्वीरीतीने सोडविता आला नाही तरी त्याने काही बिघडत नाही. हा युक्तिवाद खोटा आहे आणि आत्मवंचक आहे.

भांडवलशाहीतील अर्थव्यवहाराचे मुख्य सुकाणू किंमत व्यवस्थेत आणि तेच मार्क्स यांच्या सिध्दान्ताने उलगडत नाही म्हणून कमी महत्त्वाचे असे समजणे हा आत्मवंचनेचा प्रकार आहे. क्षणभर असे मानले की किंमती ठरण्याच्या प्रक्रियेला फार महत्त्व देण्याचे कारण नाही तरी नफ्याच्या दराच्या ठरण्याचे असामान्य महत्त्व तर मार्क्सवाद्यांनाही अमान्य करता येणार नाही. ( आणि मार्क्स यांनी केलेलेही नाही. ) मूल्यांचे किंमतीत रुपांतर होण्यासाठी सर्वसाधारण नफ्याच्या दराची ठरवणूक आवश्यक आहे कारण तो ठरल्याखेरीज उत्पादन किंमती ठरत नाहीत. किंमती ठरल्यावर नफ्याचा दर ठरतो असे मानावयाचे म्हणजे किंमतींचा पाया मूल्ये नाहीत हे मान्य करणेच होय. मार्क्स यांनाही हे अन्यायाचे आहे.

दुसरा प्रतिवाद असा की मार्क्स यांनी वाचकांच्या सुलभ आकलनासाठी जी अमूर्त व साधी सरळ अंकगणिती उदाहरणे दिली आहेत ती म्हणजेच त्यांच्या सिध्दान्ताचे गणितीरुप आहे ही समजूत चुकीची आहे. मार्क्स यांची गणिते परमार्थाने घेता उपयोगी नाहीत. उदाहरणार्थ, बारकिविझ व विंटरनिट्झ् यांनी मार्क्स यांच्या मूल्यांच्या किंमतीतील रुपांतरणा संबंधीच्या कोष्टकांचा उलगडा करताना किंमतींची बेरीज व मूल्यांची बेरीज हयाचे समीकरण असते असे गृहीत धरून त्याच्याशी सुसंगत अशी समीकरण पध्दती शोधण्याचा प्रयत्न केला आहे. पण ही सोडवणूक मार्क्स यांच्या विचारसरणीशी पूर्णपणे विसंगत आहे. अतएव त्यांचे निष्कर्ष चूक आहेत असा दावा शेमॅटेन्काव्ह यांनी केला आहे.[28]

हा प्रतिवाद सोव्हिएट यक्षभूमीतून आला असला तरी फार घोटाळ्याचा आहे. मार्क्स यांची उदाहरणे ढोबळ व अंकगणिती आहेत. पण मोरीशीमा वगैरेंनी जटिल बीजगणिताच्या स्वरूपातच त्यांची छाननी केलेली आहे व त्यातूनही काही निराळे सिध्द होत नाही हे आपण वर पाहिलेच आहे. दुसरे मार्क्स यांची उदाहरणे ढोबळ व केवळ सुलभ समजुतीसाठी तर त्यांच्या सिध्दान्तांशी पूर्णपणे सरूप अशी दुसरी उदाहरणे कोणती हे शेमॅटेन्काव्ह सांगत नाहीत व दुसऱ्या कोणीही मांडली असल्यास आढळत नाहीत. तेव्हा पुन्हा हा एक आत्मवंचनाचाच प्रकार म्हणावा लागेल.

खरी गोष्ट अशी आहे की आपण काय करीत आहोत याची मार्क्स यांना पूर्ण कल्पना होती. मूल्यांच्या किंमतीतील रुपांतरणाच्या प्रक्रियेत एकूण मूल्य = एकूण किंमती व एकूण नफा = एकूण अतिरिक्त मूल्य ही दोन्ही समीकरणे एकाच वेळी सिध्द झाल्याशिवाय श्रममूल्य सिध्दान्त उभा राहू शकत नाही व सिध्दही होत नाही याची मार्क्स यांना पूर्ण कल्पना होती. तशी उत्तरे मिळाल्याबरोबर त्यांनी अलगोरियम तेथेच थांबवला. त्यांची पुढची आवर्तने फार महत्त्वाची नाहीत असे त्यांना वाटले असावे. दुर्दैवाने ते खरे नव्हते.

नफ्याच्या घटत्या दराची प्रवृत्ती : मार्क्स यांनी आपल्या श्रममूल्य सिध्दान्तनातून काढलेला मुख्य सिध्दान्त म्हणजे भांडवलशाहीत नफ्याच्या दराची सतत घट होण्याची प्रवृत्ती हा होय. भांडवलशाही आपल्या आन्तरिक विरोधातूनच कशी कोसळणार आहे हे दाखविण्याच्या मुळाशी ही प्रवृत्ती आहे असे मार्क्स यांचे प्रमेय आहे.

या प्रमेयाचा निगमनाने विचार करावयाचा तर प्रथमच प्रश्न उद्भवतो की प्रवृत्ती सांगणारा नियम अथवा निष्कर्ष याला सिध्दान्त म्हणता येईल का? अर्थशास्त्राचे नियम हे प्रवृत्तीसंबंधी असतात असे नवसनातन अर्थशास्त्राचे गृहीत आहे व अशाप्रकारे सिध्दान्त करता येतात ही गोष्ट ग्राह्य समजली जाते. परंतु निगमनीय तर्कशास्त्राप्रमाणे प्रवृत्तीविषयक विधान हे सिध्दान्त पदवीस पोचू शकत नाही. कारण प्रवृत्ती ही विशिष्ट स्थळकाळ निबध्द असते. म्हणून त्यातून विशिष्ट विधानच निघू शकते. त्याला सर्वसाधारणत्वाचे गुण प्राप्त होत नाहीत आणि जे सर्वसाधारण नसते त्याला सिध्दान्त म्हणणे चूक आहे. तेव्हा प्रथम तो सिध्दान्त नाही हे पक्के.

दुसरे, मार्क्स यांनी केलेले हे प्रवृत्तिविषयक विधान त्यांनीच नोंदलेल्या त्या प्रवृत्तीविरुध्द जाणाऱ्या इतर गोष्टींच्यामुळे निर्बल झालेले आहे. या प्रवृत्तीच्या विरूध्द दिशेने काम करणाऱ्या 6 किंवा अधिक प्रवृत्ती मार्क्स यांनी नोंदल्या आहेत. तर्कशास्त्राच्या दृष्टीने याचा अर्थ मूळ सिध्दान्त वा नियम हाच चुकीने अनुमानित केला गेला आहे. जो नियम त्याच्याशी विरोधी प्रवृत्तींमुळे निष्प्रभ होण्याचा धोका आहे तो मुळातच नियम या पदवीस योग्य नाही असे कोणीही तर्कशास्त्री म्हणेल.

(3) विस्तारित पुनरुत्पादन सिध्दान्त: भांडवल शाहीच्या अन्वेषणात त्या पध्दतीच्या गतीच्या नियमांचा मागोवा घेताना साधी पुनरुत्पादन पध्दती व विस्तारीत पुनरुत्पादन पध्दती यांची चर्चा मार्क्स प्रतिमानांच्या साहयाने करतात. ज्या अर्थव्यवस्थेत फक्त पुनरुत्पादन होते अशा अर्थव्यवस्थेचे अंकगणिती प्रतिमान मार्क्स उभारतात व अशी पध्दती कालातीतपणे पुनरुत्पादन कशी करू शकते हे दाखवतात. ( अक्षय गतीने चालणारे यंत्र यामागची हीच कल्पना आहे ) त्यानंतर ते विस्तारीत पुनरुत्पादन करणाऱ्या अर्थव्यवस्थेचे प्रतिमान उभारतात व त्याच्या अन्वये वर्धिष्णु भांडवलशाही अर्थव्यवस्था कशी चालते, तिच्यात भांडवलाचा संचय कसा होतो व या प्रक्रियेतच तिच्या नाशाची बीजे कशी उत्पन्न होऊन वाढतात हे दाखवून भांडवलशाहीचा अपरिहार्य अंत त्यातून सूचित करतात. सोईसाठी विस्तारित पुनरुत्पादित अर्थव्यवस्थेच्या मार्क्सकृत अंकगणिती प्रतिमानाचे कोष्टक येथे संदर्भासाठी उतरून घेऊ. ( भांडवल, खंड 2)

**विस्तारित पुनरूत्पादन अर्थव्यवस्थेचा तक्ता**
**( माप-श्रमतास )**

| उत्पादन काळ (वर्ष) | | अचल भांडवल | | चल भांडवल | | अतिरिक्त मूल्य | एकूण उत्पादन | विभाग अ- भांडवली वस्तू ब - उपभोग्य वस्तू |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अ | 4000 | + | 1000 | + | 1000 | =6000 | |
| | ब | 1500 | + | 750 | + | 750 | =3000 | |
| 2 | अ | 4400 | + | 1100 | + | 1100 | =6600 | |
| | ब | 1600 | + | 800 | + | 800 | =3200 | |
| 3 | अ | 4880 | + | 1210 | + | 1210 | =7260 | |
| | ब | 1760 | + | 880 | + | 880 | =3520 | |
| 4 | अ | 5324 | + | 1331 | + | 1331 | =7986 | |
| | ब | 1936 | + | 968 | + | 968 | =3872 | |
| 5 | | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| 6 | | वगैरे | | | | | | |

या कोष्टकातील आकडे व त्याचा उलगडा विस्तारश: करण्याची गरज नाही. दुसऱ्या वर्षापासून किंवा दुसऱ्या उत्पादन काळापासून 1.1 या गुणांकाने मागील वर्षांच्या आकडयांना गुणल्यास पुढील वर्षाचे आकडे मिळतात. याचा अर्थ दरवर्षी 10 टक्के या अचर गतीने एकूण उत्पादनाची वाढ होत असलेल्या अर्थव्यवस्थेचे हे प्रतिमान आहे. हल्ली ज्याला अचर गती प्रतिमान म्हणतात त्या सारखेच.

यातील पहिली गोष्ट लक्षात घ्यावयाची ती ही की मूल्यांचे किंमतीत रुपान्तरण करण्याच्या अलगोरिथममध्ये मार्क्स यांनी जी चूक केली तीच चूक येथेही पुन्हा केली आहे. म्हणजे अर्थव्यवस्था एका वर्षातून पुढच्या वर्षात संक्रान्त होत असताना मूल्यांचे किंमतीत रुपान्तरण होते ही गोष्ट या प्रतिमानात समाविष्टच केलेली नाही. त्यामुळे यातील सर्व आकडे मूल्यांचे आहेत किंमतींचे नाहीत. प्रत्येक वर्षात ( उत्पादन कालखंडात ) भांडवली वस्तू उत्पादन कक्ष व उपभोग्य वस्तू उत्पादन कक्ष यांच्यात खरेदीविक्री व्हावयास हवी. ती मूल्यात न होता किंमतीत होणार हे उघड आहे. म्हणून या कोष्टकातील प्रत्येक उत्पादन काळातील प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी मूल्यांचे किंमतीत रुपान्तरण झाले पाहिजे. मग त्यातून सिध्द झालेले आकडे पुढच्या उत्पादन काळातील प्रक्रियेसाठी घेतले पाहिजेत. तसे येथे काहीच होत नाही. याचा अर्थ प्रतिवर्षाची प्रक्रिया पूर्ण होऊ न देता ती अपक्व अर्थव्यवस्थाच पुढच्या वर्षीच्या प्रक्रियेस पाया म्हणून घेण्यात आली आहे. पिलाची पूर्ण वाढ होण्याआधीच हे कुक्कुटफळ फोडण्यात आले आहे.

आणखी एक मोठा घोटाळा या प्रतिमानात आहे. यात फक्त चल व अचल भांडवलाचा समावेश आहे. स्थिर ( **fixed** ) भांडवलाचा नाही. ते प्रतिमानाबाहेरच आहे आणि ते कसे संचित होते, वाढते हे दाखविण्यासाठी त्या प्रतिमानाच्या उभारणीचा खटाटोप आहे.हॅमलेटला वगळून हे हॅमलेट नाटक आहे! स्थिर भांडवलाचा समावेश या प्रतिमानात करावयाचा तर स्थिरभांडवल हे साठास्वरूपी असते व चल आणि अचल भांडवल हे प्रवाहरुपी असते हे लक्षात घेतले पाहिजे. भांडवलाची ही दोन्ही रुपे संमेय नसतात. त्यांची बेरीज केल्यास त्यात मितीय दोष उत्पन्न होतो व ती चूक ठरते.[29]

या संभाव्य मितीय दोषाकडे दुर्लक्ष करून या प्रतिमानाचे गणिती प्रतिमान स्वीझी यांनी उभारले आहे व त्याचे परीक्षण केले आहे. त्यात भांडवलाचे प्रवाही रूप स्वयंप्रज-स्वत:च स्वत:ची वाढ करणारे - असते असे आवर्जून सांगितले आहे. चल भांडवलाचा प्रवाह वेतन रुपाने कामगारांना मिळून तो त्यांच्याकडून उपभोग्य वस्तूंच्या खरेदीसाठी वापरला जातो व

त्याचवेळी तो पुढच्या उत्पादन काळात वापरण्यासाठी साठा म्हणून उपलब्ध होतो. 'चल भांडवलाची वाढ ही संचयास वाव देते व त्याच वेळी ती उपभोगातलीही वाढ असते'.[30] थोडक्यात तुम्हाला दिलेला लाडू खाताही येतो व पुढच्या वेळेसाठी राखूनही ठेवता येतो!

हीच गोष्ट आणखी सोप्या रीतीने सांगावयाची तर या प्रतिमानातील वाढत्या आकड्यांतून अचल व चल भांडवल यांचे प्रवाह एकमेकाच्या प्रमाणात ( फक्त मूल्यात मोजून ) कसे वाढतात हे दिसते. पण येथे वाढणारे अचल भांडवलाचे आकडे त्यावेळी अस्तित्वात असलेल्या स्थिरभांडवलाची उत्पादनामुळे झालेली झीज दर्शवितात. या प्रतिमानातील भांडवलदारांनी केलेल्या आपल्या उत्पन्नातील बचतीतून ही झीज भरून काढण्याची तरतूद होते. पण ती ज्या स्थिरभांडवलाची झीज असते. ह्या स्थिरभांडवलाची वाढ होण्याची त्यात काहीच तरतूद नाही. त्यासाठी दुसरी कडून कोठूनतरी भांडवल आले पाहिजे. प्रतिमानातूनच ते यावयाचे तर वर म्हटल्याप्रमाणे प्रवाही भांडवल स्वयंप्रज असले तरच ते होऊ शकेल. ते तसे नसते हे सांगावयास नकोच. [31]

प्रथम सांगितल्याप्रमाणे या प्रतिमानातील अलगोरियम अपूर्ण आहे. शिवाय त्यात स्थिरभांडवलाची वाढ कशी होते याचा खुलासा होत नाही. मार्क्स यांचे हे प्रतिमान त्यातील मितीय दोष दूर करून मांडून सोडविल्यास त्यातून मार्क्स यांना हवी अशी उत्तरे मिळत नाहीत. त्यातून भांडवलशाही अर्थव्यवस्था तिच्यातील अन्तर्गत वाढीच्या प्रक्रियेनेच कोसळून पडते हा मार्क्स यांचा सिध्दान्त सिध्द होत नाही.

**विगमनीय परीक्षा**

मार्क्स यांच्या या सिध्दान्ताचे आता विगमनीय परीक्षण करू. पण त्यापूर्वी विगमनाने मार्क्स यांच्या सिध्दान्तांची परीक्षा करण्यासच काही मार्क्सवाद्यांचा विरोध आहे त्याची थोडी चर्चा प्रस्तुत आहे. यासंबंधीच्या मार्क्सवाद्यांच्या युक्तिवादाचा प्रकार म्हणून रोस्डॉलस्की या निष्ठावंत मार्क्स अनुयायाचे विवेचन पाहण्यासारखे आहे. **The Making of Marx's Capital** या ग्रंथात रोझा लक्झेंबूर्ग यांनी मार्क्स यांच्या पुर्नत्पादन प्रतिमानाविषयी केलेल्या टीकेस उत्तर देताना त्यांनी लिहिले आहे.

'' जर कॅपिटलच्या दुसऱ्या खंडातील पुनरुत्पादनाच्या आराखड्यात व विवेचनात मार्क्स यांना प्रत्यक्ष जगातील ऐतिहासिक आर्थिक विकासाचे चित्र रंगवावयाचे असते तर लक्झेंबूर्ग यांची टीका बरोबर ठरली असती. परंतु त्या प्रतिमानात मार्क्स यांना त्या आर्थिक प्रक्रियेच्या मूलस्वरुपाची **(fundamental form)** अमूर्त अभिव्यक्ती ( **abstract expression** ) करावयाची होती. परंतु लक्झेंबूर्ग हे लक्षात घेत नाहीत. त्यांना असे वाटते की जेव्हा विवेचनाचा विषय व्यष्टीय भांडवल हा असतो त्यावेळी त्या विवेचनात सर्वच्या सर्व आर्थिक प्रक्रियाच नव्हे तर प्रत्यक्षातील भांडवलशाहीच्या मूर्त वास्तवाचाही समावेश झाला पाहिजे. हे त्यांचे गृहीतक लक्षात घेतले म्हणजे तिसऱ्या खंडातील मार्क्स यांचे विवेचन रक्तहीन व काल्पनिक आहे असे त्या का म्हणतात व मार्क्स यांनी ऐतिहासिक वास्तवाची परिस्थिती त्या विवेचनात लक्षात न घेता अमूर्तनच केले आहे असा आरोप त्या मार्क्स यांच्यावर का करतात हे ध्यानात येते. त्यांना अभिप्रेत असलेली सर्व ऐतिहासिक परिस्थिती म्हणजे काय? अधिक बारकाईने पाहिल्यास लक्झेंबूर्ग जरी सर्व ऐतिहासिक परिस्थिती असे म्हणत असल्या तरी त्यांच्या मनात त्या परिस्थितीचा एक भागच आहे. आणि तो म्हणजे प्रत्यक्षात नसणारे भांडवलशाही वातावरण (परिस्थिती), किंवा तथाकथित त्रयस्थ. पण मार्क्स यांच्या विवेचनात हे काही अपघाताने घडलेले नाही. कारण लक्झेंबूर्ग यांचे मतच ग्राह्य धरावयाचे तर मार्क्स यांनी संशोधिलेल्या सिध्दान्तांची स्थापना 'सर्व ऐतिहासिक ' वास्तवाच्या लक्षणावर आधारावी लागेल. तसे झाल्यास पुनरुत्पादनाचे सिध्दान्ततच काय पण कॅपिटल ग्रंथातील अन्वेषणाचे सर्वच निष्कर्ष हेही केवळ तार्किक सिध्दान्त ठरतील. कट्टर अनुभववादी न्यायालयात असे कोणतेही अमूर्त सिध्दान्त हे दुय्यम दर्जाचे सत्य म्हणून मानले जाईल हे सर्वश्रुत आहे.''[32] रॉस्डॉलस्की यांचे हे विधान म्हणजे मार्क्स यांचे भांडवल ग्रंथातले सिध्दान्त तर्कशुध्द पण विगमनशुध्द नाहीत याची कबुलीच आहे. मार्क्स यांच्या सर्वच लिखाणाचे अवमूल्यन करणारे हे विधान परम अर्थाने न घेणेच योग्य ठरेल. मार्क्स निगमनाइतकेच विगमनाला महत्त्व देणारे होते हे पूर्वी दिलेले मतच ग्राह्य धरून आपण पुढे जाऊया.

पूर्वी निर्देशिल्याप्रमाणे आपल्या अन्वेषणाला लागणाऱ्या मूलभूत संकल्पना मार्क्स पश्चनिगमन करून विगमन पध्दतीने उभारतात. ऐतिहासिक अनुभवांची तुलना करून त्यांनी हे पुष्कळ वेळा साधलेले आहे. उदाहरणार्थ, उत्स्फूर्त व अनिर्बंध श्रमविभाग हा विक्रेय वस्तूंच्या उत्पादनव्यवस्था अस्तित्वात येण्यास व कार्यरत राहण्यास आवश्यक असतो असे मार्क्स दाखवितात. श्रमविभागाचे हे मूर्त स्वरूप आपल्याला इतिहासात अनेक जागी व अनेक काळी दिसू शकते. परंतु या प्रकारच्या उत्पादनव्यवस्थेमार्फत वैयक्तिक ( खासगी ) श्रम हे सामाजिक श्रम म्हणून व्यक्त केले जातात हे सहज दिसत नाही. आणि जोवर हे लक्षात येत नाही तोवर खासगीश्रम ही विक्रेयवस्तू उत्पादन व्यवस्थेपूर्वीची संकल्पना आहे हे कळत नाही. श्रमविभाग व विक्रेय वस्तू उत्पादन व्यवस्था ही ऐतिहासिक

पुराव्याने तपासता येते. त्यामुळेच त्याची वास्तवाशी संपूर्ण अगर अपूर्ण तुलना करून विगमनीय परीक्षा करता येणे शक्य होते. कारण ही घटिते जर त्यांच्या विशिष्ट सामाजिक संबंधांशिवाय इतर प्रकारच्या परिस्थितीत सापडू शकली तर तद्‌जन्य सिध्दान्त शंकास्पद ठरतील. मग एक तर ते असिध्द म्हणून सोडून द्यावे लागतील अथवा त्या अपवादात्मक परिस्थितींना आकलणारे नवे सिध्दान्त शोधावे लागतील. उलट अशी वास्तवातील घटितांची रुपे व त्यांच्यामागील यंत्रणा ( सहसंबंध ) या अनेक प्रकारच्या निरनिराळ्या परिस्थितीत एकमेकांबरोबर आढळल्यास तो सिध्दान्ताचा विगमनीय पुरावा म्हणता येईल. अर्थात असा पुरावा त्या सिध्दान्ताच्या निर्णायक सिध्दीस पुरेसा असणार नाही. कारण एकदा आपल्या उलगड्यात अगोचर ( निरीक्षता न येणाऱ्या ) गोष्टी अन्तर्भूत झाल्या की कोणतीच विगमनीय परीक्षा निर्णायक म्हणता येत नाही. तरी पण तो पुरावा असतो हे निश्चित.

अशा प्रकारचे व्यवस्थित विगमनीय विवेचन मार्क्स यांनी कोठे केले आहे असे म्हणता येणार नाही. परंतु पुष्कळ ठिकाणी त्यांनी आंशिक व अपूर्ण असे तुलनात्मक विवेचन केलेले आढळते. उदाहरणार्थ, ग्रुन्ड्रिसमध्ये भांडवल व कामगार यांच्यामधील गतिशील संबंधांचे खोलवर वर्णन केल्यावर मार्क्स लगेच भांडवलशाही-समाजापूर्वीच्या समाजात त्यांचे स्वरूप काय होते याचे विस्तृत विवेचन हाती घेतात. अशा प्रकारची विवेचने भांडवल, खंड 3 मध्ये सापडतात. इतिहास म्हणून ती अपुरी वाटतात. त्यांना तुलनात्मक अभ्यास हेच नाव जास्त युक्त होय. आणि अशा तऱ्हेची तुलनात्मक माहिती मिळवून तिचा अभ्यास करण्यासाठी मार्क्स यांनी अतोनात श्रम केले हे साक्षीपुराव्यानेच सिध्द आहे.

याच संदर्भात मार्क्स यांना उपलब्ध असलेल्या ऐतिहासिक माहितीच्या मर्यादांचाही विचार प्रस्तुत आहे. मार्क्स यांना त्यांच्यावेळी जी ऐतिहासिक माहिती उपलब्ध होती तिचे त्यांनी आवेदन केले होते. पण त्यांना उपलब्ध असलेली काही माहिती अपुरी होती व दुसरी काही माहिती अनुपलब्ध होती. उदाहरणार्थ, आशियाई उत्पादन व्यवस्थेसंबंधीचे त्यांचे विवेचन फार त्रुटित माहितीवर आधारलेले होते. त्यामुळे ते फारसे भेदक अगर वास्तव होऊ शकले नाही हे आता बहुतेक अभ्यासकांनी मान्य केले आहे. त्याचप्रमाणे आपल्या आयुष्याच्या अखेरीच्या वर्षांत मार्क्स यांनी रशियन भाषेचा अभ्यास करून रशियातील आर्थिक परिस्थितीची समीक्षा आरंभिली होती. या समीक्षेच्यामुळे त्यांची शेतीच्या अर्थशास्त्रासंबंधीची पूर्वीची मते लक्षणीय रीतीने बदलली होती असे दिसते. जमीनमालक शेतकऱ्यांच्याबद्दलचे त्यांचे अननुकूल मत यानंतर पुष्कळच अनुकूल झालेले होते.[33] याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे मार्क्स यांनी आपल्या पूर्वीच्या अन्वेषणावर असलेल्या ऐतिहासिक माहितीच्या मर्यादांची स्वत:च स्वच्छ केलेली भूमिका होय. व्हेरा झॅसुलिच यांना 18 मार्च 1881 मध्ये लिहिलेल्या प्रसिध्द पत्रात मार्क्स यांनी लिहिले होते: "भांडवलशाहीतील उत्पादन पध्दतीचा उगम सांगताना मी म्हटले आहे की भांडवलशाही उत्पादन पध्दती ही उत्पादक व उत्पादन साधने यांच्या संपूर्ण ताटातुटीवर आधारलेली आहे. शेतकी उत्पादकांचे स्वामित्व हरण हा त्या घटनेचा पाया आहे.फक्त इंग्लंड देशात हे पूर्णपणे झाले आहे. परंतु पश्चिम युरोपातले देशही त्याच संक्रमणातून जात आहेत. म्हणून या प्रक्रियेची मी सांगितलेली 'ऐतिहासिक अपरिहार्यता' ही स्पष्टपणे पश्चिम युरोपातील देशांपुरतीच मर्यादित आहे"[34] मार्क्स यांच्या इतकी जरी त्यांच्या श्रध्दावन्त अनुयायांना या मर्यादांची जाणीव असती तर फार बरे झाले असते.

पश्चनिगमन पध्दतीचा अन्वेषणासाठी अवलंब करताना मार्क्स यांनी विगमनात्मक मीमांसा केली असली तरी त्या पध्दतीच्याही काही मर्यादा आहेत. आणि मार्क्स यांच्या विवेचनासही त्या असाव्या हे साहजिकच आहे. एक तर पश्चनिगमन पध्दती हा अनुमान करण्याचा एक अबळ मार्ग आहे. तो एकमेव मार्ग नव्हे. त्यामुळे एका विशिष्ट पश्चगमनाने एक संकल्पना सिध्द झाली हाच केवळ तिच्या मौलिकतेचा वा भेदकत्वाचा निकष होऊ शकत नाही. त्या संकल्पनेने ( व तिच्या साहाय्याने मांडलेल्या सिध्दान्ताने ) वास्तवाचा उलगडा किती समाधानकारकपणे होऊ शकतो यावरून तिचे अन्वेषणाचे दृष्टीने गोल ठरते. त्यासाठी पश्चनिगमनाखेरीज स्वतंत्र पुरावा शोधावा व तपासावा लागतो. दुसरे, मार्क्स यांनी पश्चनिगमनाने संशोधिलेल्या मूलभूत संकल्पना या बहुतांशी अगोचर ( निरीक्षण न करता येण्यासारख्या ) आहेत. मूल्य, अमूर्त मानवीश्रम किंवा अतिरिक्त मूल्य ( वाढावा ) या सर्व कल्पना अशा प्रकारच्या आहेत. किंबहुना त्या तशाच आहेत हेच त्यांचे बळ आहे असे वाटते. अशा अगोचर ( अनिरीक्षणीय ) संकल्पना वापरण्यात चूक काहीच नाही. पण त्यांच्या अस्तित्वाचा पुरावा हे त्यांच्यावर आधारलेले सिध्दान्त हेच असल्यास तो संशयास्पदच मानावयास हवा. त्या अगोचर असल्याने प्रत्यक्ष पुराव्याने त्या तपासणे शक्य नाही. त्या अप्रत्यक्षरीत्याच तपासता येतील. अशा अप्रत्यक्ष रीतीपैकी तुलनात्मक अभ्यासाच्या मार्क्स यांच्या पध्दतीविषयी पूर्वी लिहिलेच आहे. तेच करावयाची दुसरी व कदाचित अधिक निर्णायक रीत पूर्वकथनाची. तिची चर्चा पुढे केली आहे. त्यापूर्वी पश्चनिगमनाच्या पध्दतीची आणखी एक मर्यादा सांगितली पाहिजे.

पश्चनिगमन कोठून सुरू करावयाचे हा निर्णय संशोधकाला करावा लागतो. तो अचूक करण्याचा कोणताच वस्तुनिष्ठ निकष अस्तित्वात नसतो. संशोधक आपल्या कल्पनेप्रमाणे त्याला जे सर्वात भेदक वाटेल त्यावरून करतो. ही निवड चुकू शकते. याचे

एक उदाहरण पूर्वी चर्चिलेल्या मूल्यांच्या किंमतीतील रुपान्तरणाच्या सिध्दान्ताचेच देता येईल. बाजारातील किंमतींचा उलगडा मार्क्स यांच्या मूल्य सिध्दान्ताने होत नाही हे निगमन परीक्षेत वर नोंदले आहेच. या संबंधात जोन रॉबिन्सन, सॅम्यएलसन वगैरेंनी सुचविले आहे की मार्क्स यांच्या मूल्य, अतिरिक्त मूल्य, वगैरे संकल्पना अमूर्त, अगोचर व अपरिमानगण्य आहेत. म्हणून मार्क्स यांनी जर विक्रेयवस्तू पासून सुरवात करून पण तिच्या मूल्यापासून न करता त्या वस्तूच्या प्रत्यक्षात गोचर असणाऱ्या बाजारातील किंमतीपासून केली असती तर पूर्णस्पर्धा, वगैरे योग्य गृहीतकांच्या आधारे मार्क्स यांना अभिप्रेत असणारी विनिमयमूल्ये,अतिरिक्त मूल्ये, वगैरे संकल्पना अप्रत्यक्षपणे व्युत्पादून त्यांना गोचर करून दाखविता आल्या असत्या. त्यातून कामगारांची पिळवणूक, भांडवलदारांचा नफा, वगैरे सर्व गोष्टी त्यांना हव्या तशा दाखविता आल्या असत्या. आणि हे अधिक खात्रीशीर रीत्या करता आले असते. मग त्यासाठी मार्क्स यांनी पहिल्या दोन खंडात जो आपल्या श्रममूल्य सिध्दान्ताचा घोळ मांडला आहे त्याची मुळीच गरज लागली नसती. मार्क्स यांची श्रममूल्य मीमांसा वरकड व अप्रस्तुत आहे असे त्यांनी सुचविले आहे.[35]

**पूर्वकथन:**

पूर्वकथनाचा निकष मार्क्स यांच्या विवेचनाच्या विगमनीय सिध्दीसाठी लावताना सेयर्स पूर्वकथन ( **prediction** ) आणि फलानुमान ( **prognosis** ) यात फरक करतात. मार्क्स यांच्या अन्वेषणात फलानुमान पुष्कळ आहे पण पूर्वकथन करण्याबाबत मार्क्स अत्यन्त सावध होते. फलानुमान हे सिध्दान्त कल्पनेसारखे ( **hypothesis** ) असते. केलेल्या अन्वेषणाने जरी विशिष्ट परिस्थितीचा उलगडा करता आला तरी तो विशिष्ट खुलासा सर्वसामान्य स्तरावर उचलता येत नाही. या संदर्भात मार्क्स यांच्या भांडवल ग्रंथातील शेवटच्या भागातील भांडवलशाहीच्या भावी उच्छेदाचे वर्णन म्हणून निर्देशिता येईल. ''भांडवलशाहीतील खासगी मालकीची मृत्युघंटा वाजते. स्वामित्व हरण करणारांचे स्वामित्व हरण केले जाते.'' भांडवलशाहीतील आन्तरविरोधाचे जे विश्लेषण मार्क्स यांनी केले आहे, त्या आधारे भांडवलशाहीचे असे भविष्य वर्तविणे हे त्यांना राजकीयदृष्ट्या आवश्यक होते व अशा अटळपणाचे वाक्शौंडिल्य करण्यात मार्क्स यांना कमीपणा वाटत नसे. वरील विधान हे भाकिताच्या पुष्कळच जवळ येते. भाकित (पूर्वकथन) हे एखाद्या परिस्थितीत घडणे अपरिहार्य आहे अशा प्रकारचे विधान असते. सेयर्स म्हणतात की ज्या अर्थी मार्क्स यांच्या विवेचनात सिध्दान्त अनुस्यूत आहेत त्या अर्थी त्यांच्या साहचाने पूर्वकथने (भाकिते) करणे शक्य आहे. सामाजिक शास्त्रात अशा प्रकारची भाकिते करणे फार अवघड असते याची मार्क्स यांना पूर्ण कल्पना होती. म्हणूनच त्यांनी फार फार दक्षपणे भाकिते केली आहेत. ती मुख्यतः दीर्घकालीन प्रवृत्तीविषयक आहेत. विशिष्ट वेळेस विशिष्ट ठिकाणी काय होईल अशी नाहीत.

मार्क्स यांचे सिध्दान्तन प्रसिध्द होऊन आता शतकाहून अधिक काळ लोटला आहे. त्यामुळे त्यांनी ज्या दीर्घकालीन प्रवृत्ती भांडवलशाहीत अनुस्यूत आहेत असे आपल्या अन्वेषणाव्दारे मांडले आहे त्या तशा प्रत्यक्षात दिसून आल्या का हे पाहणे शक्य आहे. भांडवलशाहीचा अंत नजिकच्या काळात होईल अशी मार्क्स यांची धारणा होती. 1848 मध्ये या अपेक्षेचा भंग झाला. पण 1857 वेळी पुन्हा अशीच अपेक्षा मार्क्स करीत होते असे दिसते. त्यावेळीही निराशाच त्यांच्या पदरी आली. त्यानंतरच्या प्रदीर्घ कालखंडात त्यावेळी ज्या पश्चिम युरोपातील व उत्तर अमेरिका येथील देशांतून भांडवलशाही प्रस्थापित झालेली होती त्या देशात ती अजूनही चालूच आहे. या उलट भांडवलशाहीची फारशी वाढ न झालेल्या देशातूनच साम्यवादी क्रान्ती झालेली आढळते. याबाबतीत मार्क्स यांच्या सिध्दान्तातून निघणारे पूर्वकथन बरोबर आलेले नाही.

ही जागतिक स्तरावरची परीक्षा सोडून दिली व अधिक मर्यादित फलानुमेयांची व पूर्वकथनांची परीक्षा केल्यासही तेच चित्र दिसते. नफ्याच्या दराची प्रवृत्ती घटती राहील कारण अचल भांडवलाचे प्रमाण वाढत जाईल व त्यामुळे पिळवणुकीचा दर कमी होत जाईल, उत्पादन व भांडवल यांच्यातील प्रमाण वाढत जाईल, कामगारांचे जीवनमान फारसे वाढणार नाही, व त्यांच्यावरचे बेकारीचे संकट अधिकाधिक तीव्र होत जाईल अशा प्रकारच्या भांडवलशाहीच्या अपरिहार्य प्रवृत्ती आहेत असे मार्क्स यांच्या अन्वेषणातून निष्पन्न होते. प्रत्यक्षात भांडवलशाही देशात या प्रवृत्ती साकार झालेल्या आढळत नाहीत.

भांडवलशाही देशातून गेल्या शतकाहून अधिक काळात नफ्याचा दर एकसारखा घटत गेलेला आढळत नाही. त्यात बरेच चढउतार दिसतात. विसाव्या शतकात अमेरिकेत अशी घटती प्रवृत्ती थोडीफार आढळते पण मार्क्स यांच्या सिध्दान्ताप्रमाणे भांडवलाचे आंगिक प्रमाण वाढत गेल्यामुळे ती निर्माण झालेली नसून एकूण उत्पादनाचे कामगारांच्या वेतनात जिरणारे प्रमाण वाढत गेल्यामुळे व पिळवणुकीचा दर घटत गेल्यामुळे झाली आहे. मार्क्स यांच्या सिध्दान्तांच्या हे विरुध्द आहे. तसेच भांडवल उत्पादन गुणोत्तर सतत वाढत गेलेले नाही. ब्रिटनमध्ये 1856 ते 1873 मध्ये ते प्रमाण 4.0 होते, 1873-1913मध्ये 4.1 होते व 1924-1937 मध्ये 4.7 होते. पण 1951-73 मध्ये ते 4.1 होते. अमेरिकेत एवढी वाढही या गुणोत्तरात आढळत

नाही.[36] कामगारांचे जीवनमान वाढत गेलेले आहे आणि या शतकाच्या सुरवातीसच ब्रिटनमधील कामगार हे 'बुझ्वा' झालेले होते असे लेनिन यांनीच सांगितलेले आहे. कामगारांची वाढती बेकारी हीही प्रवृत्ती म्हणून दिसत नाही. पूर्णोद्योगी अवस्थेची बरीच वर्षे या देशांनी अलीकडील काळात अनुभवलेली आहेत. अगदी अलीकडे बेकारी वाढली असली तरी मार्क्स यांना अभिप्रेत असलेली बेकारीची अवस्था - उपासमार, निवाऱ्याचा अभाव, दारिद्र्य वगैरे - ही सामाजिक विम्याच्या योजनांमुळे बेकार कामगारात आढळत नाहीत. बेकारीभत्ता, आजारीपणापासून संरक्षण वगैरे सुविधा भांडवलशाही देशातील कामगारांना भरपूर प्रमाणात उपलब्ध झाल्या आहेत. मार्क्स यांचे फलानुमेयन या सर्वच बाबतीत प्रत्यक्षात बरोबर ठरलेले नाही.

कोणत्याही वैज्ञानिक विवेचनातील प्रत्येक प्रमेय हे विगमनाने सिध्द झाले पाहिजे असा निकष मानला तर मार्क्स यांचे सिध्दान्त तसे सिध्द होत नाहीत हे मान्य करावेच लागते. निगमनानेही ते शुध्द ठरत नाही हे पूर्वीच दाखविले आहे. ह्या दोन्ही कसोटींवर मार्क्स यांचे सिध्दान्त वैज्ञानिक ठरत नाहीत. नवसनातन अर्थशास्त्राइतकेच मार्क्स यांचे अर्थशास्त्रही अवैज्ञानिक आहे.

संदर्भ :

पदटीपा, पूरक टीपा, वगैरे:

1. '' अर्थशास्त्र हे वैज्ञानिक शास्त्र आहे का?'', अर्थसंवाद, जुलै-सप्टेंबर 1985 '

2. तथोक्त, पदटीप 73, पृ. 95.

3. पहा Allen Oakley, *The Making of Marx's Critical Theory, A Bibliographical Analysis*, Routledge and Kegan Paul, London, 1983, Chapter 5, Pp. 81-116

4 Teodor Shanin (ed.), *Late Marx and The Russian Road, Marx and The Peripheries of Capitalism*, R& Kegan Paul, London, 1983, Pp. 95-126.

5. Allen Oakley, Making of *Marx's....etc.*, 1983, p 4.

6. विरोध विकासवादाची ही चर्चा बरीचशी लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या (1) ' विरोध विकास पध्दती ' व (2) ' विरोध विकास पध्दती : बुध्दिवादापासून गूढवादाकडे ' या त्यांच्या लेखसंग्रह, भाग 1 ला, प्राज्ञ पाठशाला, वाई, 1983 यातील दोन लेखांच्या आधारे केली आहे. त्या लेखातील बरीचशी वाक्ये या चर्चेत समाविष्ट केलेली आहेत.पण त्या शिवाय इतर मजकूरही या चर्चेत आहे. अर्थातच या चर्चेतील विधाने माझी आहेत व त्यात चुका असल्यास त्या माझ्याच आहेत. मूळ लेखकांच्या नाहीत.

7. या विधानाचा मार्क्स यांना जो अर्थ अभिप्रेत होता तो त्यांनी भांडवल ग्रंथाच्या दुसऱ्या जर्मन आवृत्तीला लिहिलेल्या खास टिपणात पुढीलप्रमाणे सांगितला आहे :

" My dialectic method is not only different from the Hegelian, but its direct opposite. To Hegel, the life process of the human brain ; i. e. the process of thinking, which under the name of the Idea", he even transforms into an independent subject, is the demiurgos (self-delivering concept) of the real world, and the real world is only the external phenomenal form, of the ' idea '. With me, on the contrary , the idea is nothing else than the material world reflected in the human mind, and translated into forms of thought."Afterward to the Second German Edition of *Capital*, Vol. I, 1873, P. 22. Progress Publications, Moscow.

तथापि यासंबंधी मार्क्सवाद्यात इरेच व लक्षणीय मतभेद आहेत. खालील उताऱ्यांवरून त्यातली गाभ्याची बाब लक्षात यावयास मदत होईल.

"It was Engels who first distinguished explicitly between an objective dialectics of nature and a subjective dialectics of consciousness.( Marx would not appear to be so adamant). The dialectics of nature is the given, the dominant; the dialetics of consciousness then appears as an epiphenomenon, a reflection. Hence the objective type of Marxist Theory can only have its roots in Engels while all subjective theories are ultimately based on Hegelian principles that are prior to Marx", (p. 287)"None the less many interpreters of Marx, assign a central role to the critique of ideology, especially to the critique of commodities as a fetish. To do so, however, is to reintroduce. a Hegelian framework which Marx deliberately rejected, the notion that objective social processes are brought about by the thinking subject, which would be to place those processes once more in the realm of subjective decision and manifestation." (p. 292) .Marxism and Western Society : A Comprehensive Encyclopedia, Vol. VII, ' Socialism as Science ' Pp. 286-292

8. या संबंधात प्रत्यक्षातील घटना म्हणून पुढील माहिती उद्बोधक आहे. दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या काळात जुने तर्कशास्त्र विरोध विकासवादाने वंध्या ठरविलेले आहे अशी सोव्हिएट देशात भूमिका होती. पण 1946 मध्ये बोल्शेव्हिक पक्षाच्या मध्यवर्ती समितीने जुने तर्कशास्त्र पुन्हा शाळा व महाविद्यालयातून आवश्यक विषय म्हणून शिकवण्याचा निर्णय केला. G. Wetter, Dialectical Materialism : A Historical and Systematic Survey of Philosophy in the Soviet Union, Kegan Paul, London, 1958, p.

9. F. Engels, Anti-Duhring, London, 1934, p. 132.

10. तथोक्त पृ. 127आकारिक तर्कशास्त्राप्रमाणे a चा नकार not- a किंवा गणिताप्रमाणे a व्यतिरिक्तच्या इतर सर्व अंकांचा संच. या नकाराचा नकार गणिताप्रमाणे पुन्हा aच असतो.पणविरोध विकासाचा नियमपाळण्यासाठी एन्गेल्स a चा नकार -a समजतात. आणि त्या नकाराचा नकार - $a^2$ म्हणजे विकास प्रक्रिया a पासून -$a^2$ पर्यंत वर चढते. आणि हे कसे परंपरागत गणितापेक्षा श्रेष्ठ आहे हे दाखविण्याच्या भरात एन्गेल्स विसरतात की नेहमीच्या गणितात - aचा वर्ग $a^2$ होतो. पण विरोध विकास वादात -$a^2$ होतो.हेच विरोध विकास वादाचे वैशिष्ठ्य आहे! वितंड म्हणून अज्ञानाने विचारलेल्या या प्रश्नाचे उत्तर अगदी सोपे आहे. बूलियन बीजगणितात - a चा वर्ग - $a^2$ असाच होतो.

11. स्टॅलिननंतर या नियमाचे पुनरुज्जीवन नुसते तात्विक पातळीवरच राहिलेले नाही. 1980 च्या सुरुवातीस आंन्द्रेपॉव्ह यांनी समाजवादी समाजातसुध्दा अंतर्गत विरोध असतो याकडे लक्ष वेधले होते. त्याला पुढे चेर्नेन्को यांनीही दुजोरा दिला, व प्रावदामध्येही त्याचा उल्लेख झाला. Andrepov "dismissed as ' naive" the idea that "socialism puts an end to all contradictions and divergences in general" and admitted in a straight forward manner: "Yes, we have both contradictions and difficulties. To think that some other way is possible is to leave the realiable, though sometimes rough, ground of reality and break with the ABC of Marxist dialectics., yet another and very important aspect of the matter is correctly to use the contraditions of socialism as a source and stimulus of its onward development." R. Kosolopov, in an

article entitled "Socialism and Contradiction" in Pravda (20 July 1983) wrote:"In a developed socialist society 'just as in any social organism " there is a struggle between newborn things and old things, and there are not only constructive but also negative trends at work.""The theory and practice of socialist construction make growing demands on the scientific interpretation of the way the 'nucleus' of materialistic dialectics reveals itself in the communist socio-economic formation. It is essential to develop the theory of the content and forms of contradiction under socialism. "*Economic and Political Weekly*, 13 April 1985, p. 620.

12. Maurice Cornforth, *The Open Philosophy and The Open Society*, Lawrence and Wishart, London, 1968, Pp. 40, 79.
13. L. Kolakowski, *Main Currents of Marxism, Vol I:The Founders*, Oxford, 1978, p. 323.
14. In his preface to *A Contribution to the Critique of Political Economy*, January 1859, Marx wrote: "I am omitting a general introduction which I had jotted down because on closer reflection any anticipation of results still to be proved appears to me to be disturbing, and the reader who on the whole desires to follow me must be resolved to ascend from the particular to the general'. K. Marx and F. Engels, *Selected Works*, Vol I, P.503. Progress Publications, Moscow, (Third Printing 1976)
15. K. Marx, *Grundrisse- Introduction to the Critique of Political Economy*, Martin Nicolaus, (Ed), Pelican Marx Library, Penguin Books, 1973, Pp. 100-108.
16. K. Marx, *Capital*, Vol I, Second German Edition, *Afterword*, 1873.

याला दुजोरा वरील टिपण ( 1857 ) लिहिल्यानंतर 1 फेब्रुवारी 1958 मध्ये एन्गेल्स यांना लिहिलेल्या पत्रात मिळतो. त्यात मार्क्स लिहितात:

" To bring a science by criticism to the point where it can be dialectically presented is an altogether different thing from applying an abstract readymade system of logic to mere inkings of such a system." (All Editions).

हीच गोष्ट मार्क्स यांनी 1880 मध्ये वॅगनर यांच्या अर्थशास्त्रावरील पुस्तकातील मार्क्स यांच्यावर केलेल्या टीकेला उत्तर म्हणून जी टिपणे केली होती व जी आता प्रसिध्द झाली आहेत त्यातही ठासून सांगितली आहे: तेथे त्यांनी लिहिले आहे:

" Wagner has not even noticed that my *analytic* method, which does not start from *Man* but from economically given period of society, has nothing in common with the German-Professional concept- linking method...In the first place I do not start from the ' concept ' of values and therefore do not have to ' divide ' the latter in any way. What I start from is the simplest social form in which the labour product is represented in contemporary society, and this is the ' commodity '. I analyse this, and indeed, first in the *form in which it appears*. Here I find that on the one hand it is its natural form a *thing of use* , alias use-value, on the other hand a *bearer of exchange-value*, and in this respect itself ' exchange value. ' Further analysis of the latter shows me that exchange-value is only a 'phenomenal form ', an independent mode of representation of *value* contained in the commodity, and then I proceed to analyse the latter. "K. *Marx, Marginal Notes on Wagner*, Lehrbutch der PolitischenOekonomie,Theoretical Practice, 5, 1972. ( 1880 ), Pp. 44-50,Terrel Carver ( Ed ), K. Marx, *Texts on Method*, Basil C. Blackwell, Oxford. p. 133.

K.Marx, Capital, Vol I, London, Lawrence and Wishart, ( 1967), p. 776.

पाहा : Howard and King, Political Economy of Marx,

17a. Longman, London, 1975, pp. 25, 28, 34, 55-58, 255,etc.

18. Quentin Lauer, " Markist Coneption of Science ", in *Methoological and Historical Essays in Natural and Social Sciences*. Boston Studies in Philosophy of Science, Vol XIV, 1974, p. 377.
19. 27 जुन 1867 रोजी एन्गेल्स यांना लिहिलेल्या पत्रात मार्क्स यांनी लिहिले होते:

" The philistine's and vulgar economist's *way of looking at things* stems from... the fact that it is only the direct *form of manifestation* of relations that is reflected in their brains and not their *inner connection*. Incidentally, if the latter were the case what need would there be of *science?*"

20. Derek Sayers, *Marx's Method, Ideology, ScienceCritique in Capital*, Harvester Press, Sussex, 1979, pp.13-25.
21. K. Marx, *Theories of Surplus Value*, Part II, Moscow, Progress Publications (1968), p. 164.

K. Marx, *Capital*, Vol I, Moscow, 1967, p. 39.

22. ही व्याख्या महत्त्वाची आहे व पुढे केलेल्या चर्चेच्यासंदर्भात त्या संबंधीचा आणखी खुलासा येथेच केलेला बरा. *Poverty of Philosophy* या 1847 मध्ये प्रसिध्द झालेल्या ग्रंथात मार्क्स यांनी निराळी व्याख्या केली आहे. ती अशी:

"It is important to emphasize the point that what determines value is not time taken to produce a thing but the *mini*-mum time it could possibly be produced in and the mini *mum* is ascertained by competition ". K. Marx, *Poverty of Philosophy*, (1847), International, New York, 1973, p. 66

भांडवल ग्रंथातील व्याख्येऐवजी ही व्याख्याच जास्त प्रमाण मानावी असा काही संशोधकांचा दावा आहे.येथे ही दुसरी व्याख्या ध्यानात आणून देणे येवढाच उद्देश आहे.

23. Dusan Pokorny, " Karl Marx and General Equilibriam *political Economy*, Spring 1985, Vol 19. No. 1.
24. L. Marx, *Theories of Surplus Value*, Part III , Progress Publications, Moscow ,1971, Pp. 488 -489 also *Capital*, Vol. III, P. 822.
25. जमिनीचा केवळ खंड हा जमीन मालकांच्या जमिनीवर असलेल्या मक्तेदारीतून निर्माण होतो असे यात सुचित आहे. सर्वसाधारण दराने शेती उत्पादनात नफा मिळत नसेल तर जमीन मालक ती जमीन उजाड ठेवील असे यात गृहीत आहे. भांडवल, खंड 3, मध्ये मार्क्स यांनी लिहिले आहे: " शेतीतील भांडवलाचे आंगिक गुणोत्तर अर्थव्यवस्थेतील सरासरी आंगिक गुणोत्तराइतके किंवा त्याहून अधिक असेल तर खंड केवळ उत्पन्न होणार नाही." पृ. 765.
26. K. Marx, Capital, Vol. I Chapter IV.
27. या सर्व विषयाचे थोडक्यात विवेचन पुढील लेखात सापडेल:

J. E. King, " Value and Exploitation : Some Recent Debates in Classical & Marxian Political Economy, I. Bradley & N. Howard (Ed.), St. Marlin, New York, 1982, Pp. 165-170.

28. V. Shemantenkov, *Enigma of Capital:A Marxian View point*, Progress Publications, Moscow, 1981, P{. 289.
29. N. Georgescue-Roegen, "Mathematical Proofs of the break down of Capitalism ", *Econometrica*, 1960.
30. Paul Sweezy, *The Theory of Capitalist Development, Principles of Marxian Political Economy*, Monthly Review Press p. 222.
31. जॉर्जेस्क्यू रॉयगन यांच्या मते ही भिन्नमितीची अडचण मार्क्स यांच्या लिखाणात अपघाती नसून त्यांच्या विचारधारेतील एका प्राणभूत संकल्पनेशी निगडित आहे. ती संकल्पना विरोधविकास वादातील आहे. ती म्हणजे " कोणत्याही भौतिक गोष्टीचा प्रवाह हाच स्वतःच्या

(साठ्याच्या) वाढीचा उगम असू शकतो.'' थोडक्यात येथे भांडवलाचा साठा आणखी साठ्यास स्वत: जन्म देऊन स्वपुष्ट होतो. याच्या बुडाशी अचर गतीच्याच नव्हे तर अचर त्वरित (accelerated)गतीच्या अस्तित्वावरचा विश्वास आहे. अचर गती हे हेगेलप्रणित तत्त्व आहे. पण हेगेल यांनी हे तत्त्व आदर्श कल्पनांच्याबद्दल सांगितलेले आहे. भौतिक परिमाणमय गोष्टींबद्दल नव्हे. पण मार्क्स ते तत्त्व भौतिकगोष्टींनाही लावतात असे दिसते. पण भौतिक गोष्टी भौतिक व उर्जेचे वैश्विक नियम बद्ध असतात. त्या स्वयंप्रज नसतात हे सर्वांनाच विदित आहे. (तत्रैव.)

32. Roman Rosdolski, The Making of Marx's Capital, Pluto Press, 1977, p. 166.

33. Teodor Shanin (Ed.), Late Marx and The Russian Road, Kegan Paul, London, 1983.D. Thorner, " India and the Asiatic Mode of Production, " Contributions to Indian Sociology No. 9, December 1966.G. Lisehthaim,' " Marx and the Asiatic Mode of Production "St. Anthony's Papeas No. 14, Chato Windus, 1963.

34. Marx-Lenin, *Selected Correspondence*, p. 320.

35. " On Marx, the Transformation Problem asnd Opacity. " Sammuelson, Baumol, Morishime, et al, *The Journal of Economic Literature*, Vol XII, No. 1., March 1974, pp. 51-75.

36. W. Eltis *The Classical Theory of Economic Growth*, Macmillan, London, 1984, Pp. 304-307. Thomas E. Weisskoff, " Marxian Crisis Theory and The Rate of Profit in the Post war U. S. Economy ", *Cambridge Journal of Economics*, 3, 1979, Pp. 341-378.
John E. Roemer, " Continuing Controveary on the falling rate of profit, fixed capital and other issues ", Ibid.Joseph Gillman, *The Falling Rate of Profit -Marx's Law and the Significance to the Twentieth Century Capitalism*, London, Dennis Dobson, 1957.

## मराठी अर्थशास्त्र परिषद

## बारावे वार्षिक अधिवेशन, शहादा ( जि. धुळे )

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या बाराव्या अधिवेशनात ' शिक्षणाचे अर्थशास्त्र' हा विषय चर्चेसाठी निवडण्यात आला आहे.' शिक्षणाचे अर्थशास्त्र ' यामध्ये पुढील विषय येऊ शकतील.

शिक्षणाचे अर्थशास्त्र - अर्थ, व्याख्या, स्वरूप, व्याप्ती इ.

मानवी भांडवल - संकल्पना, गुणविशेष, उपभोग व गुंतवण, कार्य.

शिक्षणातील गुंतवणुकीवरील परतावा, शिक्षणाचा उपभोग, शिक्षणाचे सामाजिक व व्यक्तिगत लाभ.

शिक्षण व उत्पन्न वितरणातील विषमता, शिक्षण व कुटुंबाचा आकार, शिक्षण व श्रमिकांची गतिशीलता, स्थलांतर, बुध्दिमत्ता – गळती

शिक्षणातील खाजगी व सामाजिक गुंतवणूक, गुंतवणूक निकष, शिक्षणावरील खर्च - प्रकार,

खर्च निश्चितीच्या पध्दती, शिक्षणाचा वित्तपुरवठा

शिक्षण व आर्थिक विकास - शिक्षणाच्या आर्थिक विकासातील योगदानाचे मापन.

शैक्षणिक नियोजन - त्यातील बाबी - मनुष्यबळाचे नियोजन - मनुष्यबळाची आवश्यकता व तत्संबंधी आडाखे - मनुष्यबळाचा प्रभावी वापर इ.

# एस. एन. डी. टी. विद्यापीठ मराठी अर्थशास्त्र परिषद

डॉ. स. भा. साखळकर*

## व्याख्यानमाला

महाराष्ट्र हे ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा; स्थिर व सुदृढ राजकीय पाया, कार्यक्षम प्रशासन, उपक्रमशीलता व कुशल कारागीर यांची परंपरा असलेले आणि आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक मूलभूत सोयी विकसित झालेले एक वैशिष्ट्यपूर्ण राज्य आहे. या राज्याला देशात आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात महत्त्वाचे स्थान असून ह्या राज्याने अनेक बाबतीत इतर राज्यांना आदर्श घालून दिला आहे. भौगोलिकदृष्ट्या, महाराष्ट्र हा उत्तर व दक्षिण भारतातील दुवा आहे. सामाजिकदृष्ट्या हे राज्य पुरोगामी असून सामाजिक सुधारणांच्या बाबतीत अग्रेसर, चांगल्या गोष्टी आत्मसात करणारे व धर्मनिरपेक्ष वृत्तीचे आहे. राजकीयदृष्ट्या महाराष्ट्राचे विधायक कार्याला वाहून घेतलेल्या कार्यकर्त्यांचे ''मोहोळ'' असे वर्णन करण्यात आले आहे. या वैशिष्ट्यामुळे अनेक राज्यातील लोक येथे स्थायिक झाले आहेत. सर्वांगीण उन्नतीसाठी महाराष्ट्रात असलेले स्वातंत्र्य व संधी यामुळे या राज्याचे आकर्षण अधिकच वाढले आहे. उद्योगी व महत्त्वाकांक्षी लोकांनी हे राज्य आपले घर मानले व त्यांनी महाराष्ट्रातील जीवनमान सुधारण्यास मदत केली.

महाराष्ट्र राज्याने आर्थिक व औद्योगिक क्षेत्रात देशात महत्त्वाचे स्थान मिळविले आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या देशाच्या 9.2 टक्के असली तरी राष्ट्रीय उत्पन्नात या राज्याचा वाटा 12.1 टक्के आहे. गतवर्षी महाराष्ट्रातील दरडोई राज्य उत्पन्न 3,430 रुपये होते तर देशातील दरडोई राष्ट्रीय उत्पन्न 1,596 रुपये होते. वित्तीय व वाणिज्य व्यवहारात हे राज्य अग्रेसर आहे, तर मुंबई ही खऱ्या अर्थाने भारताची '' वित्तीय राजधानी '' आहे. देशातील अनुसूचित वाणिज्य बँकांच्या एकूण कार्यालयांपैकी 9.2 टक्के कार्यालये महाराष्ट्रात आहेत, परंतु त्यांच्या ठेवी 18.5 टक्के व लोकांना दिलेली कर्जे 23.3 टक्के आहेत.

* डॉ. स. भा. साखळकर, संचालक, महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांच्या '' महाराष्ट्रातील उद्योगधंदे '' या विषयावरील व्याख्यानांचा सारांश (दि. 10 व 11 मार्च 1988)

## औद्योगिकीकरणातील आघाडी

महाराष्ट्रात शहरीकरणाचे प्रमाण जास्त आहे आणि प्रशिक्षित व कुशल कामगारांची संख्याही भरपूर आहे. उद्योगांना आवश्यक असणाऱ्या मूलभूत सोयींची उपलब्धता व सरकारकडून गुंतवणूकदार व उद्योजक यांना मिळणारे उत्तेजन यामुळे औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र नेहमीच आघाडीवर राहिला आहे. राज्य सरकार उद्योगासाठी योग्य ठिकाणी जमीन, पाणी व वीज या सोयी उपलब्ध करून देते. देशातील एकूण वीज उत्पादनापैकी 16.1 टक्के वीज उत्पादन महाराष्ट्रात होते व 15.9 टक्के वीज उद्योगासाठी वापरली जाते. देशातील एकूण कारखान्यांपैकी 11.1 टक्केच कारखाने महाराष्ट्रात असले तरी औद्योगिक कामगारांचे प्रमाण मात्र 16.9 टक्के आहे. देशात दर लाख लोकसंख्येत 1,030 औद्योगिक कामगार आहेत तर महाराष्ट्रातच हेच प्रमाण दर लाख लोकसंख्येला 1817 आहे. महाराष्ट्रातील कामगारांची उत्पादकताही बरीच जास्त आहे.

महाराष्ट्रात उद्योगातील दरडोई "भर घातलेले मूल्य" ( Value added ) रु. 533 आहे तर एकूण देशासाठी ते रु. 210 आहे. अधिकृत आर्थिक समालोचनानुसार, महाराष्ट्रात देशातील सुमारे 1/6 उत्पादक भांडवल व रोजगार असून देशातील संघटित क्षेत्रापैकी महाराष्ट्रातील उत्पादनाचे एकूण मूल्य ( Gross Value ) व "भर घातलेले मूल्य" सुमारे 1/4 आहे. भारतातील कामगारांपेक्षा महाराष्ट्रातील कामगारांचे दरडोई उत्पादन 38 टक्क्यांनी, तर दरडोई "भर घातलेले मूल्य" 50 टक्क्यांनी जास्त आहे.

## औद्योगिक विकास

गेल्या दोन दशकातील औद्योगिक विकासाचा वेग पाहता उद्योजकांची उपक्रमशीलता व नवीन उद्योगांना चालना देण्यासाठी राज्य सरकारने अवलंबलेले धोरणही प्रशंसनीय होते असे म्हणावे लागेल. महाराष्ट्रातील कारखान्यांची एकूण संख्या 1,961 ते 81 या काळात 8,233 वरून 15,170 वर गेली. म्हणजे जवळपास दुप्पट झाली. त्यातील उत्पादक भांडवल सुमारे अकरा पटींनी वाढले. म्हणजे रु. 533 कोटींवरून रु. 7,096 कोटीवर गेले. उत्पादनातील वाढ तर याहून जास्त आहे. उत्पादनात तेरा पटींनी म्हणजे रु. 924 कोटीवरून रु. 14,351 कोटीपर्यंत वाढ झाली यांत्रिक वस्तुनिर्मितीमुळे "भर पडलेले मूल्य" सुमारे नऊ पटींनी, म्हणजे रु. 271 कोटीवरून रु. 2,981 कोटीपर्यंत वाढले. रोजगारातील वाढ मात्र कमी म्हणजे 51.5 टक्के होती. कामगारांची संख्या 7.87 लाखांवरून 11.77 लाखावर गेली. या आकडेवारीवरून, या काळात, देशाप्रमाणे महाराष्ट्रातही भांडवलावर भर असलेल्या ( capital intensive) उद्योगांकडे कल होता असे दिसून येते, परंतु यामुळे, इतर भागांपेक्षा महाराष्ट्रातील उत्पादकता मात्र वाढली, उत्पादक भांडवलाच्या प्रत्येक रुपयाला देशात 1.38 रुपयांचे उत्पादन होते तर महाराष्ट्रात 2.02 रुपयांचे उत्पादन होते. तसेच दर कोटी उत्पादक भांडवलाला महाराष्ट्रात 220 नोकऱ्या उपलब्ध होतात तर देशात 203 नोकऱ्या निर्माण होतात. गेल्या दोन दशकात 50 पेक्षा जास्त कामगार असलेल्या कारखान्यात 50 टक्क्यांनी वाढ झाली तर 50 पेक्षा कमी कामगार असलेल्या कारखान्यात 120 टक्क्यांनी वाढ झाली. या काळात वीज उत्पादन जरी वाढले तरी, वीज न वापरणाऱ्या कारखान्यांपेक्षा वीज वापरणाऱ्या कारखान्यात कमी वाढ दिसून येते. वीज न वापरणाऱ्या कारखान्यांच्या वर्गात 50 पेक्षा जास्त कामगार असलेल्या कारखान्यांच्या संख्येत घट झाली.

1970 नंतरच्या काळात महाराष्ट्रातील औद्योगिक विकासाला अधिक वेग आला. कारखान्यांच्या संख्येत 1961-71 मध्ये 24.3 टक्क्यांनी वाढ झाली होती, तर 1971-81 मध्ये 62 टक्क्यांनी वाढ झाली. याच काळात उत्पादनातील वाढ अनुक्रमे 254.7 टक्के व 275.3 टक्के होती. उत्पादक भांडवलातील वाढ मात्र 1961-71 मध्ये 277 टक्के होती ती 1971-81 मध्ये फक्त 204 टक्के इतकीच झाली. परिणामी भांडवल उत्पादन गुणोत्तर कमी होऊन, उत्पादक भांडवलाच्या दर रुपयाला उत्पादन 1961 मध्ये रु. 1,59, 1971 मध्ये रु. 1.64 व 1981 मध्ये रु. 2.02 असे वाढत गेले. 1961 पासूनच्या दशकात रोजगारात 26.8 टक्क्यांनी वाढ झाली होती ती कमी होऊन 1971 पासूनच्या दशकात ती 19.4 टक्के झाली. याचा परिणाम म्हणजे 1961 पेक्षा 1971 पासून सुरू होणाऱ्या दशकात दरडोई "भर घातलेले मूल्य" व दर कामगारामागे उत्पादन यात वाढ झाली. औद्योगिक संरचनेतील बदलामुळे भर घातलेले मूल्य व उत्पादन यांचे गुणोत्तर क्रमशः कमी होत गेले., 1961 मध्ये ते 29.4 टक्के, 1971 मध्ये 25.2 टक्के व 1981 मध्ये 20.7 टक्के असे होते.

## उद्योगाचा आकृतिबंध

गेल्या सव्वीस वर्षात महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती झपाट्याने झाली हे पुढील आकडेवारीने लक्षात येते.

| वर्ष | | नोंदणी झालेले कारखाने | उत्पादक भांडवल ( रु. कोटीत ) | चालू कारखाने | रोजगार (0,000) | उत्पादन ( रु. कोटीत ) |
|---|---|---|---|---|---|---|
| डिसेंबर | 1960 | 8782 | 533 | 8,233 | 787 | 924 |
| डिसेंबर | 1970 | 11,294 | 2,132 | 10,241 | 998 | 3,385 |
| डिसेंबर | 1980 | 17,434 | 7,096 | 15,170 | 1,177 | 14,351 |
| | 1986 | 22.451 | 11,642 | 18,922 | 1.129 | 22,114 |

गेल्या दोन दशकात महाराष्ट्रातील उद्योगांचे प्रकार बदलले असून रासायनिक, भांडवली वस्तू व मध्यम तयार वस्तू या उद्योगांचे प्रमाण वाढले आहे. वस्तू निर्माण क्षेत्रातील एकूण उत्पादनापैकी उत्पादन पुढील आठ उद्योगात होते:--

(1) रासायनिक उद्योग

(2) विद्युत यंत्रसामुग्री

(3) वाहतूक सामुग्री

(4) यंत्रसामुग्री व अवजारे ( विद्युत सामुग्री खेरीज )

(5) धातू व संमिश्र धातू

(6) रबर, प्लास्टिक, पेट्रोलियम व कोळशापासून बनणाऱ्या वस्तू

(7) सुती कापड व

(8) अन्नपदार्थ. " भर घातलेल्या मूल्यात, 1/4 वाटा केवळ रासायनिक उद्योगांचा आहे. या उद्योगात-तसे कामगार कमी म्हणजे 10 टक्के आहेत व आर्थिक मिळकत (Emolument ) 17 टक्के आहे. रोजगाराच्या बाबतीत सुती कापड उद्योगाचा अजून पहिला क्रमांक आहे; या उद्योगात वस्तुनिर्माण क्षेत्रातील एकूण कामगारांपैकी 16 टक्के कामगार आहेत. परंतु त्यांची मिळकत सर्वसाधारणतः कमी असल्यामुळे या उद्योगाचा एकूण मिळकतीतील वाटा 12 टक्के आहे.

कामगारांची वार्षिक सरासरी मिळकत रासायनिक उद्योगात सर्वात जास्त म्हणजे दर कामगाराला रु. 13687 आहे, तर अन्नपदार्थ उद्योगात सर्वात कमी म्हणजे दर कामगाराला रु. 4,312/- आहे. संबंध औद्योगिक गटासाठी मिळकतीचा सरासरी दर कामगाराला रु. 8,757 आहे. रासायनिक उद्योगातील कामगार उत्पादनात तेवढी भर घालत असल्यामुळे त्यामध्ये जास्त मोबदला दिला जातो.

ताज्या आकडेवारीनुसार दर कामगारामागे उत्पादक भांडवलाचे प्रमाण सर्व उद्योगांसाठी रु. 86,000 आहे. रासायनिक उद्योगांमध्ये हे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे, दर कामगारामागे उत्पादक भांडवल रु. 1,84,000 आहे तर तंबाखू उद्योगात ते सर्वात कमी म्हणजे रु. 16,000 आहे.

प्रत्येक उद्योगाची कामगार सामावून घेण्याची क्षमता व कामगाराची उत्पादकता यांचा अभ्यास करणे उद्बोधक ठरेल. ताज्या आकडेवारीनुसार दर कामगारामागे 1,71,000 रुपये किंमतीचे उत्पादन होते व उत्पादन : भांडवल गुणोत्तर 2.06 आहे. रासायनिक उद्योगात दर कामगारामागे उत्पादन सर्वात जास्त म्हणजे रु. 4,14,000 असून कापड उद्योगासाठी सर्वात कमी म्हणजे रु.40,000 आहे.

निविष्टांचे (inputs) प्रमाण, म्हणजे उत्पादनाशी निविष्टांची टक्केवारी, अन्न पदार्थ उद्योगात सर्वात जास्त म्हणजे 89टक्के व कापड उद्योगात सर्वात कमी म्हणजे 72 टक्के व सर्व उद्योगांसाठी सरासरी 78 टक्के आहे. हे प्रमाण रसायने 77 टक्के, विद्युत यंत्रसामुग्री व उपयंत्रे यासाठी 71 टक्के, धातू व मिश्र धातू उद्योगांसाठी 82 टक्के तर रबर, प्लास्टिक, पेट्रोलियम व कोळसा यापासून बनविण्यात येणाऱ्या वस्तूंच्या उद्योगांसाठी 90 टक्के आहे. भांडवलाच्या आकारानुसार(size) कारखान्यांची वर्गवारी केल्यास मोठ्या कारखान्यात ( 10 लाख रुपयांपेक्षा जास्त भांडवल असलेले कारखाने ) फक्त 18 टक्के कारखान्यांचा समावेश होतो. परंतु त्यामध्ये 72 टक्के रोजगार, 93 टक्के उत्पादक भांडवल, 85 टक्के उत्पादन व 87 टक्के " भर घातलेले मूल्य " आहे. रु. 10 लाखांपेक्षा कमी भांडवल असलेल्या लहान उद्योगामध्ये 82 टक्के कारखान्यांचा समावेश होतो. या कारखान्यात 28 टक्के कामगार आहेत. त्यांचे उत्पादन 15 टक्के व " भर घातलेले मूल्य " 13 टक्के आहे.

**कार्यक्षमतेचे निदर्शक**

लघु उद्योग क्षेत्रात, उत्पादक भांडवलाच्या दर रुपयाला होणारे उत्पादन रुपये 4.60 म्हणजेच मोठ्या उद्योगांच्या क्षेत्रापेक्षा 2.6 पट आहे, तर " भर घातलेल्या मूल्याचे प्रमाण 1.75 पट आहे. लहान उद्योगात दर कामगारामागे उत्पादक भांडवल रुपये 14,844 आहे. हे प्रमाण मोठ्या उद्योगांच्या तुलनेने 18 टक्के आहे. यावरून असे दिसून येईल की,

भांडवलाच्या प्रत्येक रुपयामागे झालेल्या उत्पादनाचे मूल्य व भर घातलेले मूल्य यावरून कार्यक्षमता मोजल्यास ती मोठ्या उद्योग क्षेत्रापेक्षा लहान उद्योग क्षेत्रात जास्त आहे. सुमारे 47 टक्के उद्योगात 20 पेक्षा कमी कामगार व 27 टक्के उद्योगात 20 ते 49 कामगार आहेत. 500 पेक्षा जास्त कामगार असलेले कारखाने केवळ 3 टक्के आहेत, परंतु त्यात 43 टक्के उत्पादक भांडवल गुंतलेले आहे.त्यात 48 टक्के रोजगार असून त्यांचे उत्पादन 46 टक्के व भर घातलेले मूल्य 56 टक्के आहे. याउलट 50 पेक्षा कमी कामगार असलेले कारखाने 74 टक्के आहेत. परंतु त्यात फक्त 15 टक्के रोजगार व 6 टक्के उत्पादक भांडवल आहे, त्याचे उत्पादन 12 टक्के असून भर घातलेले मूल्य 8 टक्के आहे. दर कामगारामागे उत्पादनाचे एकूण मूल्य लक्षात घेतल्यास 100 ते 199 कामगार असलेले कारखाने सर्वात कार्यक्षम आहेत. या वर्गातील कारखान्यांच्या उत्पादनाचे सरासरी मूल्य रुपये 1.48 लाख असून 500 पेक्षा जास्त कामगार असलेल्या कारखान्यांच्या उत्पादनाचे सरासरी मूल्य रु. 1.21 लाख आहे. 100 ते 499 कामगार असलेल्या कारखान्यांमध्ये दर कामगारामागे भर घातलेले मूल्य सर्वात जास्त म्हणजे रु. 27,000 आहे.

महाराष्ट्रातील सुमारे दोन तृतीयांश कारखाने बिगरनिगम ( **Non-corporate** ) क्षेत्रात आहेत. परंतु त्यांचे भांडवल फक्त 5.6 टक्के आहेत. त्यात 20.5 टक्के कामगार आहेत, त्यांच्या उत्पादनाचे मूल्य 14.2 टक्के आहे व भर घातलेले मूल्य 9.9. टक्के आहे. या गटात प्रामुख्याने भागीदारी उद्योग आहेत. या गटातील एकूण कारखान्यापैकी निम्मे कारखाने भागीदारी पेढ्यांचे असून त्यात 17.3 टक्के रोजगार आहे, उत्पादन 12.7 टक्के भर घातलेले मूल्य 8.7 टक्के आणि उत्पादक भांडवल फक्त 4.9 टक्के आहे. 1980 मध्ये निगम क्षेत्रात खाजगी मर्यादित कंपन्यांकडे सार्वजनिक मर्यादित कंपन्यापेक्षा जास्त म्हणजे 2,335 कारखाने होते. परंतु उत्पादक भांडवल, कामगारांची संख्या, उत्पादनाचे मूल्य व भर घातलेले मूल्य यात सार्वजनिक मर्यादित कंपन्यांचा वाटा जास्त होता. सहकारी क्षेत्रात 3.2 टक्के कारखाने 9.6 टक्के कामगार 5.6 उत्पादन व 3.5 टक्के भर घातलेले मूल्य होते.

दर कामगारामागे उत्पादक भांडवल उत्पादन व उत्पादक भांडवलाच्या दर रुपयाला उत्पादन यांचा विचार केल्यास बिगर-निगम क्षेत्राची कार्यक्षमता निगम, सहकारी व इतर क्षेत्रापेक्षा जास्त आहे. उदाहरणार्थ या क्षेत्रातील दर कामगारामागील उत्पादक भांडवल व निगम क्षेत्रातील उत्पादक भांडवल यांचे प्रमाण 28.8 टक्के आहे. परंतु दर कामगारामागे उत्पादनाचे प्रमाण मात्र 55.8 टक्के आहे. तसेच भर घातलेल्या मूल्याचे प्रमाण 37.5 टक्के आहे. बिगर-निगम क्षेत्रात, उत्पादक भांडवलाच्या दर रुपयाला होणारे उत्पादनही सर्वात जास्त आहे. म्हणजे बिगर-निगम क्षेत्रात उत्पादक भांडवलाच्या प्रत्येक रुपयामागे उत्पादन 5.1 असून निगम क्षेत्रात ते 2.6 व सहकारी क्षेत्रात 2.4 आहे. बिगर-निगम क्षेत्रात हे प्रमाण भागीदारी पेढ्यांसाठी 5.1 व वैयक्तिक मालकीच्या उद्योगांसाठी 4.4 आहे निगम क्षेत्रात हे प्रमाण खाजगी मर्यादित कंपन्यांसाठी 3.8 सार्वजनिक मर्यादित कंपन्यांसाठी 2.4 व सार्वजनिक महामंडळासाठी 3.0 आहे.

**उद्योगांचे केंद्रीकरण**

औद्योगिक विकासाच्या बाबतीत महाराष्ट्र जरी देशात आघाडीवर असला तरी येथील उद्योगांचे बृहन्मुंबई ठाणे व पुणे या जिल्ह्यात केंद्रीकरण झाले आहे. या तीन जिल्ह्यात राज्याच्या एकूण लोक-संख्येपैकी फक्त 25 टक्के लोकसंख्या असली तरी 70 टक्के कारखाने आहेत. या तीन जिल्ह्यातील कारखाना क्षेत्रात 67 टक्के रोजगार, 69 टक्के उत्पादक भांडवल व ७७ टक्के भर घातलेले मूल्य आहे. या तीन जिल्ह्यामधील कारखान्यांनी दरडोई भर घातलेले मूल्य अंदाजे रुपये 2,242 आहे. या तीन जिल्ह्यांबाहेरील नोंदणी झालेल्या कारखान्यांची टक्केवारी 1961 ते 1979-81 च्या दरम्यान 38.4 पासून 31.0 टक्क्यांपर्यंत कमी झाली, परंतु भर घातलेले मूल्य त्यांचा वाटा 14.7 टक्क्यावरून 18.5 वाढला. तसेच रोजगार, एकूण उत्पादन या बाबतीत थोडीशी सुधारणा झाली. बृहन्मुंबईतील नोंदणीकृत कारखान्यात थोडीशी वाढ दिसत असली तरी उत्पादक भांडवल, रोजगार, एकूण उत्पादन व भर घातलेले मूल्य यातील या जिल्ह्यांचा टक्केवारी वाटा बराच कमी झाला आहे हे येथे नमूद करणे आवश्यक आहे. ठाणे जिल्ह्यात, कारखान्यांची संख्या उत्पादक भांडवल, रोजगार, एकूण उत्पादन व भर घातलेले मूल्य या बाबतीत टक्केवारीत बरीच सुधारणा दिसून आली. पुणे जिल्ह्यातील सुधारणा मात्र ठाणे जिल्ह्यापेक्षा कमी आहे.

**मागास भागात उद्योग सुरू करण्यास प्रोत्साहन**

राज्याच्या विकसनशील भागात नवीन उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र सरकार 1964 पासून एक योजना राबवत आहे. दिनांक 1 एप्रिल 1983 पासून या योजनेत काही सुधारणा करण्यात आल्या. या योजनेखाली मिळणाऱ्या सवलती लवकर दिल्या जाव्यात अशी तरतूद या योजनेत करण्यात आली आहे. या योजनेखाली राज्याचे अ, ब, क,ड, असे चार भाग पाडण्यात आले आहेत. मुंबई व पुणे महानगर क्षेत्रांना विकसित भाग मानले असून त्यांचा " अ " भागात समावेश आहे. " अ " भागांना कोणत्याही सवलती दिलेल्या नाहीत. राज्याच्या उर्वरित

भागाचे तेथील औद्योगीकरणाच्या प्रमाणानुसार ब, क व ड असे तीन भाग पाडण्यात आले आहेत. उदाहरणार्थ ठाणे जिल्ह्यातील ठाणे, भिवंडी, कल्याण व वसई यांचा " ब " वर्गात पालघर, डहाणू वाडा, शहापूर, मुरबाड यांचा " क " भागात व तळासरी जव्हार व मोखाडे यांचा " ड " भागात समावेश करण्यात आला आहे. मागास भागांचा औद्योगिक विकास करण्याच्या धोरणाचा भाग म्हणून राज्यात 18 विकास केंद्रे निवडण्यात आली असून तेथे उद्योगधंद्यासाठी सर्व गूलभूत सोयी, घरे व दळणवळण यांची व्यवस्था करण्यात आली आहे.

**जिल्हा उद्योग केंद्रे :**

लहान, ग्राम व कुटीर उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या उद्योजकांना " एकाच छताखाली " सर्व प्रकारचे साहाय्य करण्यासाठी राज्यातील 29 जिल्ह्यात जिल्हा उद्योग केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. ही केंद्रे व राज्य सरकारकडून नवीन उद्योगांना मिळणाऱ्या सवलतींची उद्योजकांना माहिती देतात, नियंत्रित कच्चा माल उपलब्ध करतात अथवा त्यासाठी शिफारस करतात व मालाच्या विक्रीसाठी साहाय्य देतात. या केंद्राचा खर्च केंद्र व राज्य सरकारे करतात, 1985-86 मध्ये जिल्हा उद्योग केंद्रांनी एकूण 33 हजार उद्योग सुरू करण्यास मदत केली.

**इतर प्रगत राज्यांपेक्षा जास्त प्रगती :**

भारतातील इतर प्रगत राज्यांपेक्षाही महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती जास्त आहे असे उपलब्ध आकडेवारीवरून दिसून येते. बिगर शेतीतील औद्योगिक रोजगारीचे प्रमाण महाराष्ट्रात 10.4 टक्के असून ते तामिळनाडू ( 9.8 टक्के ) पश्चिम बंगाल ( 9.1 टक्के ), गुजरात ( 9 टक्के ) व आंध्र प्रदेश ( 7.9 टक्के ) हयांहून अधिक आहे. महाराष्ट्रातील कारखान्यातील रोजगारीचे लोकसंख्येशी प्रमाण 1.8 टक्के असून ते जवळजवळ गुजरातइतके आहे व पश्चिम बंगाल, तामिळ-नाडू, कर्नाटक व आंध्र प्रदेश या राज्यांसह भारतातील सर्व राज्याहून जास्त आहे. भारतात महाराष्ट्रातील विजेचा औद्योगिक वापर 10.2 टक्के असून तो गुजरात ( 9.9 टक्के ) तामिळनाडू ( 9.4 टक्के ) पश्चिम बंगाल ( 8.2 टक्के ) आंध्र प्रदेश ( 7.1 टक्के ) व कर्नाटक ( 6 टक्के ) याहून जास्त आहे.

उपलब्ध आकडेवारीवरून महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती वाढत आहे असे दिसून येते. भारतात 1964 ते 1983 मधील उत्पादक भांडवलातील वाढीत महाराष्ट्राचा 15.9 टक्के वाटा होता आणि तो उत्तर प्रदेश ( 11.6 टक्के) बिहार ( 10.4 टक्के ) गुजरात ( 9.5 टक्के ) तामिळनाडू ( 7.2 टक्के ) व पश्चिम बंगाल ( 6.5 टक्के ) यासह सर्व राज्यांहून जास्त होता. महाराष्ट्रात 1981-84 या काळात 8627 नवीन जॉईंट स्टॉक कंपन्या स्थापन झाल्या तर पश्चिम बंगालमध्ये 3789, गुजरातमध्ये 2544, तामिळनाडूत 1824, कर्नाटकमध्ये 1694, आंध्र प्रदेशामध्ये 1624 उत्तर प्रदेशामध्ये 1236 व बिहारमध्ये 383 नवीन कंपन्या आल्या 1977-78 व 1982-83 ह्या काळात भारतातील औद्योगिक उत्पादनातील वाढीचा हिस्सा महाराष्ट्राचा 20.4 टक्के असून तो गुजरात ( 12.7 टक्के) तामिहनाडू ( 10.32 टक्के ) उत्तर प्रदेश ( 9.5 टक्के) बिहार ( 7.5 टक्के ) पश्चिम बंगाल ( 7 टक्के ) व आंध्र प्रदेश ( 5.8 टक्के ) ह्या इतर प्रगत राज्याहून अधिक होता. ह्याच काळात भारतातील एकूण औद्योगिक रोजगारीच्या वाढी-पैकी फक्त 5.2 टक्के हिस्सा महाराष्ट्रात होता व तो आंध्र प्रदेश ( 18.6 टक्के ), उत्तर प्रदेश ( 14 टक्के ) गुजरात ( 13.3 टक्के ) व तामिळनाडू ( 12.3 टक्के ) ह्या इतर प्रगत राज्याहून बराच कमी होता. महाराष्ट्रातील उद्योगधंदे जास्त भांडवलप्रधान व तांत्रिकदृष्ट्या जास्त प्रगत होत आहेत हे ह्याचे प्रमुख कारण आहे. महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीचा भविष्यकाळही उज्ज्वल आहे. सहकारी क्षेत्रातील साखरकारखानदारीमुळे महाराष्ट्रात व विशेषत: पश्चिम महाराष्ट्रात ग्रामीण भागाचा कायापालट होत आहे आणि तिथे नवनवीन इतर लघु उद्योगधंदे निर्माण होत आहेत. पेट्रोलियम व गॅसचे मोठे साठे अरबी समुद्रात मिळाले असून त्यामुळे व विशेषत: नागोठणे येथील 1200 कोटी रुपयांच्या गॅस क्रॅकर प्रकल्पामुळे रायगड जिल्ह्याचे औद्योगीकरण झपाट्याने होत असून भविष्यकाळात तिथे असंख्य लघु व मोठे उद्योगधंदे स्थापन होतील. महाराष्ट्र सरकारच्या व विशेषत: सिकॉमच्या प्रयत्नामुळे औरंगाबाद, नाशिक, पाताळगंगा, तारापूर, नागपूर, जळगाव, रोहे, अहमदनगर वगैरे 17 औद्योगिक केंद्रात 3060 कोटी रुपयांची गुंतवणूक झालेली आहे. महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती भारतातील इतर प्रगत राज्यांपेक्षा नजिकच्या भविष्यकाळात जास्त झपाट्याने होणार असे नवीन उद्योगधंद्यासाठी दिलेल्या औद्योगिक परवान्यांच्या आकडेवारीवरूनही स्पष्ट दिसते. 1980-86 ह्या काल- खंडात महाराष्ट्रात 857, औद्योगिक परवाने दिले गेले तर गुजरातमध्ये 585, तामिळनाडूत 507, उत्तर प्रदेशामध्ये 402, आंध्र प्रदेश मध्ये 325, कर्नाटकमध्ये 324, पश्चिम बंगालमध्ये 320 मध्य प्रदेशामध्ये 181 व बिहारमध्ये 107 नवीन औद्योगिक परवाने दिले गेले.

या विवेचनावरून खालील दहा निष्कर्ष निघतात--

(1) गेल्या दोन दशकातील औद्योगिक विकासाच्या वेगावरून, महाराष्ट्रात उद्योजकांनी नवीन उद्योग सुरू करण्यासाठी व सरकारने त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रशंसनीय प्रयत्न केले असे दिसून येते. कारखान्यांच्या एकूण संख्येत वाढ झाली असून उत्पादक भांडवल, उत्पादन, उत्पादकता व

वस्तुनिर्माण कार्यामुळे भर पडलेल्या मूल्यात लक्षणीय वाढ झाली.

(2) 1970 नंतर औद्योगिक विकासाला अधिक वेग आला व भांडवलावर भर असलेल्या उद्योगांकडे अधिक कल दिसून आला.

(3) गेल्या दोन दशकात उद्योग क्षेत्राची संरचना बदलली असून आता रासायनिक, भांडवली वस्तू व मध्यम तयार वस्तू या उद्योगांचे प्रमाण वाढले आहे असे दिसून येते.

(4) वस्तुनिर्माण क्षेत्रातील एकूण उत्पादनापैकी सुमारे 1/4 उत्पादन पुढील आठ महत्त्वाच्या उद्योगातून होत--

(1) रासायनिक उद्योग (2) विद्युत यंत्रसामग्री (3) वाहतूक सामुग्री, (4) यंत्रसामुग्री व अवजारे (विद्युत यंत्रसामुग्री वगळून) (5) धातू व संमिश्र धातू (6) रबर, प्लास्टिक, पेट्रोलियम व कोळशापासून बनणाऱ्या वस्तू (7) सुती कापड व (8) अन्नपदार्थ.

(5) उत्पादन - भांडवल यांचे सरासरी प्रमाण 2.0 आहे. वाहतूक सामग्री उद्योगात ते सर्वात कमी ( 1.5 ) व रबर प्लास्टिक, पेट्रोलियम व कोळशापासून बनणाऱ्या वस्तू या उद्योगात सर्वात जास्त ( 5.4 ) आहे. मोठे कारखाने ( 10 लाख रुपयापेक्षा जास्त भांडवल असलेले ) फक्त 18 टक्के असले तरी त्यातील रोजगार 72 टक्के, उत्पादन भांडवल 93 टक्के, उत्पादन 85 टक्के व भर घातलेले मूल्य 87 टक्के आहे.

(6) सुमारे 2/3 उद्योग बिगर-निगम क्षेत्रात असून त्यातील बहुसंख्य उद्योग भागीदारीत आहेत.

(7) सरकारच्या धोरणामुळे मागास विभागात नवीन उद्योग निघत आहेत हे नि:संशय परंतु अजून मुंबई, ठाणे, पुणे पट्ट्यात औद्योगिक कार्य जास्त प्रमाणात आहे.

(8) महाराष्ट्रातील औद्योगिक प्रगती भारतातील इतर प्रगत राज्याहून जास्त जोरात होत आहे.

(9) महाराष्ट्रातील औद्योगिक प्रगतीचा भविष्यकाळही उज्ज्वल आहे.

o o

## मराठी अर्थशास्त्र परिषद

परिषदेचे बारावे वार्षिक अधिवेशन शहादा (जि. धुळे) येथे दिनांक 25, 26 आणि 27 नोव्हेंबर 1988 या दिवशी आयोजित होणार आहे. अधिवेशनासंबंधीचा तपशील सदस्यांकडे यथावकाश पाठविला जाईल.

कृपया नोंद घ्यावी.

व्यं. सु. पाटणकर
कार्यवाह खजिनदार

## धुळे जिल्हा अर्थशास्त्र अध्यापक संघ

संघाच्या विद्यमाने होणाऱ्या यंदाच्या व्याख्यानमालेसाठी प्राचार्य (निवृत्त) रा. ना. खर्चे, बुलढाणा यांची नियुक्ती झालेली आहे. त्यांच्या दोन व्याख्यानांचा विषय '' भारतातील उच्च शिक्षणाची संसाधने ''हा राहील. व्याख्याने धुळे येथे डिसेंबर 1988 मध्ये होतील.

व्यं. सु. पाटणकर
कार्यवाह

# भारताच्या प्रत्यक्ष करांचे पुरोगामित्व

डॉ. जे. एफ. पाटील *
प्रा. कमल पाटील
कोल्हापूर

**प्रास्ताविक :**

सरकारच्या महसुलाचे किंवा उत्पन्नाचे साधन हे जरी करव्यवस्थेचे प्राथमिक स्वरूप असले तरी अलिकडच्या अर्थशास्त्रीय विचारसरणीप्रमाणे करव्यवस्थेचे हे उद्दिष्ट साध्य करताना जाणीवपूर्वक प्रयत्न केल्यास आर्थिक धोरणाची इतरही काही उद्दिष्टे साध्य करणे शक्य आहे. कर व्यवस्थेच्या माध्यमातून (1) विकासासाठी वित्तीय साधनसामुग्री उभी करणे, (2) उत्पन्न व संपत्तीच्या मालकीतील विषमता कमी करणे आणि (3) भाववाढीचे नियंत्रण करणे, यासारखी उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न करावा हे आता सर्वमान्य झाले आहे. किंबहुना ही उद्दिष्टे कितपत साध्य होतात यावरच सरकारच्या करनीतीचे व कर व्यवस्थेच्या कार्यक्षमतेचे मूल्यमापन केले जाते. 1951 ते 1985 या कालखंडातील भारताच्या करव्यवस्थेचे या दृष्टिकोनातून परीक्षण करणे आज आवश्यक झाले आहे. अर्थात या लेखात त्या तऱ्हेचा सर्वंकष प्रयत्न अभिप्रेत नाही. या लेखाचा उद्देश "भारताच्या प्रत्यक्ष करांचे पुरोगामित्व" तपासून पाहणे एवढाच मर्यादित आहे. भारताची करव्यवस्था विकास-प्रयत्नासाठी वाढत्या प्रमाणात लागणारा करमहसूल गोळा करण्यात बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाली आहे असे म्हणण्यास बराच आधार आहे. कारण 1950-51 मध्ये भारत सरकारचे कर उत्पन्न रु. 659 कोटी इतके होते व त्या वेळी या कर उत्पन्नाचे राष्ट्रीय उत्पन्नाशी असणारे प्रमाण फक्त 6.4 टक्के इतके अल्प होते. 1983-84 मध्ये भारत सरकारचे कर उत्पन्न रु. 11,480 कोटी इतके झाले व या कर उत्पन्नाचे राष्ट्रीय उत्पन्नाशी असणारे प्रमाण 20.2 टक्के इतके झाले आहे. आर्थिक विकासाची एक व्याख्या प्रा. लेविस यांनी अशी दिली आहे की, राष्ट्रीय

* प्रपाठक - अर्थशास्त्र विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

उत्पन्नाच्या 5 टक्के बचत करणाऱ्या अर्थव्यवस्थेचे रूपांतर राष्ट्रीय उत्पन्नाच्या 15 टक्केपेक्षा अधिक बचत करणाऱ्या अर्थव्यवस्थेत करणे, करमहसूल हा राष्ट्रीय बचतीचा एक दर्शक मानल्यास सध्याची करव्यवस्था या निकषावर कार्यक्षम आहे असे म्हणावे लागेल.

करव्यवस्थेमुळे भाववाढीचे नियंत्रण करण्यात भारत सरकारला कितपत यश मिळाले याबद्दल मात्र नेमके मत देणे शक्य होत नाही. विशेषत: जी करव्यवस्था महसुलासाठी अप्रत्यक्ष करांवर अधिक अवलंबून असते व हे प्रमाण जेव्हा वाढत जाते तेव्हा सैध्दांतिक निकषावर तर असेच म्हणावे लगते, की अशी करव्यवस्था (म्हणजे अप्रत्यक्ष करांचे प्राबल्य असणारी) भाववाढीचे नियंत्रण करण्यात फारशी यशस्वी होणार नाही. भारताच्या बाबतीत हेच म्हणावे लागल. करांचे राष्ट्रीय उत्पन्नाशी असणारे प्रमाण गेल्या 35 वर्षात 6 टक्के वरून जवळजवळ 21 टक्के होऊनही या देशात सातत्याने भाववाढीचाच अनुभव, विशेषत: 1956 नंतर आलेला आहे आणि त्याचे महत्त्वाचे कारण आमच्या राष्ट्रीय व घटकराज्य पातळीवरील कररचनेत अप्रत्यक्ष करांचे असणारे प्राबल्य हेच आहे. यामध्ये मुख्यत: जकातकर, उत्पादन शुल्क, विक्री कर, अबकारी कर यांचा समावेश होतो. या करांचा तात्काळ परिणाम हा वस्तूंच्या किंमती वाढण्यामध्येच होतो. भाववाढीचा एक सर्वमान्य परिणाम म्हणजे वाढत जाणारी आर्थिक विषमता म्हणजेच ज्या प्रमाणात अप्रत्यक्ष करामुळे भाववाढीला मदत होते किमान तितक्याच प्रमाणात अप्रत्यक्ष कर आर्थिक विषमता वाढविण्यास कारणीभूत ठरणार. त्यातही पुन्हा अप्रत्यक्ष कर हे मुख्यत: अलवचिक मागणी असणाऱ्या वस्तूवर आकारले जातात. अशा वस्तूंमध्ये अर्थात उपभोग तसेच उत्पादन या दोन्हीसाठी लागणाऱ्या आवश्यक अशा बहुसंख्य वस्तूंचा समावेश होतो. त्यामुळे उत्पादनखर्च वाढीच्या माध्यमातून ( वेतनवाढ, कच्च्या मालाच्या वाढत्या किंमती, वाहतूक दर व वीज दर यांची वाढ इत्यादी ) भाववाढ अधिक तीव्र होण्यास मदत होते. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की अप्रत्यक्ष कर ज्यांच्याकडून प्रारंभी वसूल केले जातात ते लोक हा करभार त्यांच्या वस्तूंच्या ग्राहकावर ढकलणार हे सरकार गृहीत धरते व घडतेही तसेच. अप्रत्यक्ष करांच्या बाबतीत आणखी एक दोष काही प्रमाणात आढळतो. अप्रत्यक्ष कर दोन प्रकारचे असतात. (अ) नग विशिष्ट, (ब) वस्तूमुल्यांवर आधारित नग- विशिष्ट अप्रत्यक्ष कर वस्तूंच्या किंमतीशी न जोडता ते वस्तूच्या नग संख्येशी जोडलेले असतात. एक नग घेतला तर 10 पैसे 2 नग घेतल्यास 20 पैसे इत्यादी असे नग विशिष्ट कर आपोआपच प्रतिगामी किंवा विषमता वाढविणारे ठरतात. काड्यापेटी डॉक्टरने घेतली काय ती शेतमजुराने घेतली तरी उत्पादन शुल्काचा 1 पैसा दोघांनाही सारखाच द्यावा लागतो. अर्थात हा दोष वस्तू मूल्यावर आधारित अप्रत्यक्ष करांच्या बाबतीत थोडा कमी होतो. कारण असा कर वस्तूच्या किंमतीच्या ठराविक टक्के दराने द्यावा लागतो. म्हणजेच जास्त किंमतीची वस्तू घेणाऱ्यास अधिक कर भरावा लागतो. गेल्या दहा पंधरा वर्षात भारत सरकारने आपल्या अप्रत्यक्ष करांची दर रचना अधिक प्रमाणावर वस्तूमूल्य आधारित करण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि त्याचे प्रमाण अजूनही समाधानकारक नाही याची कबुली अलिकडेच सरकारने आपल्या दीर्घकालीन राजवित्तीय धोरण पत्रिकेत (1985) दिली आहे.

साहजिकच आर्थिक विषमता कमी करण्यासाठी प्रत्यक्ष कराचा अधिक प्रभावी व प्रामाणिक वापर करणे हे शासनाचे कर्तव्य ठरते. या बाबतीत आपला अनुभव फारसा समाधानकारक नाही.

**प्रत्यक्ष कर - स्वरूप रचना**

प्रत्यक्ष कर म्हणजे असा की जो कर दुसऱ्यावर ढकलता येणार नाही. ज्याने अंतिम करभार सोसला पाहिजे त्याच्याकडूनच सरकारने कर वसूल केल्यास तो प्रत्यक्ष कर होतो. उत्पादनशुल्क, विक्रीकर, अबकारीकर, जकातकर, करमणूककर हे उत्पादक किंवा विक्रेते यांच्याकडून वसूल केले जातात पण तेवढ्या प्रमाणात वस्तूंची किंमत वाढवून तो करभार ग्राहकावर ढकलला जातो. हे अप्रत्यक्ष कर झाले. याउलट प्राप्तिकर, निगमकर, संपत्तीकर, देणगीकर, भांडवललाभ कर, जमीनमहसूल, व्यवसायकर, वारसाकर, हे कर प्रत्यक्ष कर आहेत. त्यातही भारताचा विचार करता प्राप्तिकर, निगम कर, मालमत्ता कर, देणगी कर, जमीन महसूल, भांडवली लाभ कर हे प्रमुख प्रत्यक्ष कर आहेत. त्यातील वारसा कर ( इस्टेट ड्युटी) 1985 पासून रद्द करण्यात आला आहे. जमीन महसूल उत्पन्नाच्या दृष्टीने नगण्य झाला आहे. शेती उत्पन्न कर फारसा कुठल्या राज्यात बसविलेला नाही व ज्या राज्यात तो आहे तेथे करमुक्त उत्पन्नाची पातळी अतिशय उंच किंवा दर अत्यंत कमी व सवलती व कपातीचे मोठे प्रमाण यामुळे तोही निरर्थक ठरला आहे. एकूण कर उत्पन्नामध्ये प्रत्यक्ष करांचा हिस्सा पूर्वी 35 ते 40 टक्के इतका होता तो आता 15 टक्केपर्यंत खाली आला आहे.त्यामुळे आर्थिक विषमता कमी करण्याचे जे मुख्य साधन ते प्रत्यक्ष करच प्रभावी नाहीत अशी आजची सापेक्ष अवस्था आहे. प्राप्तिकर दात्यांची सापेक्ष संख्या वाढण्याऐवजी घटत आहे. निगम-करापासून (कॉर्पोरेशन टॅक्स) मिळणारे

उत्पन्न वाढलेले आहे. परंतु त्यामुळे व्यापक अर्थाने विषमता कमी होणार नाही असे वाटते.

**सांख्यिकीय आधार :**

प्रत्यक्ष करांचे पुरोगामित्व मोजण्यासाठी काही संख्याशास्त्रीय तंत्रांचा वापर केला जातो. सर्वसाधारणपणे अर्थव्यवस्थेतील विषमता मोजण्यासाठी लॉरेन्स वक्र ही संकल्पना उपयोगात आणली जाते. पुढील चित्राद्वारे लॉरेन्स वक्राची संकल्पना स्पष्ट करता येईल.

आकृती 1 मध्ये अब अक्षावर लोकसंख्येचे दशकत दिसते. (10 टक्के, 20 टक्के) इत्यादी दाखविले आहेत. तसेच अड या लंबात्मक अक्षावर राष्ट्रीय उत्पन्नाचे दशक हिस्से दाखविले आहेत. जर राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप पूर्णतः समान असेल तर त्याचे चित्र अक या सरळ रेषेने (कर्ण) दाखविले जाईल. म्हणजे 10 टक्के लोकांना 10 टक्के राष्ट्रीय उत्पन्न, 20 टक्के लोकांना 20 टक्के राष्ट्रीय उत्पन्न इत्यादी असा त्याचा अर्थ होईल. याउलट पूर्ण विषम अशी उत्पन्नाची वाटणी असल्यास हा वक्र अबक या काटकोनासारखा होईल. म्हणजेच 99 टक्के लोकांना 0




**(लोकसंख्येचे दशक हिस्से)**

टक्के उत्पन्न व शेवटच्या 1 टक्के लोकांना 100 टक्के उत्पन्न असा त्याचा अर्थ होईल. प्रत्यक्षात मात्र पूर्ण समान वाटप किंवा पूर्ण विषम वाटप असा प्रकार असत नाही. उत्पन्नाचे वाटप बहुधा अफक किंवा अपक या वक्रासारखे असते. सर्वसाधारण नियम असा सांगता येईल की, अक या कर्णापासून उत्पन्न वाटप वक्र जितका अधिक अंतरावर असेल तितक्या प्रमाणात उत्पन्नाचे वाटप अधिक विषम असेल. म्हणजेच अपक या वक्रामुळे कमी विषमता दाखविली जाते. तर अफक या वक्रामुळे अधिक विषमता दाखविली जाते. या आकृतीवरून सापेक्ष विषमतेचे मापन करण्याचे एक साधे सूत्र तयार करता येते. त्यालाच गिनीचा दर्शक (**Ginis Coefficient**) असे नाव दिले जाते. हे सूत्र पुढीलप्रमाणे देता

येईल.[1]

अफक वक्राच्या बाबतीत -

$$\text{गिनीचा दर्शक} = \frac{\text{अफक}}{\text{अबक}} \times 100 = \text{ग}_1$$

अपक वक्राच्या बाबतीत -

$$\text{गिनीचा दर्शक} = \frac{\text{अपक}}{\text{अबक}} \times 100 = \text{ग}_2$$

वरील प्रतिशत गुणोत्तरांचे प्रमाण जितके कमी असेल तितकी विषमता जास्त व हे प्रमाण जितके अधिक असेल तितकी समता जास्त. म्हणजेच अपक वक्रामुळे कमी विषमता व्यक्त होते तर अफक वक्रामुळे अधिक विषमता व्यक्त होते. गिनीचा दर्शकाचा आधार घेऊन प्रा. मस्ग्रेव्ह[2] व प्रा. हिरोमित्सु[3]इशी यांनी करांच्या पुरोगामित्वाबद्दल व करांच्या वाटप - समानीकरण गुणकाबद्दल सूत्रे तयार केली आहेत.

**प्रा. मसग्रेव्ह यांचा कर पुरोगामित्व दर्शक**

समजा, वरील उदाहरणात उत्पन्न किंवा संपत्ती वाटपाची कर-पूर्व अवस्था $\text{ग}_1$ या गिनी दर्शकाने दाखविली जाते व करपश्चात उत्पन्न किंवा संपत्ती वाटपाची अवस्था $\text{ग}_2$ या गिनी दर्शकाने दाखविली जाते. तर, संबंधित कराचे पुरोगामित्व दाखविण्यासाठी प्रा. मसग्रेव्ह $\frac{\text{ग}_1}{\text{ग}_2}$ हे गुणोत्तर वापरतात.

आर्थिक विषमता आहे तेवढीच राहते. जर $\text{ग}_1$ हे गुणोत्तर एकपेक्षा कमी असल्यास संबंधित कर प्रतिगामी ठरतो कारण त्यामुळे आर्थिक विषमता वाढते.

**प्रा. हिरोमित्सुशी यांचा करांचा वाटप समानीकरण गुणक -** प्रा. हिरोमित्सु इशी या जपानच्या अर्थशास्त्रज्ञांनी या सूत्रात थोडी सुधारणा केली व वाटप समानीकरण गुणकाची संकल्पना मांडली. हे सूत्र पुढीलप्रमाणे देता येईल.

$$\text{वाटप समानीकरण गुणक} = \frac{\text{ग}_1 - \text{ग}_2}{\text{ग}_1}$$

हे गुणोत्तर एकापेक्षा अधिक असू शकणार नाही. अर्थात ते $\frac{1}{10}, \frac{2}{10}, \frac{3}{10}, \frac{4}{10}, \frac{9}{10}, \frac{99}{100}$ असे असू शकेल. या मर्यादित, हे गुणोत्तर जितके अधिक तितकी संबंधित कराची वाटप समानीकरणाची क्षमता किंवा त्याचे पुरोगामित्व अधिक.[4]

**भारतातील प्रत्यक्ष करांचे पुरोगामित्व**

तक्ता क्र. 1 मध्ये भारतातील प्राप्तिकर, संपत्ती कर, वारसा कर, देणगी कर आणि भांडवली लाभ कर या करांच्या संदर्भात पुरोगामित्वदर्शक ( $\text{ग}_1$ )या बाबतीत आकडेवारी दिलेली आहे.

तक्ता क्र. 1 मधील आकडेवारीवरुन आपण पुढील - विधाने करू शकतो.(1)भारतातील प्रत्यक्ष कर प्रतिगामी नाहीत. कारण वर उल्लेखिलेल्या सर्वच करांच्या बाबतीत

**तक्ता क्र. 1**

**भारतीय प्रत्यक्ष करांचे पुरोगामित्व दर्शक**

| वर्ष | प्राप्तिकर | संपत्ती कर $\frac{\text{ग}_1}{\text{ग}_2}$ | वारसा कर $\frac{\text{ग}_1}{\text{ग}_2}$ | देणगी कर $\frac{\text{ग}_1}{\text{ग}_2}$ | भांडवली लाभ कर $\frac{\text{ग}_1}{\text{ग}_2}$ |
|---|---|---|---|---|---|
| 1961 - 62 | 1.1811 | 1.0032 | 1.06632 | 1.0238 | 1.0503 |
| 1965 - 66 | 1.1871 | 1.0036 | 1.0608 | 1.0777 | 1.0574 |
| 1971 - 72 | 1.3146 | 1.0049 | 1.0880 | 1.0608 | 1.0367 |
| 1977 - 78 | 1.4267 | 1.0056 | 1.0800 | 1.0771 | 1.4420 |

आधार : G Thimmaiah - Perspectives on Tax Design and tax Reform 1984 P 109

हे गुणोत्तर एकापेक्षा अधिक असल्यास कर पुरोगामी आहे. अशा करामुळे विषमता कमी होते. हे गुणोत्तर बरोबर एक इतके असल्यास कर समप्रमाण आहे. अशा करामुळे नमूद केलेल्या सर्व वर्षामध्ये पुरोगामित्वदर्शक एकपेक्षा अधिक आहेत. (2) प्राप्तिकराच्या बाबतीत इतर करांच्या तुलनेने पुरोगामित्व दर्शकाचे मूल्य जास्त आहे व ते वाढत आहे.

म्हणजेच भारतातील प्राप्तिकर अधिक पुरोगामी आहे व त्यातील पुरोगामित्व वाढत आहे. पर्यायाने असे म्हणता येईल उत्पन्नाची विषमता कमी करण्याच्या संदर्भात प्राप्तिकर काही काही प्रमाणात अधिकाधिक प्रभावी ठरत आहे. (3) तुलनात्मकदृष्ट्या भारतातील इतर प्रत्यक्ष कर ( संपत्ती कर वारसा कर, देणगी कर अेणि भांडवली लाभकर ) तितके अधिक पुरोगामी नाहीत. त्यातही असे दिसते की, संपत्ती कराचे पुरोगामित्व अतिशय अल्प प्रमाणात वाढत आहे. याउलट वारसा कराचे बाबतीत पुरोगामित्व अत्यल्प प्रमाणात कमी-जास्त झालेले दिसते. हाच प्रकार काहीसा देणगी कराच्या बाबतीतही दिसतो परंतु भांडवली लाभकराचे बाबतीत 1977-78 हे वर्ष लक्षात घेता पुरोगामित्वाचा दर्शक सर्वात अधिक दिसतो.

**भारतीय प्रत्यक्ष करांचे वाटप-**
**समानीकरण गुणक**

तक्ता क्र. 2 मध्ये प्राध्यापक हिरोमित्सु इशी यांच्या सूत्राप्रमाणे भारतातील प्राप्तिकर संपत्ती कर, वारसा कर, देणगी कर व भांडवली लाभकर या प्रत्यक्ष कराच्या बाबतीत तयार केलेले वाटप समानीकरण गुणक दिलेले आहेत.

तक्ता क्र. 2 मधील आकडेवारीवरून आपण पुढील विधाने करू शकतो. (1) भारतातील प्रत्यक्ष करांची वाटप आधार: तक्ता क्र. 1 प्रमाणेच.

तक्ता क्र. 2 मधील आकडेवारीवरून आपण पुढील विधाने करू शकतो. (1) भारतातील प्रत्यक्ष करांची वाटप समानीकरण क्षमता अत्यल्प आहे. (2) तुलनात्मक दृष्ट्या प्राप्तीकराची वाटप समानीकरण क्षमता अधिक आहे व ती वाढत गेलेली आहे. (3) संपत्ती कराची वाटप समानीकरण क्षमता सर्वात कमी होती व आजही ती कमी आहे तथापि अभ्यास केलेल्या कालखंडात काहीशी वाढलेली दिसते. (4) वारसा कर व देणगी कर यांची वाटप समानीकरण क्षमता कमी अधिक झालेली दिसते. तथापि भांडवली लाभकराची वाटप समानीकरण क्षमता 1977-78 यावर्षी सर्वात अधिक असल्याचे दिसते.

**समारोप**

आर्थिक विषमता कमी करण्यासाठी कररचना व विशेषत: त्यातील प्रत्यक्ष करांचा वापर करता येऊ शकेल, असे शास्त्रीय प्रतिपादन आहे. सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, त्या दृष्टीने भारताच्या बाबतीत मुख्यत: प्राप्तिकराचाच वाढत्या प्रमाणात वापर करण्यात आला आहे. परंतु उत्पन्न वाटपातील विषमता कमी करण्यानेच सर्वंकष आर्थिक विषमता जलद कमी करता येईल असे नाही. त्या दृष्टीने संपत्ती कर, वारसा कर आणि देणगी कर यांचाही अधिक प्रभावी वापर करण्याची गरज वरील आकडेवारीवरून स्पष्ट होते. सध्या तर भारत सरकारने वारसा कर (इस्टेट ड्युटी) रद्द केलेला आहे. हे लक्षात घेता आर्थिक विषमता कमी करण्यासाठी सरकारने संपत्ती कर आणि देणगी कर यांच्या पध्दतीमध्ये आणि दर रचनेमध्ये वाढ करण्याची आवश्यकता दिसते. सुदैवाने भांडवली लाभकराच्या बाबतीत सरकार योग्य दिशेने बदल करत आहे. प्रत्यक्ष करांचा वापर आर्थिक विषमता कमी करण्यासाठी करायचा असल्यास फक्त प्राप्तिकराच्या वाटप समानीकरण क्षमतेवर अवलंबून

**तक्ता क्र. 2**

भारतातील प्रत्यक्ष करांचे वाटप समानीकरण गुणक

$$\frac{ग_1 - ग_2}{ग_1}$$

| वर्ष | प्राप्ती कर | संपत्ती कर | वारसा कर | देणगी कर | भांडवली लाभ कर |
|---|---|---|---|---|---|
| 1961- 62 | 0.1533 | 0.0033 | 0.0621 | 0.0232 | 0.0479 |
| 1965- 66 | 0.1476 | 0.0035 | 0.0573 | 0.0721 | 0.0543 |
| 1971-72 | 0.2393 | 0.0049 | 0.0809 | 0.0573 | 0.0354 |
| 1977- 78 | 0.2991 | 0.0054 | 0.0741 | 0.0776 | 0.3065 |

राहता येणार नाही. त्यासाठी संपत्ती देणगी व भांडवली लाभकर तसेच वारसा कर यांचा प्रभावी वापर करण्याची गरज वरील आकडेवारीवरून स्पष्ट होते. या ठिकाणी हे लक्षात घेतले पाहिजे की, संपत्ती आणि मालमत्ता यांच्या वाटपातील आजची विषमता उद्याच्या उत्पन्न वाटपात विषमता निर्माण करणारी असते, व विषमता अधिक वाढण्याचे तेच अधिक प्रभावी कारण असते.

## संदर्भ


1. Samuelson P. A. Economics, 8th ed. 1970, p. 113.
2. Musgrave and Musgrave - Public Finance in Theory and Pracitce - MacGraw Mill and Kogakushna Tokyo 2 nd ed. 1976, p. 383.
3. Hinuitsu Ishi, Effects of Taxation on the Distribution of Income and Wealth in Japan, Hitotsubashi Journal of Economics, June 1980.
4. G. Thimmaiah - Perspectives on Tax Design and Tax Reform Ashish pub. house New Delhi 1984, p.101.


## मराठी अर्थशास्त्र परिषद

### आजीव सदस्यांची यादी

(एप्रिल-जून 1988 अंकावरून पुढे चालू)

| | |
|---|---|
| 410 | प्रा. बन्सीभाई शं चौधरी, शहादा (जि. धुळे) |
| 411 | प्रा. वसुधा जोशी, पुणेप्रा. |
| 412 | (श्रीमती) सुशीला जोशी, नागपूर |
| 415 | प्रा. डॉ. सौ. वनश्री वाघमारे, नाशिक |
| 416 | प्रा. एम्. एस्. मोहिते, कोल्हापूर |

# राष्ट्रीय उत्पन्न : संकल्पना आणि मापन

* प्रदीप आपटे

या अगोदरच्या लेखात ( अर्थसंवाद : जुलै सप्टेंबर 1987 ) स्थूल देशीय उत्पादन ( **gross domestic product**) मोजण्याच्या तीन पध्दती आपण पाहिल्या. त्या म्हणजे उत्पादन-रीती ( **production approach** )नक्त घटक-उत्पन्न रीती वा ( **net factor payment approach**) आणि अंतिम वापर खर्च रीती वा ( **final use or expenditure approach** ) कोणत्याही पध्दतीचा अवलंब केला तरी त्यातून एकूण उत्पादनाची राशी तेवढीच येणार. ( अर्थातच अगोदर स्पष्ट केलेल्या गृहीत स्थितीत. ) एकूण उत्पादनाचा अंतेरिम वापर आणि अंतिम वापर असे विभाजन, अशा अंतिम उत्पादनाचे एकूणात मूल्य आणि घटक आदानांना मिळालेले नक्त उत्पन्न यांच्या एकूण राशीतील समानता व त्यामधील परस्पर संबंधाने उदभवणारा राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह याचा आढावा आपण घेतला.

आतापर्यंत सरकारी हस्तक्षेप व खर्च व उत्पन्न इत्यादी गोष्टी अस्तित्वात नाही असे आपण गृहीत धरले आहे. आता हे गृहीत शिथिल करू. सरकार वा शासन अस्तित्वात असल्याने अनेक पैलू बदलू शकतात. पण आतापुरते शासकीय वा सरकारी कृतींचा आवाका खालील दृष्टींपुरताच मर्यादित ठेवू. सरकार हे उत्पादक क्षेत्र नाही म्हणजे ज्या अर्थाने शेती, उद्योग, मत्सोद्योग, बँक, विमा ही उत्पादन क्षेत्र आहेत, ह्या अर्थाने 'सरकार' उत्पादन 'क्षेत्र' नाही. सामान्य प्रशासन, शांतता-सुव्यवस्था व अन्य विकासाला पोषक कृती सरकार करते. त्यासाठी लागणारा खर्च भागविण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर लावते. त्यापैकी प्रत्यक्ष कर उत्पादन-क्षेत्र (**production sector**) व गृहक्षेत्र (**house-hold - secto** ) यांच्या 'उत्पन्ना'वर (**income**) बसविला जाईल तर अप्रत्यक्ष कर उत्पादन क्षेत्राने केलेल्या

*अधिव्याख्याता, बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय,पुणे.

उत्पादनावर ( **Production** ) असेल. मात्र तो मांडताना आदान व प्रदानावरील सर्व कर एकत्र धरून प्रत्येक क्षेत्रासाठी त्याच्या आदानाखालोखाल मांडली आहे. तर गृह-क्षेत्रातून येणारा प्रत्यक्ष कर अधिक उत्पादन क्षेत्रातून येणारा प्रत्यक्ष कर अधिक अप्रत्यक्ष कर ,असे सरकारचे उत्पन्न झाले. त्यातून सरकार खर्च करणार. प्रशासकीय व अन्य सार्वजनिक खर्च म्हणजे अंतिम उत्पादनाला सरकारी क्षेत्राकडून येणारी मागणी.

म्हणूनच आता एकूण अंतिम उत्पादन किंवा वापर न लिहिता, त्याचे भाग पाडू. जो काही अंतिम उपभोग खर्च अर्थव्यवस्थेत केला जाईल त्याचे सहसा तीन भाग स्वतंत्र नोंदविले जातात. (1) खाजगी उपभोग म्हणजे सर्व कुटुंब व विना-नफातत्त्वावर चालणाऱ्या संस्था उदाहरणार्थ ट्रेडयुनियन (2) सरकारी उपभोग खर्च (3) स्थूल देशीय निर्गिती ( **gross domestic capital formation** ). अंतिम उत्पादनाचे खाजगी उपभोग (C), सरकारी उपभोग (G), आणि नवीन गुंतवणूक - स्थूल भांडवल निर्गिती (I) असे भाग पाडण्यास केन्सवादी अर्थविचाराचा प्रभाव कारणीभूत आहे. खाजगी उपभोग साधारणत: अल्पकालात उत्पन्नाच्या प्रमाणात स्थिर राहतो. सरकारी खर्च काही प्रमाणात धोरणानुसार बदलता येतो. किंवा तो कमी-जास्त करण्याजोगी परिस्थिती असते. भांडवलनिर्मिती जेव्हा मुख्यत: खाजगी क्षेत्रावर अवलंबून तेव्हा ती व्याजदर व बाजाराबद्दलची भविष्यकालिक अपेक्षा यानुसार बऱ्याच मोठ्या प्रमाणात वाढू शकते किंवा घटू शकते. त्यातही बाजारपेठेचा एकूण परिणाम होऊन साठा ( **stocks** ) व स्थिर जिंदगी वेगवेगळ्या प्रमाणात व वेगाने कमी जास्त होऊ शकतात. परंतु त्यामधील सरकारी क्षेत्राने केलेली गुंतवणूक नियोजनरूपाने स्थिर राखता येते. इथे हे लक्षात घ्यायला पाहिजे की ' भांडवलनिर्मिती 'मध्ये असलेला सरकारचा वाटा इत्यादी गोष्टी आपण मुद्दाम दृष्टीआड केला आहे. सरकारक्षेत्राचा त्यामधील वाटा आणि सरकारी उपभोग खर्च (G) यांची गल्लत करू नये. ज्याप्रमाणे खाजगी क्षेत्राकडून उपभोगावर खर्च केला जातो .त्याच प्रकारचा हा सरकारी चालू उपभोग खर्च आहे. सरकारी खर्चाचा जो भाग भांडवलनिर्मितीत जातो तो ' सरकारी खर्च ' या सदरात मोजलेला नाही तर गुंतवणुकीचा किंवा भांडवलनिर्मितीचा म्हणजे (I) भाग म्हणूनच धरलेला आहे.

चक्राकारी प्रवाहानुसार तयार झालेल्या एकूण वर्धित मूल्याचा एक भाग गृहसंस्थाकडे मजुरी नफा व खंड या रूपाने जातो. दुसरा भाग अप्रत्यक्ष कर देण्यात जातो. तिसरा भाग उत्पादन संस्थावरील प्रत्यक्ष उत्पन्न कर देण्यात जातो. (उदा. निगम कर) उर्वरित भाग न वाटलेल्या नफा स्वरूपात उत्पादन क्षेत्राकडे त्या क्षेत्राची बचत म्हणून राहतो. या वाटल्या गेलेल्या उत्पन्नातूनच मागणी तयार होते. गृहसंस्था वैयक्तिक/खाजगी उपभोगावर खर्च करतात. सरकार सर्व प्रकारच्या करउत्पन्नातून मिळालेले उत्पन्न काही वस्तू-सेवा खरिदण्यावर खर्च करते आणि सर्व अर्थव्यवस्थेत मिळून (म्हणजे उत्पादन क्षेत्र, गृह-क्षेत्र व सरकार-क्षेत्र यात मिळून) जी बचत होते तिचा वापर देशात नव्याने घडून येणाऱ्या भांडवल गुंतवणुकीसाठी केला जातो. उत्पन्न व उपभोग यांच्या चक्राकार प्रवाह बचत व सरकारी कर व खर्च याचा अंतर्भाव केला तर खालील प्रमाणे दिसतो.

एचएच (**HH**) = गृहसंस्था क्षेत्र पीआर (**PR**) = उत्पादन क्षेत्र



अगोदरच्या लेखात अंतेरिम व अंतिम उपभोग दर्शविणारी आंतर - उद्योग सारणी वापरून एकूण अंतिम उत्पादन (320 + 200 + 50) आणि एकूण अप्रत्यक्ष कर सहित वर्धित मूल्य [(285 + 130 + 115) + (15+20+5) हे आदान प्रदानावरील अप्रत्यक्ष कर)] यांचे मूल्य एकत्र करता येते हे आपण पाहिले आहे. आता त्याच उदाहरणाची जरा फोड करून विचार करू.

अगोदरच्या लेखात जे ' अंतिम उत्पादन ' म्हणून एकूण संख्या दिल्या होत्या त्याचीच खाजगी उपभोग (सरकारी उपभोग गुंतवणूक अशी विभागणी केलेली आढळेल वरील तक्त्यात पान क्र. 44 दाखविल्याप्रमाणे प्रत्येक क्षेत्राच्या अंतिम उत्पादनापैकी किती खाजगी उपभोगासाठी किती सरकारी उपभोगासाठी आणि किती एकूण नव्या भांडवल निर्मितीसाठी विकले गेले याची फोड दिली आहे. उदा. क्षेत्र I ने एकूण रुपये 320 इतके अंतिम उत्पादन केले त्यापै की 200 रुपये इतके उत्पादन खाजगी उपभोगासाठी विकले गेले 60 इतके सरकारी उपभोगासाठी विकले गेले आणि 60 एवढे भांडवल निर्मितीसाठी वापरले गेले. आता आपण भांडवलनिर्मिती असे म्हणताना ती गुंतवणूक कोणी केली सरकारी क्षेत्राने की बिगर-सरकारी क्षेत्राने याचा फरक केलेला नाही. तसेच गुंतवणूक स्थिर जिंदगी (**fixed assets**)मध्ये आहे की साठ्यातील बदल (**changes in stocks**) या स्वरूपात आहे याचाही फरक या टप्प्यावर लक्षात घेण्याचे कारण नाही. पुढे गुंतवणूकविषयक विश्लेषणात ह्याचा आढावा आपण घेणार आहोत.

त्याचप्रमाणे उत्पादन-रीतीने (**production approach**) प्रत्येक क्षेत्रात जे वर्धित मूल्य निर्माण झाले त्याची स्तंभवार मांडणी पाहून कल्पना येते. या आधीच्या उदाहरणाशी तुलना करता आता फरक एवढाच की आधी आपण 'सरकार' अस्तित्वात नाही असे मानले असल्याने कोणत्याच प्रकारच्या खरेदी-विक्री व्यवहारावर अप्रत्यक्ष कर असण्याचा प्रश्न नव्हता. आता एकूण आदान खर्चाबरोबर अप्रत्यक्ष करसुध्दा वजा करून जे राहील ते 'घटक-किंमतीतले' एकूण देशीय उत्पादन. उदाहरणार्थ पूर्वी 570 एवढे वर्धितमूल्ये किंवा 'अंतिम उत्पादन' हे घटक किंमतीचे एकूण देशीय उत्पादन आपण मानले होते. ते आता घटक किंमतीतले म्हणता येणार नाही. कारण त्यातून आता अप्रत्यक्ष कर वजा करावे लागतील. म्हणजेच पूर्वीच्या उदाहरणात सरकारी क्षेत्र अस्तित्वात नाही असे गृहीत धरल्याने 'अप्रत्यक्ष करा'चा प्रश्नच उद्‌भवत नव्हता आणि त्याच गृहीतामुळे घटक किंमतीतले उत्पादन आणि बाजार किंमतीतले उत्पादन एकच ठरत होते आता त्यातून 40 इतके अप्रत्यक्ष कर वजा केल्यानंतर राहाणारे 530 हे घटक किंमतीतले देशीय उत्पादन असे म्हणावे लागेल. क्षेत्र I, II व III ने अनुक्रमे 15, 20, 5 असा अप्रत्यक्ष कर आदानांवर भरला त्याची बेरीज 40 रु. तीच एकूण करयुक्त वर्धित मूल्यातून वजा केली . आता उरले 530 रुपये एवढे वर्धित मूल्य.

यातून आता उत्पादन क्षेत्रे कोणकोणते खर्च भागविणार. तर मजुरी व पगार, उत्पादनक्षेत्राच्या व्यवसाय संस्थेच्या उत्पन्नावरील प्रत्यक्ष कर, कर्जाऊ भांडवलावरचे व्याज, जमिनीचा खंड आणि उर्वरित नफ्यापैकी वाटप केलेला नफा उदा. लाभांश. एवढे केल्यावरही काही नफा व्यवसाय संस्था किंवा उत्पादन क्षेत्राकडे न वाटलेला जो वरकड नफा ( **undistributed profits**) ती रक्कम म्हणजे व्यवसाय संस्थेची बचत ( **savings** ) होय. उदा. तक्ता क्रमांक I प्रमाणे I क्षेत्रात 300 रुपये एवढे अप्रत्यक्ष करपूर्व वर्धितमूल्य निर्माण केले. त्यापैकी 15 रुपये एवढा अप्रत्यक्ष कर सरकारकडे भरला. त्यातून उरले अप्रत्यक्ष करोत्तर वर्धितमूल्य 285 रुपये. यातून उत्पन्न करापोटी उदा. निगम कर ( **corporate tax** ) 5 रुपये भरले त्यानंतर 250 रु. मजुरी, 73 रु. खंड 5 रु. इतका वाटलेला नफा व व्याज म्हणून दिला आणि उर्वरित न वाटलेल्या लाभाची रक्कम रुपये 72 ही या क्षेत्राची बचत होय. त्याच प्रमाणे II ने अप्रत्यक्ष करोत्तर वर्धितमूल्य रुपये 130 मधून 20 प्रत्यक्ष उत्पन्न कर, 70 रुपये मजुरी, 20 रुपये वाटप केलेला नफा व व्याज, 2रु भाटक, दिले आणि उर्वरित रुपये 13 इतकी बचत केली. याचप्रमाणे क्षेत्र III च्या व्यवहाराचे वर्णन III या खालील स्तंभ वाचून करता येईल.

आता उत्पादनाचे क्षेत्र I, II, व III असा अलगअलग विचार न करता या तिन्हीचे मिळून जे बनते त्यालाच म्हणायचे 'एकूण उत्पादन क्षेत्र' ( **production sector**) या एकंदर उत्पादन क्षेत्राने अप्रत्यक्ष करोत्तर 530 रुपये एवढे वर्धितमूल्य तयार केले.त्यातला एकूण (5+20 +15)= 40 रुपये इतका वाटा प्रत्यक्ष-उत्पन्न कराचा होता. म्हणजे उत्पादन क्षेत्राकडून सरकारला किती महसूल मिळाला? तर अप्रत्यक्ष कर रुपाने रुपये 40 व प्रत्यक्ष कर रूपाने रुपये 40 एवढा. त्यानंतर उत्पादन क्षेत्राने मजुरी रूपाने 400 रुपये. व्याज व वितरित नफा यापोटी 30 रुपये खंड रूपाने 20 रुपये एवढी रक्कम उत्पादन घटकाच्या मालकांना म्हणजेच ते पुरविणाऱ्या गृहक्षेत्राला ( **household** )

आता हीच प्रकिया आपण अंकगणिती उदाहरणाने समजावून घेऊ.
लेखांक 1 मध्ये दिलेल्या तक्त्याचे थोडे सुधारित रूप आपण त्यासाठी वापरू.

| | I | II | III | अंतेरिम उत्पादन | अंतिम उत्पादन: खाजगी उपभोग | सरकारी उपभोग | भांडवल निर्मिती | एकूण बेरीज | | एकूण उत्पादन मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| I | 100 | 80 | 00 | 180 | 200 | 60 | 60 | 320 | | 500 |
| II | 50 | 120 | 30 | 200 | 100 | 20 | 80 | 200 | | 400 |
| III | 50 | 50 | 50 | 150 | 25 | 15 | 10 | 50 | | 200 |
| एकूण आदान | 200 | 250 | 80 | 530 | 325 | 95 | 150 | 570 | | 1100 |
| अप्रत्यक्ष कर | 15 | 20 | 5 | | | | | एकूण 40 | (PR) | (G) |
| वर्धित मूल्य पैकी | 285 | 130 | 115 | | | | | 530 | | |
| a) प्रत्यक्ष कर | 5 | 20 | 15 | | | | | 40 | (PR) | (G) |
| b) मजुरी / पगार | 250 | 70 | 80 | | | | | 400 | (PR) | (HH) |
| c) वाटप झालेला नफा/व्याज | 5 | 20 | 5 | | | | | 30 | (PR) | (HH) |
| d) भाटक (खंड) | 13 | 2 | 5 | | | | | | (PR) | (HH) |
| e) न वाटलेला नफा | 12 | 18 | 10 | | | | | 20 | | |
| f) भाग (बचत) (PR) | | | | | | | | 40 | | |
| | 500 | 400 | 200 | | | | | | | |



sector दिली. हेच तक्त्यामध्ये **PR G** आणि **(PR HH)** या खुणांनी दर्शविले आहे. तसेच उर्वरित अवितरित नफा स्वरूपाने रुपये 40 एवढी बचत उत्पादन क्षेत्राने केली. म्हणजेच संपूर्ण देशाचे म्हणून जर भांडवल-खाते मानले तर त्यात उत्पादन क्षेत्राने रुपये 40 एवढ्या बचतीची भर घातली. एकूण स्थूल भांडवलनिर्मितीसाठी ( gross domestic capital formation ) लागणाऱ्या बचतीचा हा एक भाग आहे. पण हे त्यांनी तरी कुठून मिळवले? तर जे अंतिम उत्पादन झाले ते खाजगी गृहक्षेत्राच्या, सरकारी क्षेत्राच्या उपभोगासाठी आणि भांडवलनिर्मिती व गुंतवणूक अशा वापरासाठी जी विक्री त्यांनी केली त्यातूनच हेच दुहेरी नोंदणी तत्त्वाने लिहिले तर उत्पादक-क्षेत्राची लेखा ( account) खालीलप्रमाणे दिसेल.

मजुरी + व्याज व वितरित नफा + खंड या रूपाने ( 400 + 30 + 20) इतके उत्पन्न मिळाले. अर्थातच सरकार या क्षेत्रावरही प्रत्यक्ष ( उदा. उत्पन्नकर ) कर लावते.म्हणजे त्यानंतर जे उत्पन्न राहील तेच विनियोग - योग्य (disposable) वैयक्तिक ( personal) उत्पन्न पण सरकार जसा कर लावते, त्याचप्रमाणे अनुदान ( subsidy ) किंवा उत्पन्न हस्तांतरण ( transfer incomes ) या स्वरूपात काही रक्कम देते. समजा त्याचे मूल्य रुपये 10 इतके आहे. तर समजा आपल्या उदाहरणानुसार गृहक्षेत्रात समजा 45 रु. एवढा प्रत्यक्ष कर दिला आणि त्याचबरोबर सरकारकडून पेन्शन, अपंगसहाय्य इत्यादी स्वरूपात या क्षेत्राला 10 इतकी रक्कम मिळाली, त्यामुळे सरकारला गृहक्षेत्राने बट्ट 35 रुपयेच दिले. त्याची नोंद रुपये 10 इतकी प्राप्ती ( receipts) अशी उजव्या बाजूला आणि रुपये 45 प्रत्यक्ष

**उत्पादन क्षेत्र ( PR )**

| | रुपये | | रुपये |
|---|---|---|---|
| 1) अप्रत्यक्ष कर ( G 7 ) | 40 | 7) खाजगी उपभोग ( HH 2 ) | 325 |
| 2) प्रत्यक्ष कर ( G 4 ) | 40 | 8) सरकारी उपभोग ( G 2) | 95 |
| 3) मजुरी वेतन ( HH 4 ) | 400 | 9) भांडवल गुंतवणूक ( 1 ) | 150 |
| 4) व्याज वितरित नफा ( HH 4 ) | 30 | | |
| 5) खंड ( HH 6 ) | 20 | | |
| 6) अवितरित नफा बचत | 40 | | |
| | 570 | | 570 |

यातील द्विनोंदी स्वरूप लक्षात येण्यासाठी प्रत्येक नोंदीपुढे त्याच्या विरुद्ध दिशेची नोंद कोणत्या खात्यावर कुठल्या क्रमांकाने दिसते याचा उल्लेख केला आहे. उदा. एचएच असा संकेत क्रमांक लिहिला आहे. याचा अर्थ एचएच म्हणजे गृहसंस्था क्षेत्राच्या खात्यावर क्रमांक 4 च्या नोंदीमध्ये त्याचा विरुद्ध परिणाम (opposite effect) नोंदलेली आढळेल.

आता याच रितीने गृहसंस्था क्षेत्राचे खात्यावर कोणत्या नोंदी येतात ते पाहू. गृहसंस्था क्षेत्राला उत्पादन क्षेत्राकडून

कर असे देणे (payments) डाव्या बाजूला लिहून केली आहे.आता जे उत्पन्न राहील ते गृहक्षेत्र आपल्या खाजगी उपभोगावर खर्च करणार. म्हणजेच उत्पादनक्षेत्राकडून काही वस्तू-सेवांची खरेदी करणार, ती खरेदी किती आहे याची एक बाजू ( म्हणजे विक्रीच्या बाजूने ) अगोदरच उत्पादन क्षेत्राच्या खात्यावर प्राप्ती ( receipt ) च्या बाजूला नोंदली आहेत . आता त्याची खरेदीच्या अंगाने होणारी नोंद म्हणजे गृहक्षेत्राच्या खात्यावरील खर्च ( expenditure or payment ) या स्वरूपात होणार.

## गृहक्षेत्र खाते (H H)

| | रुपये | | रुपये |
|---|---|---|---|
| 1. प्रत्यक्ष कर ( G 5 ) | 45 | 4. मजुरी (PR 3) | 400 |
| 2. खाजगी उपभोग (PR 7) | 325 | 5. व्याज वितरीत नफा (PR 4) | 30 |
| 3. बचत (Cap 2) | 90 | 6. खंड (PR 5) | 20 |
| | | 7. हस्तांतरणीय देणी (G1) | 10 |
| | 460 | | 460 |

अर्थातच मिळालेल्या एकूण मिळकतीतून कर व उपभोग खर्च वजा जाता राहिले तीच गृहक्षेत्राची बचत म्हणजे रुपये 90.

आता अशीच खाते नोंद सरकारी क्षेत्राची करू. सरकारने उत्पादन क्षेत्राकडून अप्रत्यक्ष करांपोटी 40 रुपये, प्रत्यक्ष करापोटी 40 रु., गृहक्षेत्राकडून प्रत्यक्ष करापोटी 45 रुपये एवढा महसूल गोळा केला. त्यापैकी स्वतःच्या वस्तुसेवारुप उपभोग विनियोगासाठी 95 रुपये एवढा खर्च झाला, आणि गृहक्षेत्र खात्याला 10 रुपये एवढे हस्तांतरणीय- देणीस्वरूपात दिले. यानंतर जे उरले म्हणजे रुपये 20 तीच सरकारी क्षेत्राची बचत याचे खाते रूप खालीलप्रमाणे

## सरकारी क्षेत्र (G)

| | रुपये | | रुपये |
|---|---|---|---|
| 1) हस्तांतरणीय देणे ( H H 7 ) | 10 | 4) प्रत्यक्ष कर ( P R 2 ) (उत्पादन क्षेत्रावरील) | 40 |
| 2) सरकारी उपभोग ( P R 8 ) | 95 | 5) प्रत्यक्ष कर ( H H 1 ) (गृहक्षेत्रावरील) | 45 |
| 3) बचत ( Cap 3 ) | 20 | 6) अप्रत्यक्ष कर ( P R 1) | 40 |
| | 125 | | 125 |

आतापर्यंत प्रत्यक्ष क्षेत्रात म्हणजे उत्पादनक्षेत्रात, गृहक्षेत्रात, सरकारी क्षेत्रात 'बचत' या स्वरूपात काही रक्कम नोंदलेली दिसते ही बचत कुठे जाते. तर अर्थातच भांडवल बाजारामार्गे प्रत्यक्ष गुंतवणूक या स्वरूपात उत्पादन क्षेत्राकडे भांडवलनिर्मितीला लागणारा संचय म्हणून त्याचा ओघ वापरला जातो. ही गुंतवणूक कोण, किती व कोणत्या उत्पादनक्षेत्रात, स्थिर की चल वा चालू ( **fixed or current / variable** ) याचा विचार आपण नंतर करू. पण संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी म्हणून एक भांडवल उभारणी व विनियोगाचे खाते आहे असे मानले जाते. त्यामध्ये निरनिराळ्या क्षेत्रांकडून होणारी बचत ही मिळकत ( **receipt**) म्हणून गणली जाते व एकूण अर्थव्यवस्थेत होणारी गुंतवणूक त्यावरचा खर्च म्हणून गणली जाते, अर्थातच 'घटनोत्तर' स्वरूपात ( **expost** ) बचत आणि गुंतवणूक नेहमीच सारखे असणार त्यामुळे तेही खाते संतुलित ( **balalanced**) दिसणार.

**भांडवल खाते**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | भांडवलनिर्मिती वा गुंतवणूक ( PR 4 ) | 150 | 2) | By गृहक्षेत्रबचत ( HH 3 ) | 90 |
| | | | 3) | By सरकारी क्षेत्र बचत ( G 3 ) | 20 |
| | | | 4) | By उत्पादन क्षेत्र बचत ( PR 6 ) | 40 |
| | | 150 | | | 150 |

अशा रितीने अगोदरचा चक्राकार प्रवाह या खातेनिहाय
व्दिनोंदी पध्दतीने नोंदणी करून लिहिता येतो.

**टीप:** (प्रत्येक खात्यावरील प्रत्येक नोंदणीचा विरुध्दक्रमी परिणाम कोणत्या खात्यावर दिसतो त्याचा क्रमांक नीट पाहून तसा तो दिलेला असल्याचा पडताळा घ्यावा त्यामुळे व्दिनोंदी पध्दतीचे स्वरूपही अधिक नीट अंगवळणी पडेल.)

## ग्रंथ- परिक्षण

# अर्थशास्त्र परिभाषा कोश*

पाखंडाचे दरकुटे । मोडी वाग्वाद अव्हांटे ।
कुतर्कांची दुष्टें। सावजें फेडी ।।

ज्ञानेश्वरी, अध्याय 12 वा, ओवी 14 वी.

पाखंडरूपी ( नास्तिकरूपी किंवा सुस्तपणाच्या ) दरडी व वितंडवादरूपी आडवाटा मोडून कुतर्करूपी हिंस्र पशूंचा नाश कर.

मराठीच्या राज्यात संवादरूपी फळांनी बहरलेल्या दाट व विस्तीर्ण उद्यानांचे त्यांच्या गुरुजवळ मागणे मागताना ज्ञानदेवांनी तर्कविसंगत ( मोकाट ) लिखाण करणाऱ्या दुष्टांचा नाश करण्याची केलेली विनंती काही मोजके अपवाद वगळल्यास सध्याच्या मराठीतील अर्थशास्त्रीय लिखाणालाही लागू पडते, असा कोणी निष्कर्ष काढल्यास तो गैरवाजवी ठरू नये. नुकत्याच संपलेल्या पदव्युत्तर स्तरावरील ' औद्योगिक अर्थशास्त्र ' या प्रश्नमालिकेत भारतातील ज्यूट उद्योगाच्या समस्या व त्यावरील उपाय असा एक प्रश्न होता. त्या संबंधात चर्चा करताना सर्वच परिक्षार्थींनी ' जूट उद्योग ' व ' जुट उद्योग ' अशी शब्दयोजना केली होती. ' झूट उद्योग ' असा मराठी पर्याय वापरापर्यंत एका परिक्षार्थीची मजल गेली होती. प्रश्नपत्रिकेतील मराठी रूपान्तरणातच 'ज्यूट उद्योग' या शब्दाचा वापर करण्यात आला होता. त्यामुळे 'जूट' वा 'जुट' या परीक्षार्थींच्या शब्दांशी चालवून घेण्याशिवाय गत्यंतर नव्हते. परन्तु एकाही परीक्षार्थीला 'ताग उद्योग' हा मराठी पर्याय सुचू नये याचा खेद वाटला. आणि 'झूट उद्योग' या मराठी पर्यायामुळे आपण ज्याचे अध्यापन करतो त्या अर्थशास्त्राचे वैयर्थ्य जाणवल्यामुळे खंतही वाटली. कोणाला हे उदाहरण रचित वा काल्पनिक वाटणे शक्य आहे. परन्तु तो एक प्रलयंकारी प्रत्यय आहे एवढेच नमूद करून या अवस्थेवर एक परिणामकारक उपाय ठरणाऱ्या अर्थशास्त्र परिभाषा कोशाच्या संक्षेपात विचार करू.

1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. 1964 मध्ये राजभाषा म्हणून महाराष्ट्रात मराठी भाषेचा

* प्रकाशक : भाषा संचालक, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई, मार्च 1987, पृष्ठे 232 + 12 किंमत : नोंदलेली नाही.

स्वीकार करण्यात आला. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठात तंत्रविज्ञानादी विषयांची मराठी परिभाषा एकरूप व समान ठेवण्याची गरज वाटली.त्या अनुरोधाने 1967 मध्येशासनातर्फे महाराष्ट्रातील विद्यापीठांचे कुलगुरू व भाषा सल्लागार मंडळाचे सदस्य यांची एक संयुक्त बैठक बोलविण्यात आली. त्या बैठकीत विज्ञानविषयक व मानव्यविद्याविषयक विषयांची परिभाषा सर्व विद्यापीठांच्या साहाय्याने तयार करावी असे ठरले. आणि या निर्णयाला अनुसरून भाषा संचालनालयाने वेगवेगळ्या विषयांसाठी वेगवेगळ्या उपसमित्या नेमून भाषा सल्लागार मंडळाच्या ''अर्थशास्त्र ' विद्याशाखेच्या उपसमितीची 4 जून 1974 रोजी स्थापन केली. आणि 1974 मध्ये सुरू झालेल्या परिभाषा निर्मितीच्या प्रक्रियेचे फलित म्हणून मार्च 1987 मध्ये 10,207 इंग्रजी शब्दांचे (प्रस्तावनेत सुमारे 7,000 शब्दांचे मराठी पर्याय असे म्हटले आहे) मराठी पर्याय निश्चित करणारा अर्थशास्त्र परिभाषा कोश छापून तयार झाला. हा कोश प्रसिध्द होईपर्यंत मराठीत अर्थशास्त्र मनमानी, प्रदेशविशिष्ट व केवळ तत्कालिक सोय म्हणून असमर्पक व अभिव्यक्तिशून्य मराठी पर्यायांचा वापर वाढत गेला, आणि विशेष म्हणजे यथार्थ, स्पष्ट, समर्पक,सुटसुटीत,समान व एकरूप शब्दांची गरज ज्यांना पटली त्यांच्याकडूनच ती पटवून देत असताना हे घडून येत होते.

परिभाषा निर्मिती हे एक स्वतंत्र शास्त्र आहे. ''अवाढव्य मानवी व्यवहाराला शब्दांचे चलन पुरविणारी भाषा ही एक टाकसाळ आहे....भाषेचा शास्त्रीय स्वरूपाचा उपयोग म्हणजे परिभाषा''[1] आतापर्यंत समान, एकरूप, यथार्थ स्पष्ट, सुटसुटीत, अभिव्यक्तीक्षम व सुबोध मराठी पर्याय देणारा अर्थशास्त्र परिभाषा कोश उपलब्ध नव्हता. त्यामुळे एक प्रकारची 'जो जें वांछिल तो ते लिहो' अशी परिस्थिती निर्माण झाली. अर्थशास्त्रातील मराठी पर्यायांचा वाटा अवरुध्द झाल्या. म्हणून येथून पुढील काळात अर्थशास्त्र परिभाषा कोशाच्या माध्यमातून समान व एकरूप मराठी परिभाषेला चालना मिळेल काय? तिचे मराठमोळेपण वाढविणारा आकार तिला प्राप्त होईल काय?

अन्य कोणत्याही शास्त्राप्रमाणे अर्थशास्त्राच्या मराठी परिभाषानिर्मितीचे व निश्चिततेचे काम गुंतागुंतीचे, निरंतर स्वरुपाचे व कष्टाचे आहे. त्यासाठी बैठक मारून बसण्याची जशी तयारी हवी तशीच वस्तुसत्याचा वेध घेणारी शोधक बुध्दीही हवी. पुष्कळदा असे काही शब्द असतात की ज्यावेळी भावसत्याकडे पाठ फिरविणे कठीण होते, आणि त्यातूनच वाद-प्रतिवाद निर्माण होतात. अर्थशास्त्राची परिभाषा निर्माण करताना असे वाद-प्रतिवाद निर्माण झाले आहेत. 'रूढीवादी' व ' शुध्दीकरणवादी ' असे त्यांना संबोधण्यात येते. प्रस्तुतचा कोश वस्तुसत्याला प्रमाण मानणारा आहे. त्यात कोणतीही टोकाची भूमिका घेण्यात आलेली नाही, आणि ते योग्यच म्हटले पाहिजे. एकार्थता, स्पष्टार्थता, एकरूपता, सघनता, अल्पाक्षरता, सातत्य, संगती, शब्दसौष्ठव व अर्थवत्ता अशा क्रमवारीने परिभाषा निर्मितीचे निकष एकदा मान्य केल्यानंतर केवळ लोकभाषेत काही शब्द रूढ झाले म्हणून जमीन महसुलाला 'वावडी',गोबर गॅसला गोगर गॅस, धन्वंतरी किंवा वैद्याला डाकदार व डाकघराला पोस्ट असे पर्याय स्वीकारणे भाषाशास्त्राशी सुसंगत ठरत नाही. **village level worker** साठी गाव पातळीवरील कार्यकर्ता हा पर्याय ग्रामीण क्षेत्रातील सामान्य जनांसाठी ठीक वाटतो, परंतु भाषाशास्त्राचे उपरिनिर्दिष्ट निकष एकदा मान्य केल्यानंतर 'ग्रामसेवक' हा पर्याय योग्य ठरतो. पुढील उदाहरणाच्या साहाय्याने याचे अधिक स्पष्टीकरण करता येईल... ''पुष्कळसे लोक आपल्या सायकलीसारख्या वाहनांची साफसफाई करण्यासाठी जुने टूथब्रश वापरतात, म्हणून सायकली दुरुस्त करण्याच्या अवजारात टूथब्रशचा आपण हमखास समावेश करतो असे नाही. शास्त्रीय वाङ्‌मयात रूढ असलेल्या सामान्य शब्दांबाबत हीच गोष्ट लागू आहे.''[2] परिणामी वस्तुसत्य हे उद्दिष्ट पुढे ठेवून प्रमाणित शब्दांचा वाढता वापर होत गेल्यास मराठीच्या मराठमोळेपणाला बाध न येता ते मराठमोळेपण अधिक उजळून निघण्यास मदतच होणार आहे.

कोशाचे काळजीपूर्वक वाचन केल्यानंतर त्यात पुढील काही त्रुटी आढळल्या. अर्थशास्त्र परिभाषा कोशात आवर्जून ज्यांचा समावेश व्हायला हवा असे काही शब्द कोशातून निसटले आहेत, आणि ही त्रुटी प्रकर्षाने जाणविल्याशिवाय राहात नाही. असे काही शब्द त्यांच्या अर्थशास्त्रातील वैशिष्ट्यासह पुढे दिले आहेत :-

(1) **Dismal** - उदास. कार्लाइल यांनी अर्थशास्त्राविषयीची त्यांची नापसंती व्यक्त करताना या शब्दाचा प्रथम उपयोग केला. त्यानंतरच्या काळात अर्थशास्त्राच्या स्वरूपाविषयी बरीच उलटसुलट चर्चा घडून आली. त्या चर्चेत या शब्दाचा वारंवार वापर झाला.

(2) **Debt-equity swap** -- परराष्ट्रीय कर्जाची भागभांडवलात अदलाबदल. 1987 मधील जागतिक बँकेच्या वार्षिक अहवालात (पृ. 22) या अत्याधुनिक संकल्पनेचे स्पष्टीकरण करण्यात येऊन तिच्या फायद्या-तोट्यांचा संक्षेपात निर्देश करण्यात आला आहे. बहिर्गत कर्जाच्या अनर्था-

पोटी अवतरलेली उपाययोजना म्हणून ती वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

(3) **Debt - overhang** -आरपार भेदून जाणे,भिनणे, विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थांच्या संदर्भात व विशेषत: 1982 नंतर जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय पैसा निधी यांच्या कर्जात अफाट वाढ होत गेली. त्यांचा कर्जबाजारीपणा वाढत गेला. तो इतका की त्या अर्थव्यवस्थांमध्ये तो भिनला. परिणामी त्या देशांच्या बहिर्गत कर्जात जशी वाढ होत गेली तसे ते देश जास्त गरीब होऊ लागले. 1986 मधील जागतिक बँकेच्या वार्षिक अहवालात या शब्दाचा प्रथम वापर करण्यात आला.

(4) **Drought** – अवर्षण. **Famine** चा मराठी पर्याय दुष्काळ. त्याचा कोशात समावेश करण्यात आला आहे. परन्तु त्याच्यापेक्षा गुणात्मक दृष्टीने भिन्न व महाराष्ट्रात वारंवार व न चुकता भेट देणाऱ्या अवर्षणाला का वगळण्यात आले समजत नाही.

(5) **Nose-dive** -(खाली) अविचारीपणे मुसंडी मारणे, बुडविणे. विशेषत: शेअर बाजारातील अविचारी व अकल्पित किंमत – बदलांविषयी वारंवार वापर.

(6) **Price - distortion** - किंमत विरूपणा. 1983 मधील जागतिक बँकेच्या वार्षिक अहवालात प्रथम समावेश. प्रबंधित किंमतींच्या संदर्भात विशेष महत्त्व. 1983 मधील अहवालात 31 न्यूनविकसित देशांच्या बाबतीत किंमत–विरूपण निर्देशांक तयार करण्यात आले. 1970-80 या दशकात त्या देशांच्या बाबतीत त्या अहवालात असा महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढण्यात आला आहे की किंमत-विरूपण जितके जास्त तितका वृद्धीदर अल्प असतो. 1985 मधील वार्षिक अहवालात ( पृ. 54-55 ) त्याचा परत निर्देश.

(7) **Zero-base budget** – शून्याधार अंदाजपत्रक. वारंवार वाढत जाणारी महसुली तूट व अनावश्यक खर्चात होणारी बेसुमार वाढ यांच्या संदर्भात अलीकडील काळात भारतात लक्षणीय ठरणारी संकल्पना. तिच्यामध्ये ध्वनित होणाऱ्या व्यूहरचनेला व रीति-पध्दतीला (**Methodology**) राजकीय इच्छाशक्तीची जोड मिळाली तर विविध आर्थिक समस्यांना अटकाव करणे शक्य होईल.

(8) **Zoom** -- प्रचंड वेगाने व तात्काळ वाढणे. वस्तूंच्या किंवा शेअरच्या किंमतीतील अकल्पित वाढीच्या संदर्भात वारंवार वापर.

अशा प्रकारे अलीकडील काळात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरांवर वैशिष्ट्यपूर्ण आर्थिक संदर्भ असणाऱ्या इंग्रजी शब्दांचे मराठी पर्याय कोशात दुर्लक्षित राहिले आहेत. कोशातील ही त्रुटी खटकल्याशिवाय राहात नाही. परन्तु त्याबरोबर हेही ध्यानात घ्यायला हवे की झपाट्याने बदलणाऱ्या अर्थ-शास्त्राच्या विश्वात अशा त्रुटी राहणार. विशेषत: 4 जून 74 ते मार्च 87 च्या दरम्यानचा कालावधी ध्यानात घेतल्यास अशा त्रुटी अटळच ठरणार. कोशनिर्मितीच्या प्रक्रियेपेक्षा अर्थशास्त्राच्या विश्वातील घटितांचा वेग जास्त ठरला. समय पश्चायनाचा ( **Time-lag** ) हा परिणाम आहे. त्यावर एकच उपाय संभवतो. तो म्हणजे गरजेनुसार कोशाच्या अद्यावत व सुधारित आवृत्त्या छापणे व त्यासाठीचा कालपव्यय टाळणे.

आवश्यक ते शब्द वगळण्यात आल्यामुळे ज्याप्रमाणे कोशात आकती दोष ( **Error of omission** )निर्माण झाला, त्याप्रमाणेच नको त्या शब्दांचा समावेश केल्यामुळे कोशात कृती दोष ( **Error of commission** ) निर्माण झाला आहे. नमुन्यादाखल काही शब्द पुढे दिले आहेत :—

(1) **Adjournment** -स्थगन
(2) **Cabinet** -मंत्रिमंडळ
(3) **Ibid** - तत्रैव
(4) **Racket** - कूट योजना
(5) **Travel** - प्रवास करणे
(6) **World** - जग, विश्व
(7) **Year** - वर्ष

हे व असेच आणखी काही शब्द वगळण्यात आले असते तर कोशाचा रेखीवपणा व नेटकेपणा वाढला असता.

कोशात असे काही मोजके शब्द आढळतात की ज्यांचा मराठी पर्याय मूळ इंग्रजी शब्दाइतका समर्पक, आटोपशीर व अभिव्यक्तिक्षम वाटत नाही. उदाहरणार्थ, **Monopoly** याशब्दांचे ' मक्तेदारी ' व ' एकाधिकार ' असे मराठी पर्याय दिले आहेत. परन्तु मूळ (**Monopoly Mono** म्हणजे **Single** व **Polion** म्हणजे विक्रयाधिकार) शब्दाइतका मराठी पर्याय यथार्थ व अभिव्यक्तिक्षम ठरत नाही. **Monopoly** या एका शब्दात उत्पादनसंस्था, व्यक्ती, विपणन, किंमत व पर्यायाचा अभाव इतकी घटिते व त्यांच्या संबंधातील प्रक्रिया ध्वनित होतात. ती ' मक्तेदार ' किंवा ' एकाधिकार ' या शब्दात ध्वनित होत नाहीत. शिवाय, विशिष्ट प्रकारच्या करारानुसार स्वत:ची जमीन दुसऱ्या व्यक्तीकडून कसून घेणाऱ्या जमीन मालकालाही ' मक्तेदार ' या नावाने संबोधण्यात येते. महाराष्ट्रात तसा प्रघात आहे. म्हणजे ' मक्तेदार ' हा शब्द जमिनीची मालकी व तिची कसणूक यांच्या संबंधातील तात्पुरता मर्यादित आहे. दुसरे असे की **Monopsony** चा मराठी पर्याय म्हणून कोशात ' एकक्रयाधिकार ' हा शब्द निश्चित

करण्यात आहे.

मग **Monopoly** साठी ' एकविक्रयाधिकार ' असा मराठी पर्याय स्वीकारण्यात कोणती अडचण संभवते? म्हणून अशा प्रकारच्या यथार्थता व स्पष्टार्थता यांच्या अभावाच्या परिस्थितीत ' चेक ' ' बँक ड्राफ्ट ' ' एजन्सी, ' ' कुपन ', ' कॅमेलिझम', ' पिरॅमिड ' व ' शेअर ' या कोशातील इंग्जी पर्यायाप्रमाणेच, समर्पक व यथार्थ मराठी पर्याय निश्चित होईपर्यंत ' मोनॉपॉली' हा शब्द स्वीकारण्यास काय हरकत आहे?

कोशातील **layoff** या दुसऱ्या एका शब्दाचा मराठी पर्याय म्हणून ' कामबंदी ' हा शब्द निश्चित करण्यात आला आहे. त्यात यथार्थता व स्पष्टार्थता या परिभाषेच्या लक्षणांच्या छटा पूर्णांशाने प्रतिबिंबित होत नाहीत. ' कामबंदी ' हा पर्याय स्वीकारल्यामुळे आठवड्यातील सुटीच्या दिवशी किंवा संपकाळात काम चालू नसते म्हणजे बंद असते. त्या दिवशी किंवा संपकाळातील स्थगित कामास कामबंदी म्हणून का संबोधण्यात येऊ नये? म्हणून कामबंदी ऐवजी ' अपरिहार्य कामबंदी ' हा पर्याय यथार्थ ठरतो. विश्वकोशाच्या परिभाषासंग्रहात[3] हाच पर्याय स्वीकारण्यात आला आहे.

कोशात अशा प्रकारच्या त्रुटी वा दोष आढळत असले तरी त्यामुळे त्याचे महत्त्व कमी होत नाही. अर्थशास्त्र परिभाषा कोश हा मराठीतील शासकीय पातळीवरील पहिला प्रयत्न आहे. त्यासाठी उपसमितीच्या 74 बैठका घेण्यात आल्या. 'अर्थसंवाद' मध्ये 'अर्थ शब्दाची वाट पाहे' हे सदर सुरू करून बराच ऊहापोहकरण्यात आला. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या एका वार्षिक अधिवेशनात त्यावर एका स्वतंत्र चर्चासत्राचे संयोजन करण्यात आले. कोशाच्या कच्च्या मसुद्यातील काही शब्द सुधारित स्वरूपात स्वीकारण्यात आले. या सर्वातून प्रकट होणारे परिश्रम नजरेआड करून चालणार नाही. आता कोश उपलब्ध झाला आहे. यापूर्वी तो उपलब्ध नव्हता. त्यामुळेच अर्थशास्त्राच्या लेखनात / अध्यापनात 'जो जें वांछिल तो तें लिहो' अशी परिस्थिती निर्माण झाली, अशा प्रकारची ' तो मी नव्हेच ' (**alibi**) भूमिका घेऊन शिक्षकांना / प्राध्यापकांना मोकळे होता आले. येथून पुढील काळात त्या भूमिकेच्या खरे-खोटेपणाची कसोटी लागणार आहे. ज्ञानदेवांच्या ' मराठीयेचा नगरी ' जडवादाच्या (सुस्तपणाच्या) दरडी, वितंडवादाच्या आडवाटा व कुतर्कांची (मोकाट) श्वापदे यांची जागा ज्यावेळी विवेकवेली तसेच संवादरूपी फळांनी बहरलेली (आर्थिक) सिध्दान्तांची दाट व विस्तीर्ण उद्याने यांच्याकडून घेतली जाईल त्यावेळी कोशनिर्मितीचे उद्दिष्ट सफल होईल, कोशनिर्मितीमागील परिश्रम सार्थकी लागतील.

**शि. ना. माने,**

(उपप्राचार्य, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय सातारा)

1. शासन व्यवहारात मराठी (समस्या: स्वरूप: प्रक्रिया), भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासन, 1963 पृ. 104.
2. तत्रैव, Pp.96.
3. मराठी विश्वकोश, खंड 18, परिभाषा संग्रह, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई 1973, पृ. 255.

o o

## 'अर्थसंवाद' मध्ये प्रसिध्दीसाठी लेखनसाहित्य पाठवू इच्छिणाऱ्यांकरिता सूचना

1. 'अर्थसंवाद' साठी पाठविलेला लेख अन्यत्र प्रसिध्द झालेला अथवा अन्यत्र प्रसिध्दीसाठी पाठविलेला नसावा. मात्र प्रकाशित लेख 'अर्थसंवादा'च्या वाचकांसाठी पुनर्मुद्रित करणे आवश्यक वाटल्यास तसे करण्याचे अधिकार प्रमुख संपादक यांना राहतील.

2. परभाषेतील अत्युत्तम लेखांचे अनुवाद 'अर्थसंवाद' मध्ये प्रसिध्द होऊ शकतात. मात्र त्यासाठी प्रमुख संपादक यांनी अनुवाद स्वीकृत केल्यानंतर भाषांतर वगैरेचे अधिकार ज्यांच्याकडे असतील त्यांची लेखी अनुमती मिळवून भाषांतरकाराने ती प्रमुख संपादक यांजकडे पाठविली पाहिजे.

3. लेख वगैरे मजकूर टंकलिखित अथवा सवाच्य हस्ताक्षरात निदान भैज समास सोडून कागदाच्या एकाच बाजूला लिहिलेला असावा. लेखात खाडाखोड टाळावी.

4. पाठविलेला मजकूर प्रकाशित करण्याच्या दृष्टीने परिपूर्ण असावा. लेखाच्या अग्रभागी मथळा देऊन त्याखाली लेखकाने आपले नाव लिहावे. नाव लेखाच्या शेवटी देऊ नये. लेखकाने स्वत:विषयी संक्षिप्त माहिती, पत्ता, व्यवसाय, प्रकाशित लेखन इ. - वेगळ्या कागदावर लेखनसाहित्याबरोबरच पाठवावी.

